म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. १२५५२

१९५४



REFBK-0008352
REFBK-0008352

# मराठ्याचीं संग्रामगीतें

# चरित्र-ग्रंथ

**अर्वाचीन पंचकन्या** : लेखक : **बा. गो. नाईक,** एम्. ए.
डॉ. आनंदीबाई जोशी, पंडिता रमाबाई, भगिनी निवेदिता, कस्तुरबा गांधी, व डॉ. ॲनी बेझंट या आधुनिक पंचकन्यांची चरित्रें— कि. २ रु. ट. ख. ४ आणे.

**डॉ. बाळकृष्ण** — चरित्र, कार्य व आठवणी
संपादक : **मो. रा. वाळंबे,** बी. ए., बी. टी.
राजाराम कॉलेजचे आदर्श प्राचार्य **कै. डॉ. बाळकृष्ण** यांच्या आंतरराष्ट्रीय कीर्तीचें व ज्या गुणसमुच्चयामुळें त्यांनीं विद्वान प्रोफेसर, कर्तबगार प्रिन्सिपॉल, नामांकित शिक्षणशास्त्रज्ञ, सुप्रसिद्ध इतिहास-संशोधक, विख्यात अर्थशास्त्रज्ञ, प्रभावी वक्ता असा लौकिक मिळविला त्याचें रहस्य जाणण्याची तरुण विद्यार्थ्यांची इच्छा सर्वथैव पुरी करणारा अमोल ग्रंथ. पृ. ३००, कि. ३॥ रु. ट. ख. ८ आणे

**श्री बसवेश्वरचरित्र** : कि. १॥ रु. ट. ख. ४ आणे
लेखक : **डॉ. म. गो. माईणकर,** एम्. ए., पीएच्. डी.
व **रा. द. गुरव,** व्यायाम भूषण.
लिंगायत पंथांतील एक महान् कार्यकर्ते श्री बसवेश्वर यांचे केवळ चरित्रच या पुस्तकांत दिलेलें नसून त्यांच्या कार्याची माहिती व त्यांच्या तत्त्वज्ञानाची ओळखही करून दिलेली आहे.

**स्कूल व कॉलेज बुक-स्टॉल, कोल्हापूर.**

# मराठ्यांचीं संग्रामगीतें

कवि :

कै. दु. आ. तिवारी

प्रस्तावना :

प्रा. म. ना. अदवंत, एम्. ए.

REFBK-0008352

आवृत्ति आठवी

१९५४

किंमत दोन रुपये

स्कूल व कॉलेज बुकस्टॉल, कोल्हापूर.

प्रकाशक :
दामोदर नारायण मोघे, बी. ए.
स्कूल व कॉलेज बुकस्टॉल,
घ. नं. २९४ बी, कोल्हापूर.

प्रकाशन क्रमांक १०८

म. दु. तिवारी अकोला व गांजकर

( सर्व हक्क सुरक्षित )

मुद्रक :

मराठ्यांचीं संग्रामगीतें
पृष्ठें १ ते २०४
गो. य. गुणे,
चिंतामणी प्रेस, कोल्हापूर.

पहिलीं चार पानें व प्रस्तावना
मा. कृ. सहस्रबुद्धे,
श्रीज्ञानेश्वर प्रेस, ३९३ सी,
शिवाजी रोड, कोल्हापूर.

# अनुक्रमणिका


| अनुक्रम | नांव | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | हिंदूंचा हिंदुस्थान | १ |
| २ | लववेना हें शिर मातें ! | ४ |
| ३ | जय जय रघुवीर समर्थ | ७ |
| ४ | कल्याणी कल्याणाची | १० |
| ५ | बेभान लढे नरसाळा | १३ |
| ६ | घाडसी गनीमि कावा | २० |
| ७ | पावनखिंडीचा गाझी | २५ |
| ८ | गडकरी पुरंदरवाला | ३१ |
| ९ | स्वराज्य आणि पुत्रप्रेम | ३९ |
| १० | पित्राज्ञा | ४२ |
| ११ | घेतला सूड जनकाचा | ४३ |
| १२ | पत्नीचा फन्ना उडवी | ४६ |
| १३ | द्या माझी मज तरवार | ४९ |
| १४ | मुसलमान बंधूची हिंदू भगिनी | ५३ |
| १५ | संताजीची घोडदौड | ५७ |
| १६ | द्या करीं जरा समशेर | ६१ |
| १७ | शाहूची यवनी माता | ६६ |
| १८ | मोहरा इरेला पडला | ७१ |
| १९ | कुंभेरीची भंभेरी | ७५ |
| २० | कीर्तिचा ध्वज मळवीला | ८४ |
| २१ | स्वर्गांत भेट होईल | ९० |
| २२ | विजयाच्या द्वारीं अडला | ९५ |
| २३ | मुसलमान असलों म्हणून काय हिंदूशीं बेइमान होऊं ? | १०१ |
| २४ | गारदी कटोनि मेला ! | १०६ |

| अनुक्रम | नांव | पृष्ठ |
|---|---|---|
| २५ | विश्वास सोडुनि गेला ! | १११ |
| २६ | गिल्चा खाशानिशीं मारीन ! | ११५ |
| २७ | भाऊवर गर्दी झाली ! | १२० |
| २८ | धन्य जननि जनकोजीची | १२५ |
| २९ | भाऊ ! भाऊ ! | १३३ |
| ३० | महांकाळी | १४० |
| ३१ | वडगांवावरचा वीर | १४४ |
| ३२ | बेलाग बदामी कोट ! | १४९ |
| ३३ | शूराच्या उदरीं शूर ! | १५३ |
| ३४ | हें शील नव्हे मर्दांचें ! | १५७ |
| ३५ | पटवर्धन–कुलमणि भाऊ ! | १६२ |
| ३६ | फिरविशी कसा जरिपटका ? | १६६ |
| ३७ | रणकीर्ति यशवंताची | १७० |
| ३८ | हळदी घाटाचें युद्ध | १७४ |
| ३९ | रक्तास मिळालें रक्त ! | १७९ |
| ४० | एक काळ ऐसा होता भाग १ ला | १८३ |
| ४१ | ,, ,, ,, ,, भाग २ रा | १८६ |
| ४२ | ,, ,, ,, ,, भाग ३ रा | १९० |
| ४३ | ,, ,, ,, ,, भाग ४ था | १९४ |
| ४४ | केवळ देशाकरितां | १९८ |
| ४५ | दास्य हेंच ना त्वद्ध्येय ? | २०१ |


—※—

# मराठींतील ऐतिहासिक कविता

लेखक :- म. ना. अदवंत

इतिहास व काव्य यांचा परस्पर संबंध कशा प्रकारचा असावा यासंबंधीं अनुमान करणें बरेच मनोरंजक ठरेल. इतिहास हा सत्यावर आधारलेला. 'इति + ह + आस' म्हणजे 'असें झालें.' घडलें तें सांगितलें अशी इतिहासाची भूमिका. तर काव्यांत सत्याबरोबर कल्पनेलाहि तितकेंच महत्त्वाचें स्थान असतें. भूतकालांत घडलेल्या घटना जुने कागदपत्र, बखरी वगैरेंच्या सहाय्याने बुद्धीने तपासून घेऊन त्या निःपक्षपातीपणाने वाचकापुढे ठेवण्याचें कार्य इतिहासकाराचें. त्यांत तो स्वतः कुठे डोकावणार नाही—कुठे मल्लीनाथी करणार नाही किंवा काल्पनिक गोष्टींचा मालमसालाहि कुठे भरणार नाही. तर उलट भूतकाळांत घडलेल्या घटनांच्या आधारें प्रतिभेच्या सामर्थ्यांने भविष्यकाळाचीं स्वप्नें पहाण्याचें व तीं वाचकांना दाखविण्याचें कार्य कवि करीत असतो. इतिहासाच्या सत्याच्या सांगाड्याला सजीव करण्याचें कार्य कल्पनाशक्तीच्या जोरावर कवि करीत असतो. म्हणून नुसत्या इतिहासापेक्षा ऐतिहासिक कादंबरींत किंवा काव्यांत तत्कालीन जीवनाचा प्रत्यय अधिक येत असतो. एका टीकाकाराने म्हटल्याप्रमाणे इतिहासांत सन व नांवें याखेरीज सर्व खोटे असते व वाङ्मयांत सन व नांवें याखेरीज सर्व खरें असतें. याचा गर्भितार्थ लक्षांत घेतला म्हणजे इतिहास व काव्य यांची निर्मिति किती भिन्न मनोवृत्तींतून होते याची कल्पना येते.

पण या दोन भिन्न मनोवृत्तींना जोडणाराहि एक दुवा आहे. तो म्हणजे पूर्वजांचा अभिमान. त्याच अभिमानांतून इतिहासकार आपल्या राष्ट्राचा इतिहास लिहिण्यास प्रवृत्त होतो व कवि आपल्या वीरपुरुषाचे पोवाडे गाण्यास तयार होतो. दोघेहि भूतकाळांत वावरत असतात. पण चिकित्सक नजरेने एक सत्याचे कण हुडकत असतो आणि दुसरा त्याच कणाच्या आधारावर कल्पनाशक्तीच्या सहाय्याने मोठमोठे इमले उभवीत असतो. कवि भूतकाळांत प्रवेश करतो तो पूर्वजांचे पराक्रम गाऊन त्यापासून

स्फूर्ति मिळविण्यासाठी व लोकांनाहि स्फूर्ति देण्यासाठी. पूर्वजांचा पराक्रम ही कविप्रतिभेला सांपडलेली अनमोल खाण आहे. त्यांतून तो विविध रत्ने काढून, त्यांना पैलू पाडून अत्यंत कौशल्याने तो तीं तत्कालीन परिस्थितीच्या कोंदणांत बसवितो. तसे करतांना तो तत्कालीन समाजाशी इतका समरस होतो की त्यामुळे त्याला वर्तमानकालाचा विसर पडतो. भूतकालाचीं स्वप्नें त्याला प्रिय वाटतात, त्यांतच तो रमून जातो आणि वाचकांनाहि रमवितो. पण अनेकदां भूतकालीन सृष्टींत वावरत असतां वर्तमानकालाची त्याला तीव्रतेने जाणीव येते. वर्तमानकालांतील दैन्य, दारिद्र्य, गुलामगिरी ही त्याच्या मनाला पीळ पाडते आणि पूर्वजांच्या पराक्रमाबद्दल वाटणाऱ्या अभिमानाबरोबरच स्वकालीन कर्तृत्वशून्यतेबद्दल विषादहि त्याच्या काव्यांतून व्यक्त होतो. अशा वेळी पूर्वजांचे पराक्रम ऐकून तरी लोकांनी घोर निद्रेतून जागे व्हावे व स्वतःची दुःस्थिति दूर करण्याचा त्यांनी प्रयत्न करावा या उत्कट इच्छेने लोकांच्या डोळ्यासमोर भूतकाळ व वर्तमानकाळ हीं दोन्हीं चित्रें रंगवून ‘ हें चित्र पहा व तें चित्र पहा ’ असें त्यांना जणूं बजावीत असतो. आणि त्याबरोबरच **‘ पूर्व दिव्य ज्यांचें त्यांना रम्य भावि काळ ’** असे आशाप्रेरक सूर काढून जनतेच्या मनांत नवचैतन्य निर्माण करण्याचाहि तो प्रयत्न करतो. त्यासाठी कवि इतिहासाकडे वळतो व ‘ दिव्य पूर्व ’ लोकांच्यापुढे रंगवतो. इतिहास व काव्य यांचा संबंध हा असा आहे.

मराठीमध्ये ऐतिहासिक काव्याचा उगम कुठे झाला हें आपणाला पहावयाचें असेल तर आपणास प्रथम शाहिरी वाङ्मयाकडे वळावें लागेल. शाहिरांनी लिहिलेल्या पोवाड्यांना यथार्थपणें ऐतिहासिक काव्य म्हणता येईल किंवा नाही याची शंका आहे. एक तर तीं तत्कालीन कवींनी तत्कालीन घटनांविषयी व तत्कालीन वीरांच्या पराक्रमाविषयी लिहिलेलीं कवनें आहेत. तत्कालीनांनी तत्कालीन घटनेविषयी लिहिलेल्या काव्याला ‘ ऐतिहासिक ’ हें नांव कितपत देतां येईल हा प्रश्नच आहे. ती त्याकाळची राष्ट्रीय कविता होती—त्या काळांतील राष्ट्रीय घटना व राष्ट्रीय पुरुषांचे पराक्रम तिने वर्णन केले. पण तिला—आज आपण ज्या अर्थाने ऐतिहासिक कविता हें नांव वापरतों त्या अर्थाने त्या कवितेला ‘ ऐतिहासिक ’ असें संबोधता

येणार नाही. त्या काव्यांतील घटना आज आपणाला 'ऐतिहासिक' आहेत. त्या काळी त्या शाहिरांच्या डोळयासमोरच घडत होत्या हें विसरून चालवयाचें नाही. पण कांही असलें तरी आज आपणाला आपल्या ऐतिहासिक किंवा राष्ट्रीय कवितांचा उगम पहावयाचा झाल्यास शाहिरी काव्याकडेच वळावें लागेल.

पोवाडे हे बहुधा राष्ट्राच्या अभ्युन्नतीच्या काळींच उदयाला येत असतात. ज्यावेळीं राष्ट्रांत भोवताली पराक्रमाला बहर आलेला असतो, रणशिंग जोमाने फुंकले जात असतें, म्यानांतून तलवारी बाहेर काढून, भाले, बर्च्या सरसावून शत्रूशी सामना देण्यासाठी उत्साहाने वीर बाहेर पडत असतात त्याचवेळीं त्यांचे पराक्रम गाण्यासाठी शाहिरांच्या डफावर थाप पडते. त्यामुळे मराठी शाहिरांचा उदय शिवकालांत झाला आणि त्यांच्या कवनांना बहर पेशवेकालांत आला तर त्यांत नवल कांहीच नाहीं.

हल्ली जुन्यांत जुना उपलब्ध पोवाडा 'अफझुलखानाचा वध' हा अगीनदास नांवाच्या शाहिराने लिहिलेला आहे. पोवाडे लिहिण्याच्या अगदी प्रथम प्रकाराचा हा नमुना आहे. नांवाला मात्र हा पद्य आहे पण त्याची रचना एकतारी तुणतुण्यावर सहज रीतीने म्हणतां येईल अशी गद्याचीच आहे. शिवाय अफझुलखानाच्या वधाच्या प्रसंगानंतर हा पोवाडा लवकरच लिहिला गेल्यासारखा दिसतो. कारण शेवटच्या चौकांत शाहिराने '**घाईने शाहीर बोलाविल्या**' चा व शिवाजीने घोडा इनाम दिल्याचा उल्लेख आहे. याच काळांत तुळशीदास नांवाच्या शाहिराने 'सिंहगडा' वर रचलेला पोवाडा उपलब्ध आहे. तो एकंदर पंचावन चौकाचा आहे व त्याची एकंदर रचनाहि अगीनदासाच्या पोवाड्यापेक्षां अधिक ठाकठिकीची आहे.

शिवकालीन पोवाड्यांपैकीं फारच थोडे पोवाडे उपलब्ध आहेत. खुद्द शिवाजीमहाराजांच्या कारकिर्दीवर फक्त चारच पोवाडे उपलब्ध आहेत. संभाजी–राजाराम यांच्या कारकिर्दीवर एकहि पोवाडा उपलब्ध नाही. नंतर पेशवेकालांत [illegible]वेळी पुन्हा समृद्धी आली–पराक्रमाला बहर आला त्यावेळी पुन्हा पोवाड्यांचे अमूप पीक आलें. पानपतच्या युद्धापासून खडकी अष्टी पयतच्या लढाईपर्यंत अनेक ऐतिहासिक घटनांवर व पराक्रमी पुरुषांवर पोवाडे

रचले गेले. या काळांत अनेक शाहिरांचे फड उभारले गेले–प्रतिभासंपन्न कवि मर्दांचे पोवाडे गाण्यास पुढे आले–' अकट विकट कवनांच्या ' चाली त्यांनी आपल्या पोवाड्यांत घुसडल्या आणि त्यांना ललित स्वरूप प्राप्त करून दिलें. रामजोशी–अनंतफंदी–होनाजी बाळा–परशराम–प्रभाकर–सगन हीं नांवें तर विख्यात आहेतच. पण त्यांच्या बरोबरीने घ्यावीं लागतील अशी ' राया सटवाजी ' ' रंगराय ' ' लहरी मुकुंदा ' अशी किती तरी नांवें पुढे येतात. या सर्व शाहिरांनी पोवाड्याच्या रूपाने तत्कालीन पराक्रमाचें व मर्दुमकीचें दर्शन आपणाला यथातथ्यपणें घडविलें आहे; आणि हा सर्व वीररसाचा आविष्कार उत्स्फूर्त होता. त्यांच्या समकालीन जी निवृत्तिपर काव्यरचना संतकवींच्या किंवा पंडितकवींच्या लेखणींतून बाहेर पडत होती तिचा या शाहिरांच्या पोवाड्यांवर फार थोडा परिणाम झाल्याचें आढळेल. जें कांही होतें तें त्यांचें स्वतंत्र होतें. मराठ्यांचें राज्य–मराठ्यांचा स्वभाव व मराठ्यांचे गुणदोष यांचें तें प्रतिबिंब होते. भोंवतालच्या जीवनांतून त्यांची कवनें निर्माण झालीं आणि त्या जीवनांत तीं रंगली. श्री. वर्दे म्हणतात त्याप्रमाणें ' मराठ्यांच्या स्वभावांतील ताठरपणा व वीर्यसहज बेफिकिरी वीररस-प्रधान पोवाड्यांत दिसून येते. पोवाडे राजकारणी उलाढालीचा इतिहास सांगतात, राजपुरुषांचें वर्णन करतात आणि वीर पुरुषांची मर्दुमकी गातात. ' म्हणून ' शाहिरांचीं गाणीं हींच मराठ्यांची खरी गाणीं आहेत ' असा उद्गार महाराष्ट्रसारस्वतकार भावे यांच्या तोंडून निघाला.

पण असें असूनहि ऐतिहासिक प्रामाण्याच्या दृष्टीनें हे पोवाडे तितकेसे उपयुक्त ठरत नाहीत. अतिशयोक्ति, दंतकथा, कल्पनाविलास इत्यादि अनेक गोष्टीमुळे सत्याचें यथार्थ दर्शन त्यांतून घडणें कठीणच जाते. पोवाड्यांतून-सुद्धा अनेक वेळा पाल्हाळाचा भाग अधिक आढळतो. खर्ड्याच्या लढाईचें वर्णन करतांना त्या लढाईत भाग घेणाऱ्या सरदारांच्या नांवांनीच अनेकदा पोवाड्याचा पुष्कळ भाग व्यापला जाई—आणि शेवटी मुख्य लढाईचें वर्णन थोडक्यांत उरकलें जाई. त्यामुळे वीररसाचा उत्कट उठाव पोवाड्याच्या अगदी शेवटी शेवटी होत असल्याचा प्रत्यय येतो. पण हेंहि खरें कीं आज तो तपशील वाचतांना आपणाला त्याचें महत्त्व वाटत नसलें तरी त्याकाळीं

शाहीरांच्या दृष्टीनें व ते पोवाडे ऐकणाऱ्यांच्या दृष्टीने त्या नांवांना मोठें महत्त्व असलें पाहिजे—त्यांच्या नुसत्या नांवाच्या उच्चाराने अंगांत स्फुरण येत असलें पाहिजे. तेव्हा तो तपशील अयोग्य असें तरी कसें म्हणावें ?

१८१८ नंतर स्वराज्य संपलें आणि त्याबरोबर पोवाड्यांची निर्मिति पण घटत चालली. पराक्रमच जिथे मावळला त्याठिकाणी पोवाड्याच्या निर्मितीला स्फुरण कुठून येणार ? पेशवाई बुडाल्याबरोबर ' विपरीत काळ आल्याची ' ' दिन असतां आकाशतळीं अंधार पडल्याची ' जाणीव शाहीरांना झाली. पराक्रमाचा सूर्य अस्ताला गेलेला, सरदार हतबल झालेले, रथ, गाड्या, अंबाऱ्या, पालख्या आढ्याला टांगून ठेवलेल्या आणि पंचहत्यारी सैनिकांनी आपल्या ढाल, तलवारी घरच्या गोणींत ठेवलेल्या— अशा उलट्या जमान्यांत अस्सल पोवाड्यांची निर्मिति कुठून होणार ? पण शाहीरानाहि पोट होतेच— आणि त्यामुळे त्यावेळच्या धनिक सावकारांवर, नामधारी सरदारांवर व संस्थानिकांवर या अव्वल इंग्रजी कारकिर्दीत पोवाडे रचण्याचें त्यांच्या नशिबीं आलें. पण अशा पोवाड्यांतून जिवंतपणा कुठून आढळणार ? नाही म्हणावयाला या सुरवातीच्या काळांत पेशवाई बुडाल्याबद्दल हळहळ व दुसऱ्या बाजीरावाची आठवण अनेक पोवाड्यांतून व्यक्त झालेली आढळते. या पोवाड्यांतून वीररसापेक्षा करुणरसाचाच आविष्कार आपणाला अधिक आढळला तर त्यांत नवल कसलें ?

यानंतर पोवाड्याचा जो अस्त झाला, तो जवळ जवळ १८९५ सालापर्यंत. मध्यंतरीचा हा काळच असा गेला की या काळांत पराक्रमाला पोषक असें वाङ्मय निर्माण होणेंच अशक्य होतें. एक तर इंग्रजांच्या कर्तृत्वाने, त्यांच्या शिस्तीने, त्यांच्या विद्येने आपला पुढारी वर्ग स्तिमित झाला होता— शिक्षित जनतेला इंग्रजी राज्य हा एक वरच वाटूं लागला होता—त्यांचे डोळे इंग्रजी राजवटींतील अनेक सुधारणांनी दिपून गेल्यासारखे झाले होते. त्यामुळे इंग्रज हे प्रेषित आहेत—ईश्वरी संकेतानेच ते आपणावर राज्य करण्यास आले आहेत अशा स्वरूपाच्या कल्पना शिक्षितामध्यें रूढ होऊं लागल्या होत्या. इंग्रजांचे सर्व कांही चांगले—या कल्पनेने त्यांचें—व त्यांच्या वाङ्मयाचें अनुकरण करण्याची प्रवृत्तीहि प्रबळ झाली आणि त्यांतून

थोडीशी ऐतिहासिक कविता या काळांत निर्माण झाली. पण ती अगदीच निर्जीव स्वरूपाची होती. 'दक्षिणा प्राइझ कमिटी'ने जाहीर केलेले प्राइझ हीं त्या काव्याचीं स्फूर्तिस्थानें होतीं. गणेशशास्त्री लेले यांनी लिहिलेली 'शिवाजी-चरित्र' 'कृष्णाकुमारी' इत्यादि काव्यें, पांडुरंगशास्त्री पारखी यांचें 'कृष्णाकुमारी' हें काव्य, गो. वा. कानिटकरांचीं 'नारायणरावांचा वध' व 'कृष्णाकुमारी' हीं काव्यें—अशी कितीतरी ऐतिहासिक काव्यें या सुरवातीच्या काळांत लिहिलीं गेलीं. पण या सर्व काव्यांत रसाविष्कारापेक्षां पांडित्याचा प्रकर्षच अधिक आढळतो. 'राजा शिवाजी' हे महादेव मोरेश्वर कुंटे यांनी लिहिलेलें काव्य कांहीसें निराळे आहे. मिल्टनच्या 'पॅरडाइज लॉस्ट' या महाकाव्याच्या धर्तीवर रचना करण्याची महत्त्वाकांक्षा धरून त्यांनी हें काव्य लिहावयास सुरवात केली. पण ते निम्मेच लिहून झाले—लोकांच्या टीकेच्या वादळामुळे तें शेवटीं तसेंच अपुरें पडलें. वीररसप्रधान महाकाव्य (Heroic Epic) लिहिण्याचा त्यांचा हा प्रयत्न अनेक दृष्टींनी फसला. एक तर त्याला वापरलेले 'भुजंगप्रयात' हें वृत्त त्या काव्याला पोषक नाही. पण शिवाय शुद्ध मराठी शब्द वापरण्याच्या अभिनिवेशांत त्याची प्रौढता नाहीशी झाली व काव्य अगदी रटाळ झाले आहे. त्यांत माधुरीहि नाहीं आणि वीररसाचा उठाव पण नाही. उलट

**शिरे वीर युद्धांत घेऊन तट्टू**
**करी जें मुसलमान फौजेस खट्टू**

असे हास्यकारक चरण मात्र ठिकठिकाणी आढळतात.

या काळांत आणखी जी कांही ऐतिहासिक काव्यें निर्माण झालीं त्यांचें स्वरूप शालोपयोगी पद्धतीचें आहे. पूर्वजांचा अभिमान–पराक्रमाची नशा त्यांत कुठेच आढळत नाही. 'अहिल्याबाई आणि मंचाबाई' (ओक) 'आनंदीबाई आणि राघोबादादा' (ओक) 'भीमकर्मा राघोबा' (कृ. ना. आठल्ये) 'राजे प्रतापवंत विठ्ठलसुंदर' (पु. बा. जोशी) इत्यादि सर्व काव्यें अगदी सामान्य वाटतात. नाही म्हणावयास पु. बा. जोशी यांची 'समाधि शतावलि' आणि वासुदेवशास्त्री खरे यांची 'विक्रमादित्याची उज्जयिनी' हीं दोनच काव्यें थोड्याशा निराळ्या वैशिष्ट्याने उठून

दिसतात. त्यापैकी शिवाजी महाराजांची रायगड येथील भग्न समाधि पाहून आलेला उद्वेग व चीड 'समाधि शतावलि' या काव्यांत आढळते तर 'विक्रमाच्या उज्जयिनी' चे हल्लीचे मोडकळीस आलेलें स्वरूप पाहून वाटणारा विषाद दुसऱ्या कवितेंत व्यक्त झाला आहे. पण एकंदरींत या काळांतील सर्व काव्यच अनुवादात्मक आणि अनुकरणात्मक आहे. त्यामुळें जिवंत भावनाचा प्रत्यय या काळांत कुठेच येत नाही. वास्तविक १८५७ चें बंड, झांशीची राणी लक्ष्मीबाई व तात्या टोपे यांचा पराक्रम—हे सर्व त्यांच्या नजरेसमोर घडले होते. पण याचीहि दखल या काळांतील कवींनी घेतली असल्याचें वाटत नाही.

१८९० पर्यंत महाराष्ट्र हा थंड गोळा होता. त्याला चेतना देण्याचे प्रयत्न तत्पूर्वी न्यायमूर्ति रानडे, सार्वजनिक काका, ज्योतिबा फुले आदि मंडळींनी चालविले होतेच. देशाभिमान, भाषाभिमान व धर्माभिमान जागृत करून नवा उत्साह निर्माण करण्यासाठी विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या निबंधमालेनेहि बंडाचे निशाण १८७४ सालीं उभारलें होते. पण महाराष्ट्रांत देशभक्तीचे प्रभावी वारे वाहूं लागले तें १८९० पासून. लोकमान्य टिळकांच्या या युगांत देशाभिमानाला व पूर्वेतिहासाला एक निराळेच महत्त्व प्राप्त झालें. पारतंत्र्याविषयी वाटणारी चीड व स्वातंत्र्याची उत्कट लालसा समाजाच्या नेसानसांतून व्यक्त होऊं लागली; आणि जनतेला स्फूर्ति देण्यासाठी कवींची, लेखकांची, संशोधकांची नजर इतिहासाकडे वळूं लागली. १८९५ सालापासून रायगडावर व इतरत्र शिवजयंती अतिशय उत्साहानें साजरी होऊं लागली—लोकमान्य टिळकांच्या प्रयत्नांनी गणेशोत्सवाला सुद्धा राष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले. त्यामुळे या काळांतील ऐतिहासिक कवनांत नवचैतन्य निर्माण होऊं लागले.

केशवसुत हे आधुनिक मराठी कवितेचे जनक. पण त्यांनी ऐतिहासिक कविता लिहिली नाही. पारतंत्र्याबद्दल त्यांना खंत वाटत असल्याचे अनेक काव्यांतील उद्गारावरून दिसते.

**'गेलें वैभव गाउनी स्फुरण तो युष्मन्मना देइल'**

असे जरी काव्याचें प्रयोजन त्यांनी सांगितले असले तरी त्यांनी गतवैभव

कुठेंच गाइलें नाही. आगरकरांच्या पावलावर पाऊल टाकून सामाजिक विषमतेविरुद्ध बंडाचा झेंडा उभारण्यांत ते गुंतले होते. त्यामुळें आद्य राष्ट्रीय कवित्वाचा मान त्यांचे समकालीन कवि विनायक यांच्याचकडे जातो. पारतंत्र्याविषयी वाटणारी चीड व पूर्वेतिहासाबद्दल वाटणारा अभिमान हेच कवि विनायक यांच्या काव्याचे मुख्य विशेष आहेत.

'पूर्व दिव्य ज्यांचे त्यांना रम्य भावि काळ'

असे जरी ते म्हणत असले तरी पारतंत्र्यांतील दुःखें पाहून ते अगतिक झाले होते व म्हणूनच त्यांचें मन भूतकाळांत अधिक रमत होते हें स्पष्ट दिसते.

'कोठला शिवाजी राजा
निजधर्माचा अभिमानी । यापुढे
निपजणार कोण धनाजी
तारण्या मराठेशाही । यापुढे

असें त्यांना सतत वाटते. त्याउलट आज भारतमातेचीं मुलें स्वतःच्या आईच्या रक्ताने आपल्या देहाला लाली आणत असतांना त्यांना स्पष्ट दिसतात, त्यामुळेच वर्तमानकाळांतून त्यांचें मन भूतकाळांत जातें आणि 'पन्ना' 'संयोगिता' 'कृष्णाकुमारी' 'वीरमति' अशासारख्या नारीरत्नांच्या पराक्रमाचें स्मरण करण्यांत त्यांची प्रतिभा धन्यता मानते. त्यांचीं हीं ऐतिहासिक कथाकाव्यें ठसठशीत व्यक्तिदर्शनामुळे व रसात्मक वर्णनशैलीमुळे रम्य झाली आहेत. पण त्यांचें हें ऐतिहासिक काव्य पारतंत्र्यामुळे आलेल्या अगतिकतेंतून निर्माण झालें आहे—म्हणून त्यांत जिवंतपणा आहे. दिव्य पूर्व दाखवून रम्य भाविकालाची आशा निर्माण करण्याचा त्यांत प्रयत्न आहे. म्हणूनच आधुनिक राष्ट्रीय कवींत अग्रपूजेचा मान कवि विनायकांकडे जातो.

विनायकांच्या समकालीन कवींत ऐतिहासिक वा राष्ट्रीय कविता फारशी निर्माण झाली नाही. कवि दत्त यांनी 'भगवा झेंडा' 'मावळ्यास आमंत्रण' 'श्रीशिवछत्रपति' अशासारखी थोडी रचना केली. पण विनायकाप्रमाणें राष्ट्रीय भावना हा कवि दत्ताचा स्थायीभाव नाही. शिवाय वयाच्या चोविसाव्या वर्षीच निधन आल्यामुळें त्यांच्या प्रतिभेचा उन्मेष पूर्णत्वाला पोहोचला होता असें वाटत नाही.

१९०५ ते १९२० हा काळ सर्वच दृष्टींनी महत्त्वाचा होता. राष्ट्रीय चळवळीचें स्वरूप या काळांत देशव्यापी झालें होतें. स्वदेशीची चळवळ, वंगभंगाची चळवळ इत्यादि अनेक चळवळींनी देशांतील जनतेच्या भावना ढवळून निघत होत्या. लोकमान्य टिळक, काळकर्ते शिवराम महादेव परांजपे यांच्या प्रक्षोभक लेखांनी, सावरकरादिकांच्या क्रांतिकारक चळवळींनी देशांत जिकडेतिकडे असंतोषाचे वारे वाहात होते. त्यांतच लोकमान्य टिळकांना झालेली काळे पाण्याची शिक्षा. अशा अत्यंत प्रक्षुब्ध काळांत ज्वलंत काव्य निर्माण व्हावे अशी साहजिकच अपेक्षा उत्पन्न होते.

आणि कांही अंशांनी ती अपेक्षा फलद्रूप झाली. कांही अंशांनी म्हणावयाचें कारण असे की या काळांत प्रमुख म्हणून गणल्या गेलेल्या कवींच्या काव्यांत राष्ट्रीय भावनांचा प्रकर्ष फारशा मोठ्या प्रमाणांत झाल्यासारखा दिसत नाही. गोविंदाग्रज, बालकवि, रेंदाळकर, तांबे वगैरे कवींच्या काव्यांत राष्ट्रीय भावनेला फार थोडे स्थान मिळाले आहे हें मान्य करावयास हवे. त्यामुळे ऐतिहासिक काव्य यांच्या संग्रहांत अभावानेच आढळते. ज्या ठिकाणी थोडा फार आढळ होतो त्या ठिकाणीहि त्याचें स्वरूप अगदी कृत्रिम झाल्यासारखे वाटते. गोविंदाग्रजाचा 'पानिपतचा फटका' हें याचें उदाहरण म्हणून दाखवितां येईल. कविवर्य बी यांच्या कवनांत तत्त्वचिंतनशीलता अधिक दिसते. त्यामुळे 'कमला' हें उत्कृष्ट काव्य वाचत असतांना भावनेपेक्षा कल्पनाच आपणाला अधिक मोह पाडते. तांब्यांच्या काव्यसंग्रहांतसुद्धां 'झांशीवाली' सारखी एकादीच भावनेने ओथंबलेली ऐतिहासिक स्वरूपाची कविता आढळते. बालकवि तर बोलून चालून निसर्गाचे गायक. शेवटी शेवटी त्यांचें लक्ष जरी इतिहासाकडे वळलें असले तरी त्यांच्या ऐतिहासिक काव्याच्या अपूर्ण स्वरूपावरून भूतकाळांतील रम्याद्भुततेचा ध्यास त्यांना लागला असावा असें दिसते. त्यामुळे १९०५ तें २० हा कालखंड ज्वलंत राष्ट्रीय भावनांनी ओथंबलेला असूनहि या कालखंडांतील प्रमुख कवींच्या काव्यांत या भावनांचें प्रतिबिंब पडलेलें दिसत नाही.

पण याच काळांत वावरणाऱ्या बॅ. सावरकर, कवि गोविंद, कवि माधव यांच्या काव्यांत राष्ट्रीयत्वाच्या भावना प्रकर्षत्वाने आढळतात. त्यापैकी

बॅ. सावरकर आणि कवि गोविंद तर त्यावेळच्या राजकीय जीवनांत हिरीरीने भाग घेत होते. अपंगपणामुळे कवि गोविंद जरी प्रत्यक्ष कांही कार्य करूं शकले नाहीत तरी त्यावेळच्या नाशिक येथें बॅ. सावरकरांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या ' अभिनव भारता ' च्या चळवळीच ते प्रमुख कार्यकर्ते होते. या दोघांच्या जाज्वल्य देशभक्तींतूनच त्यांच्या ऐतिहासिक कवितेचा जन्म झाला. या कवितेच्या मागे ज्वलन्त भावनेचा अंगार आहे—आणि त्यामुळे या दोघांच्याहि कवितेला सरकारी रोषाला बळी पडावे लागले.

कवि गोविंदच्या ऐतिहासिक काव्यांत शिवकालीन वातावरणांत त्यांनी आपणास नेले आहे. शिवकालीन होलिकोत्सव दाखविला आहे, जिजाबाईने बालशिवाजीस दिलेला झोका ऐकविला आहे, शिवाजीच्या दरबाराचें दर्शन आपणांस घडविलें आहे. हें सर्व कल्पनारम्य आहे हें खरें–पण त्यामागे पारतंत्र्याविषयीं वाटणारा विलक्षण उद्वग आहे हें विसरून चालावयाचें नाहीं. **देशाचा पालनवाला । तो शिवाजि राजा झाला ॥** अशी शिवाजीचीं स्तुतिस्तोत्रें गातांना त्याचा पराक्रम ऐकून महाराष्ट्रांतील प्रत्येक सुपुत्राने तशा स्वातंत्र्ययज्ञाची मुहूर्तमेढ रोवण्यास बद्धपरिकर व्हावे अशीच त्यांची अपेक्षा होती. तानाजीच्या स्त्रीला तानाजीच्या मृत्यूमुळें झालेला विलाप हा वीरोचित विलाप आहे–सामान्य स्त्रीला पतिनिधनामुळे होणाऱ्या विलापापेक्षा तो किती निराळा आहे याची जाणीव तो विलाप वाचतांना येते. कवि गोविंदाची ऐतिहासिक कविता अशी देशभक्तीने रसरसलेली आहे आणि म्हणून तिच्यांत जिवंतपणाचा प्रत्यय आपणाला येतो.

बॅ. सावरकर तर राष्ट्रीय जीवन जगत होते. स्वातंत्र्याभिमान व देशाभिमान हा त्यांच्या रूपाने साकार झाला होता. त्यामुळे त्यांच्या कवनांत त्यांच्या ज्वालाग्राही भावनांचें प्रतिबिंब पडावें यांत नवल तें कोणतें? त्यामुळे शिवकालीन उत्कट पराक्रमाकडे व देशभक्तीकडे त्यांचें लक्ष वेधलें व त्यांच्या ओजस्वी लेखणींतून ' तानाजी ' व ' बाजी प्रभु ' हे पोवाडे निर्माण झाले. या पोवाड्यांतील वीररसाचा आविष्कार अतिशय स्फूर्तिप्रद आहे यांत शंका नाही. ' शिवाजी ' हें तर त्यांचें दैवत. त्यामुळे ' श्रीशिवगीत ' ' शिवाजी महाराजांची आरती ' किंवा ' शिववीर '

अनुक्रम ... विभाग ... 924 92

अशासारखी उत्कट देशभक्तीच्या भावनेने ओथंबलेली कविता त्यांच्या हातून निर्माण झाली. त्यांच्या या ऐतिहासिक कवितेंत कथेपेक्षा भावनांचें अधिष्ठानच अधिक आहे. त्यामुळे कवि गोविंद किंवा बॅ. सावरकर यांच्या या कवितांना ऐतिहासिक विषयावरील कविता असेच म्हणणें कदाचित् अधिक बरोबर ठरेल. पण त्यांतील भावनेचा जिवंतपणा मात्र शंकातीत आहे.

'गोमंतक' हें सावरकरांचें महाकाव्यहि ऐतिहासिक पार्श्वभूमीवर आधारलेलें आहे. गोमांतकांतील भार्गव या गांवीं एका वेळीं पोर्तुगीजांनी केवढा धर्मच्छळ केला याचें वर्णन पूर्वार्घांत अनुष्टुभ छंदांत केलें आहे आणि उत्तरार्धांत मराठ्यांची मदत घेऊन वीस वर्षांनंतर त्यांतील नायक परत येऊन हिंदुधर्माचा जयजयकार करीत आहे असें यांत कथानक आहे. तत्त्वप्रतिपादन हा जरी या काव्याचा हेतु असला तरी पूर्वार्धांतील वर्णनें मोठी परिणामकारक वाटतात. 'कमला' हें खंडकाव्यहि अपूर्ण असलें तरी त्याची पार्श्वभूमि ऐतिहासिकच आहे. मात्र या खंडकाव्यांत शृंगाररसाला प्राधान्य आहे. हें काव्य महाकाव्याचा एक भाग होणार होतें-पण शेवटीं तें अपुरेंच राहिलें.

मराठ्यांच्या इतिहासाचा अभिमान बाळगून व त्याच्याशी समरस होऊन त्यांतील अनेक उत्कट प्रसंगावर वीररसपूर्ण कविता करण्याचें कार्य याच काळांत कवि माधव व तिवारी यांनी केले. या दोघांचीहि प्रतिभा अशा वीररसप्रधान काव्याला अनुकूल अशीच होती. मराठ्यांच्या इतिहासांतील पराक्रमानें ओथंबलेले प्रसंग घेऊन त्यावर वीररसपरिप्लुत रचना करण्याचें कार्य या दोन्ही कवींनी परिणामकारक रीतीने केलें आहे. 'युगायुगाचे संदेश। युगायुगा करणें ज्ञात।' हें आमच्या शाहिरगिरीचें कार्य असून जोंपर्यंत दास्यशृंखला तुटल्या नाहींत, सुल्तानीचा सैतान थैमान करीत आहे, राष्ट्रघातकी दुष्ट जन नाहीसे झाले नाहीत तोंपर्यंत आमची शाहीरगिरी जगावर अविरत चालणार असें कवि माधव बजावतांना दिसतात. त्यामुळे त्यांचें ऐतिहासिक काव्य अशा या राष्ट्रीय वृत्तींतूनच निर्माण झाल्याचें स्पष्ट दिसतें. शाहीरांचें संगीत हें रडागीत नाही असा त्यांचा दावा आहे. त्यामुळे त्यांनी लिहिलेल्या ऐतिहासिक कवितांत एक

निराळेच सामर्थ्य आहे. 'तारापुरचा संग्राम' 'गोकलखां लढनेवाला' 'पानपतचा सूड' 'जिवबादादा बक्षी' अशासारखीं काव्यें वाचतांना वीररसाचा उत्कट आविष्कार त्यांत झालेला आढळतो. त्यांची शब्दांची घडणहि मोठी प्रभावी आहे. वेंचक शब्दांनी प्रसंग डोळ्यापुढें उभे करण्याच्या त्यांच्या सामर्थ्याचा प्रत्यय आपणाला त्यांच्या जवळ जवळ सर्व ऐतिहासिक कवनांतून येतो. 'गोकलखां' या काव्यांतील खालील वर्णन पहा—

**प्रेताच्या जागोजाग—राशीवर पडल्या राशी !**
**रक्ताचें घडलें स्नान—अष्ट्याच्या रणभूमीशी !**
**लोळल्या ध्वजा धूलींत—मुकुनिया पूर्वविभवासी !**
**कोरडा कंठ होवोनी**
**घायाळ शिपाई कोणी**
**करिताती 'पाणी ! पाणी !'**
**चावी परि अधरोष्ठाला—गोकलखां लढनेवाला**

अशी वर्णने जागोजाग सांपडतात. पण हें पराक्रमाचें वर्णन करीत असतांनाच विषादाची छटाहि त्यांच्या काव्यांत उमटून जाते. गोकलखांच्या पराक्रमाबरोबरच '**संपला इथे इतिहास—शिवरायाच्या राज्याचा**' याची जाणीव त्यांना होते; शनिवारवाड्यापुढे उभे राहून त्याची दुर्दशा पहात असतांना पूर्व वैभवाची आठवण व आजच्या दुबळेपणाची जाणीव होऊन त्यांच्या तोंडांतून शब्द फुटेनासा होतो; 'शिवकालीन रायगड'चें वर्णन करीत असतांना शारदेचा कंठ रुद्ध होऊन तिच्या डोळ्यांतून टपटप अश्रु गळत असतांना त्यांना दिसतात—विषादाची ही जाणीव त्यांच्या उत्कट राष्ट्रीय भावनेंतून निघाली आहे आणि म्हणूनच ती अधिक परिणामकारक वाटते. माधवांची ऐतिहासिक काव्यें वाचतांना एकीकडे पूर्वजांच्या पराक्रमाच्या वर्णनाने अभिमानाचें भरतें येतें तर एकीकडे आपली दैन्यावस्था पाहून विषाद उत्पन्न होतो. यांतच त्यांच्या काव्याचें यश सांठविलेलें आहे.

दुर्गाप्रसाद तिवारी हे जन्माने कान्यकुब्ज ब्राह्मण. त्यांची मातृभाषा हिंदी. उत्तर हिंदुस्थानांतून इकडे खानदेशांत येऊन स्थायिक झालेल्या परदेशी लोकांपैकी ते एक होते. पण महाराष्ट्राच्या इतिहासाशी समरस

होऊन– व मराठी भाषेवर प्रभुत्व मिळवून त्यांनी मराठ्यांचा सर्व इतिहास ओजस्वी भाषेंत आपणापुढे साकार उभा केला आहे. त्यांची कविता कवि माधव यांच्या कवितेप्रमाणेच जाज्वल्य देशभक्तींतून आविष्कृत झाली आहे. त्यामुळे मराठ्यांचे पराक्रम वर्णन करतांना त्यांच्या वाणीला विशेषच जोम चढतो. 'मराठ्यांचीं संग्रामगीतें' हा त्या दृष्टीने उल्लेखनीय काव्यग्रंथ आहे. त्याच्या आठव्या आवृत्तीचा आज योग येत आहे ही एकच गोष्ट त्यांतील काव्यगुणाची साक्ष पटविण्यास पुरेशी आहे. 'घेतला सूड जनकाचा', 'संताजीची घोडदौड', 'कुंभेरीची भेंबेरी', 'गारदी कटोनी मेला' 'बेलाग बदामी कोट' अशासारख्या कांही कविता वीररसाचें उदाहरण म्हणून मुद्दाम उल्लेखिण्यासारख्या आहेत. तिवारींच्या या संग्रामगीतांत अतिशय परिणामकारक व नाट्यपूर्ण रीतीने कथानक वर्णन करण्याची तिवारींची शैली मोठी चांगली आहे. कवि माधवांच्या कवितेंत भूतकालाचा अभिमान व वर्तमानकालाबद्दलचा विषाद एकदमच जाणवतो. तिवारी मात्र आपणाला थेट भूतकालांतच नेतात आणि तेथेंच रमवितात. शिवकाला-पासून ते दुसऱ्या बाजीरावाच्या कालापर्यंत इतिहासांतील निवडक घटना घेऊन त्यांनी त्या नाट्यपूर्ण रीतीने 'संग्रामगीतांत' रंगविल्या आहेत. त्यामुळे मराठेशाहीचें चित्रमय दर्शन त्यांतून घडत असल्याची जाणीव आपणाला होते.

'झांशीची संग्रामदेवता' हें त्यांचें दुसरें पुस्तकहि तितकेंच ओजस्वी आहे. एकंदर दहा कवनांतून त्यांनी झांशीच्या राणीचा पराक्रम रेखाटला आहे. झांशी खालसा झाल्याचें जाहीर झाल्यापासून ते शेवटचा संग्राम लढेपर्यंत राणीचें जें चित्र तिवारींनी दहा कवनांत रंगवलें आहे तें पहात असतांना राणीच्या पराक्रमाच्या वर्णनाने थरारून जाणार नाही असा वाचक क्वचित्च सांपडेल. पण वीररसाबरोबरच करुण रसाची छटा पण या काव्यांत मिसळली आहे. येवढ्या महापराक्रमी राणीचा दुःखद अन्त व्हावा याबद्दल तर विषाद वाटतोच पण पराक्रमाची शर्थ करूनहि त्याचें योग्य तें चीज होऊं नये–राणीच्या असामान्य पराक्रमाला विजयाची जोड मिळूं नये म्हणूनहि विषाद वाटतो. 'झांशीची संग्रामदेवता' हें काव्य म्हणजे राणी

लक्ष्मीबाईच्या पराक्रमाचा नाट्यपूर्ण इतिहास आहे. 'तिचे पोवाडे नामर्दाला मर्द करतील व मृताच्या अंगीं चैतन्य आणतील' असें जे ना. के. बेहेरे यांनी प्रस्तावनेंत उद्गार काढले आहेत ते हें काव्य वाचत असतांना, सार्थ वाटतात असें म्हटल्यावाचून राहावत नाही.

तिवारींनी आणखीहि पुष्कळ ऐतिहासिक काव्यें लिहिलीं. पण या दोन काव्यांच्या तोडीला तीं येऊं शकलीं नाहींत. 'महाराणा प्रतापसिंह' 'मान्यांची यमुना' 'नंदिनी' 'मनोहरलीला' अशासारखी ऐतिहासिक वा ऐतिहासिक पार्श्वभूमि असलेलीं काल्पनिक खंडकाव्यें त्यांनी रचिलीं. 'शिवराज भूषण' या भूषणकृत हिंदी काव्याचे मराठींत भाषांतरहि केले. त्यांच्या अनेक स्फुट कवितांतून राष्ट्रीय भावनेचा आविष्कार झालेला आढळेल. 'काव्यकुसुमाञ्जलि' मधील 'गड आला पण सिंह गेला' 'जिजाबाईचा पुत्रविरह' किंवा 'कुमुद्वती' मधील 'पुरंदरचे गडकरी' 'निवाणीची वाणी' 'देवगिरी' अशासारखी कविता त्यांच्या राष्ट्रीय दृष्टिकोनाची साक्ष देतात. तिवारींच्या काव्यांत बहुविधता असली तरी 'मराठ्यांचीं संग्रामगीतें' व 'झांशीची संग्राम देवता' या दोन काव्यांवरच आज त्यांची कीर्ति अधिष्ठित झाल्यासारखी दिसते. एका परदेशी लेखकाने मराठा वृत्तीशी व मराठ्यांच्या इतिहासाशी समरस होऊन व त्यांचा अभिमान बाळगून इतकी परिणामकारक रचना करावी हें खरोखरच कौतुकास्पद आहे.

कवि माधव व कवि तिवारी यांच्या काव्यरचनेच्या काळांतच विदर्भांतील व महाराष्ट्रांतील अनेक कवि राष्ट्रीय व ऐतिहासिक स्वरूपाची काव्यरचना करीत होते. पण १९२० नंतरच्या काळांत ऐतिहासिक कविता तितक्या उत्कट भावनेने प्रगट होऊं शकली नाही. एक तर १९२० नंतर राजकारणाचें स्वरुप बदलले. टिळकयुग संपून राजकारणांत गांधीयुग सुरू झालें होते. टिळकांच्या लढाऊ राजकारणाचा भर ओसरला—स्वाभाविक शिवकालांतील लढाऊ राजकारणाचा आश्रय घेऊन लोकांच्या अन्तःकरणांतील स्वातंत्र्येच्छा प्रबळ करण्याची वृत्ति पण मंदावली. शिवाय या काळांतील कवींवर रविकिरण-मंडळांतील कवींच्या काव्याचा फार मोठा पगडा बसला. रविकिरणमंडळांतील सदस्यांच्या काव्यांत वैयक्तिक भावजीवनाचा प्रत्ययच अधिक येतो. त्यांत

सामाजिकता असे—पण ती विशेषेकरून मध्यमवर्गीय जीवनापुरती मर्यादित. त्यांच्या काव्यांत राष्ट्रीय भावना व्यक्त झाल्या—पण त्याहि अगदी माफक प्रमाणांत. त्यामुळे इतिहासकालीन घटनांकडे कवि गोविंद–किंवा बॅ. सावरकरांच्या वृत्तीने ते पाहूं शकले नाहीत. कवि यशवंतांच्या सुरवातीच्या काव्यांत थोडीफार ही वृत्ति दिसते. ‘ स्वातंत्र्यलक्ष्मीला मुजरा ’ करतांना किंवा ‘ मांडवी ’ च्या तीरावर भटकतांना त्यांना इतिहासाची आठवण होते, ‘ देहाचा पूल ’ सारखी एकादी ऐतिहासिक कविताहि ते लिहून जातात. पण ती त्यांची स्थायी वृत्ति नव्हे. गिरीशांनाहि ‘ शनवारवाड्या ’ चें उध्वस्त स्वरूप पाहून किंवा ‘ समर्थाचे चाफळ ’ पाहून गतेतिहासाची आठवण होते. माधव ज्युलियनच्या बाबतींत तेंच म्हणतां येईल. ‘ भ्रांत तुम्हा का पडे ? ’ ‘ पुरुषाची छाती ’ अशासारख्या कविता त्यांनी लिहिल्या असल्या तरी इतिहासाकडे त्यांचे तितकेसें लक्ष गेलें नाही. हा काळच मुळी भावगीतपर रचनेला अधिक अनुकूल होता–बहुतेक कवि वैयक्तिक किंवा सामाजिक सुखदुःखाचे सूर आळविण्यांत गुंतले होते. काव्यांत अनेक प्रयोग झाले–तंत्रदृष्ट्या व सौंदर्यदृष्ट्या या काळांत काव्य अधिकाधिक रेखीव व सुंदर बनूं लागले. ऐतिहासिक काव्याच्या दृष्टीने मात्र या काळांत फार थोडी भर पडली.

अनंततनय, अज्ञातवासी, आनंदराव टेकाडे, ना. के. बेहेरे, ज. के. उपाध्ये, बोबडे इत्यादि कांही कवींचीं नांवें या संदर्भात उल्लेख करण्यासारखी आहेत. त्यापैकी अनंततनयाची कविता विविध विषयावर आहे– ऐतिहासिक कथाकाव्यें हा त्यांतील एक लहानसा भाग आहे. इतिहासांतील चटकदार प्रसंग निवडून कथाप्रसंग सजविण्याचें कौशल्य यांच्या लेखणींत कांही प्रमाणांत आढळते. ‘ गोखल्का बापू है ’ ‘ कल्याणची कल्याणी ’ ‘ केवळ स्वराज्यासाठी ’ अशा कांही कवितांचा उल्लेख करतां येण्यासारखा आहे. पण एकंदर त्यांच्या काव्यांत उत्कटता कमी; बाह्य-वर्णनाचें अंग मात्र नीट सजविण्याचा त्यांनी प्रयत्न केल्याचें दिसतें. त्या मानाने अज्ञातवासींच्या कवितेंत ओजोगुण अधिक आहे. एक तर इतिहासाकडे पहाण्याची त्यांची दृष्टि उत्कट अभिमानाची आहे, पण

इतिहासांतील पराक्रम अवलोकन करतांना वर्तमानकाळाविषयी उसासेच त्यांच्या काव्यांत अधिक आढळतात. त्यामुळे कवि विनायकाप्रमाणें भूतकाळाविषयी त्यांना विलक्षण आकर्षण वाटते. ‘ सरदार धन्य एवढा ’ ‘ नवलाख झुले लष्कर ’ किंवा ‘ गडावर चढे मर्द फाकडा ’ ‘ पुणे दरबारीं ’ अशासारख्या त्यांच्या कवनांतून भावनेची उत्कटता व भाषेचा जोरदारपणा चांगला प्रत्ययाला येतो. या काळांतील ऐतिहासिक कवितेंत भावनोत्कटतेच्या दृष्टीने त्यांच्या कवितेचा दर्जा बराच उंच आहे असें त्यांच्या ऐतिहासिक कविता वाचतांना वाटल्यावाचून रहात नाही.

आनंदराव टेकाडे आणि ना. के. बेहेरे यांनी विपुल काव्यलेखन केलें असलें तरी त्यांची ऐतिहासिक कविता फार थोडी आहे आणि तीहि विशेष उल्लेखनीय नाही. टेकाडे हे प्रामुख्याने ‘ राधाकृष्णा ’चे कवि आहेत असें वाटतें. ‘ आनंदकंद ऐसा । हा हिंददेश माझा । ’ हें त्यांचें कवन एकावेळी पुष्कळच लोकप्रिय झालें होतें. पण देशभक्ति हा त्यांच्या कवनांचा स्थायीभाव नाही. त्यामुळे ‘ राघो भरारी ’ ‘ बाल शिवाजी ’ ‘ राज्याभिषेक ’ ‘ संग्राम ’ अशासारख्या कांही कविता सोडल्या तर ऐतिहासिक म्हणून गणल्या जाणाऱ्या त्यांच्या फारशा कविता नाहीत—आणि वर उल्लेखिलेल्या कविताहि सामान्यच आहेत. ना. के. बेहेरे यांच्या ऐतिहासिक कवनांविषयी हेंच म्हणतां येईल. ‘ **मराठ्यांच्या धडाडीचें सदा राहे मनीं ध्यान** ’ असे उद्गार त्यांनी काढलें असलें तरी त्यांच्या ऐतिहासिक कविता सामान्यच आहेत. बोबडे व उपाध्ये यांच्या कविता संख्येने थोड्या आहेत व त्यांतहि ऐतिहासिक अशा दोनतीनच असतील. प्रचलित राजकारणावर या सर्वांनीच कविता लिहिल्या आहेत. त्यांच्या राष्ट्रीय वृत्तीचा आविष्कार थोड्या फार प्रमाणांत अशा कवितांतून झाला आहे.

ऐतिहासिक स्वरूपाचीं दीर्घ कथाकाव्यें रचण्याचा प्रयत्नहि या काळांत बराच झाला. गो. रा. हिंगणेकर यांची ‘ पावनखिंड ’ व ‘ दख्खनचा वीर ’ हीं काव्यें, निफाडकरांची ‘ सतीचा शाप ’ व ‘ सोनपत पानपत ’ हीं काव्यें, य. खं. कुलकर्णी यांचे ‘ नरवीर मालुसरे ’ हें काव्य, बाळकृष्ण कोटणीस

इतिहासांतील पराक्रम अवलोकन करतांना वर्तमानकाळाविषयी उसासेच त्यांच्या काव्यांत अधिक आढळतात. त्यामुळे कवि विनायकाप्रमाणें भूतकाळाविषयी त्यांना विलक्षण आकर्षण वाटते. ' सरदार धन्य एवढा ' ' नवलाख झुले लष्कर ' किंवा ' गडावर चढे मर्द फाकडा ' ' पुणे दरबारीं ' अशासारख्या त्यांच्या कवनांतून भावनेची उत्कटता व भाषेचा जोरदारपणा चांगला प्रत्ययाला येतो. या काळांतील ऐतिहासिक कवितेंत भावनोत्कटतेच्या दृष्टीने त्यांच्या कवितेचा दर्जा बराच उंच आहे असें त्यांच्या ऐतिहासिक कविता वाचतांना वाटल्यावाचून रहात नाही.

आनंदराव टेकाडे आणि ना. के. बेहेरे यांनी विपुल काव्यलेखन केलें असलें तरी त्यांची ऐतिहासिक कविता फार थोडी आहे आणि तीहि विशेष उल्लेखनीय नाही. टेकाडे हे प्रामुख्याने ' राधाकृष्णा 'चे कवि आहेत असें वाटतें. ' **आनंदकंद ऐसा । हा हिंददेश माझा ।** ' हें त्यांचें कवन एकावेळी पुष्कळच लोकप्रिय झालें होतें. पण देशभक्ति हा त्यांच्या कवनांचा स्थायीभाव नाही. त्यामुळे ' राघो भरारी ' ' बाल शिवाजी ' ' राज्याभिषेक ' ' संग्राम ' अशासारख्या कांही कविता सोडल्या तर ऐतिहासिक म्हणून गणल्या जाणाऱ्या त्यांच्या फारशा कविता नाहीत—आणि वर उल्लेखिलेल्या कविताहि सामान्यच आहेत. ना. के. बेहेरे यांच्या ऐतिहासिक कवनांविषयी हेंच म्हणतां येईल. ' **मराठ्यांच्या धडाडीचें सदा राहे मनीं ध्यान** ' असे उद्गार त्यांनी काढलें असलें तरी त्यांच्या ऐतिहासिक कविता सामान्यच आहेत. बोबडे व उपाध्ये यांच्या कविता संख्येने थोड्या आहेत व त्यांतहि ऐतिहासिक अशा दोनतीनच असतील. प्रचलित राजकारणावर या सर्वांनीच कविता लिहिल्या आहेत. त्यांच्या राष्ट्रीय वृत्तीचा आविष्कार थोड्या फार प्रमाणांत अशा कवितांतून झाला आहे.

ऐतिहासिक स्वरूपाचीं दीर्घ कथाकाव्यें रचण्याचा प्रयत्नहि या काळांत बराच झाला. गो. रा. हिंगणेकर यांची ' पावनखिंड ' व ' दख्खनचा वीर ' हीं काव्यें, निफाडकरांची ' सतीचा शाप ' व ' सोनपत पानपत ' हीं काव्यें, य. खं. कुलकर्णी यांचे ' नरवीर मालुसरे ' हें काव्य, बाळकृष्ण कोटणीस

यांचें ' अन्तर्भेद ' हें काव्य—अशी अनेक खंडकाव्यें या काळांत निर्माण झालीं. त्यांतील हिंगणेकरांचें ' पावनखिंड ' हें अधिक ओजस्वी वाटतें. मराठ्यांच्या इतिहासांतील हा अत्यंत स्फूर्तिदायक प्रसंग कवीने मोठ्या प्रभावी वाणीने वर्णिलेला आहे. कथानकांत सह्याद्रि, विशाळगड, पन्हाळगड इत्यादि स्थलांची वर्णनें—बाजी प्रभूच्या शेवटच्या घनघोर संग्रामाचें वर्णन ...हीं सर्व अतिशय परिणामकारक वाटतात. इतर खंडकाव्यांत उल्लेखनीय असें कांही नाही. संस्कृत महाकाव्याच्या पद्धतीवर ऐतिहासिक खंडकाव्य लिहिण्याचा प्रयत्न राधारमण या कवींनीहि केला. ' फडणीस '—हें त्यांचें खंडकाव्य या दृष्टीने उल्लेखनीय आहे. सोलापूरचे राष्ट्रीय कवि ' कुंजविहारी ' यांच्या तेजस्वी ऐतिहासिक कवितांचाहि मुद्दाम उल्लेख करावयास हवा.

ऐतिहासिक काव्याचें जें जुनें स्वरूप—पोवाडा—हाहि गेल्या पन्नास वर्षांत पुन्हा उदयाला आला. या पोवाड्यांची रचना जुन्या पोवाड्याहून फारशी भिन्न नाही. भाषा शाहिरी काव्याला अनुरूप अशी जोरदार व आवेशयुक्त. वीररसाचा आविष्कार या पोवाड्यांतून परिणामकारक रीतीने केला जाई. या पोवाड्यांच्या निर्मितीला स्वातंत्र्याची उत्कट लालसा व पारतंत्र्याविषयी वाटणारी विलक्षण चीड याच गोष्टी कारणीभूत झाल्या. विशेषतः हजारो लोकांच्या अन्तःकरणांत देशभक्तीची भावना प्रज्वलित करण्यास पोवाडे हे परिणामकारक माध्यम होते व त्याचा उपयोग या काळांतील शाहीरांनी चांगला करून घेतला. ऐतिहासिक प्रसंगांवर तर त्यांनी पोवाडे रचलेच पण प्रचलित राजकारणावरहि पोवाडे रचून त्यांनी लोकांच्या अन्तःकरणांतील देशभक्तीच्या भावना हालविल्या. पोवाडे रचणाऱ्या शाहिरांत शाहीर खाडिलकर, शाहीर नानिवडेकर, शाहीर जामखेडकर, शाहीर गोविंदराव देसाई, शाहीर रामभाऊ दळवी, शाहीर मुचाटे इत्यादि शाहिरांचा मुद्दाम उल्लेख केला पाहिजे. यापैकी पुष्कळच शाहिरांचे पोवाडे त्या त्या वेळी पुस्तिकांच्या रूपाने प्रसिद्ध झाले होते. बॅ. सावरकरांनीहि नरवीर तानाजी आणि बाजी देशपांडे यांच्यावर पोवाडे रचले होते. लोकजागृतीचें साधन म्हणून आजहि या काव्यप्रकाराचा परिणामकारक रीतीने उपयोग केला जातो.

आजच्या मराठी काव्यांत ऐतिहासिक काव्याला फारसें स्थान राहिलें नाही. कुसुमाग्रजापासून आजच्या मंगेश पाडगांवकरपर्यंतच्या कवींच्या

काव्याचें अवलोकन केलें तर ऐतिहासिक स्वरूपाची कविता त्यांनी फारशी केली नाही असें सहज दिसून येईल. वास्तविक कुसुमाग्रजांच्या काव्यापासून मराठी काव्यांत नवी चेतना आली आहे. ती अधिक बहिर्मुख होऊं लागली आहे; मानवतेचा ती हिरिरीने पुरस्कार करूं लागली आहे; दलितांचीं दुःखें ती जवळून पाहूं लागली आहे आणि त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाबद्दल चीड व्यक्त करूं लागली आहे; विषमतेविरुद्ध तिने बंड पुकारले आहे आणि नवी समाजरचना अमलांत यावी म्हणून ती क्रान्तीच्या गर्जना करूं लागली आहे, रुद्रास व भैरवास आवाहन करूं लागली आहे. अगदी नवी कविता तर यंत्रयुगामुळे मानवी जीवनांत आलेल्या विफलतेचें अत्यंत विदारक व भयानक चित्र रंगवूं लागली आहे. या नव्या कवींच्या काव्याकडे बघतांना एक गोष्ट चटकन् दिसून येते. त्यांना स्वप्नरंजन नको आहे; गत-कालांतील पूर्वजांच्या पराक्रमांचीं वर्णनें करून त्यांतच रमून जाणें व भूतकालांतील रम्य गोष्टींच्या तुलनेने वर्तमानकाळाबद्दल विषाद व्यक्त करणें या गोष्टी पूर्वीच्या कवींनी केल्या. 'परकीय सत्तेशी झुंज देऊन देशाची पारतंत्र्यांतून सुटका करणें' हेच महत्त्वाचें ध्येय त्यावेळी जनतेपुढे व पुढाऱ्यांपुढे होते. त्यामुळे पारतंत्र्याबद्दल वाटणारी चीड व्यक्त करण्यासाठी पूर्वीच्या इतिहासाचा त्यांनी आश्रय घ्यावा हें क्रमप्राप्त होतें. पण आज अनेक प्रश्नांनी आपलें जीवन गुंतागुंतीचे झाले आहे. पारतंत्र्याचा प्रश्न हा अनेक प्रश्नांपैकी एक प्रश्न होता–आणि तोहि आता सुटला. पण त्यापेक्षा निराळे असे कितीतरी प्रश्न आज राष्ट्रापुढे उभे आहेत–विश्वबंधुत्वाच्या पातळीवरून आज आपले कवि सर्व जगाला आवाहन करण्याचा प्रयत्न करीत आहेत. तो प्रयत्न दुबळा असेल, या प्रश्नाच्या विराट स्वरूपापुढें आजचे कवि गोंधळूनहि गेले असतील, पण हा प्रयत्न मोठा उदात्त आहे यांत शंका नाही. त्यामुळेच इतिहासाची त्यांना तितकीशी आठवण न झाल्यास नवल नाही.

१९५३ पर्यंतच्या मराठींतील ऐतिहासिक काव्याचें स्वरूप स्थूलमानाने हें असें आहे. हा आढावा पहातांना एक गोष्ट ठळकपणें लक्षांत येते. ती म्हणजे आतापर्यंतच्या बहुतेक कवींनी काव्यासाठीं शिवकालावरच अधिक

भर दिला आहे. पेशवे कालाकडे त्या मानाने त्यांचें लक्ष कमी प्रमाणांत गेलें आहे. यादवकाल, विजयनगरच्या साम्राज्याचा काल किंवा त्याहि पूर्वीचा गुप्त काल याकडे आपल्या कवींचें फारसें लक्ष गेलेलें दिसत नाही. त्याचें कदाचित् एक कारण असेल. पारतंत्र्याचीं दुःखें अनुभवीत असतांना कवींचें लक्ष स्वाभाविकच इतिहासकालीन स्वातंत्र्याच्या लढ्याकडे गेले असेल व त्यामुळे आपल्या काळाला स्फूर्तिप्रद ठरेल या दृष्टीने शिवकालावरच आपली नजर त्यांनी अधिक केन्द्रित केली असेल. शिवकालीन स्वातंत्र्याच्या लढ्यांत त्यांना स्वातंत्र्यलढ्याची स्वप्नें दिसलीं व तीं साकार करून त्यांनी जनतेमध्ये नवचैतन्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी शिवकालाचाच त्यांना जास्तींत जास्त उपयोग करून घेण्यासारखा होता. खरें सांगावयाचें म्हणजे मराठींतील बरीचशी ऐतिहासिक कविता पारतंत्र्याच्या प्रतिक्रियेंतून निघाली आहे असें म्हटलें तर त्यांत अतिशयोक्ति होणार नाही. त्याचा परिणाम असा झाला आहे की पूर्वजांचे पराक्रम गातांना स्वकालीन गुलामगिरीबद्दल उमटणारा विषादाचा सूरहि बहुतेक काव्यांतून व्यक्त झाला आहे. त्यामुळे कवि इतिहासकालीन घटना रंगवीत असतांनाच स्वकालीन परिस्थितीचे रंग त्यांत अनेक वेळा मिसळत असतो. त्या विशिष्ट परिस्थितींत तसें करणें योग्य होतें हें खरें—पण त्यामुळे त्या काव्याला कालाच्या मर्यादा पडलेल्या आहेत हें विसरून चालावयाचें नाही. प्रचाराचें व लोकजागृतीचें साधन म्हणून इतिहास व काव्य हीं दोन्ही त्यांनी शस्त्रविद्यासारखी वापरतात. आज तीं काव्यें वाचतांना कवीच्या देशभक्तीचें व उत्कट भावनेचें कौतुक वाटत असलें तरी स्वकालीन भावनेचे सूर मूळ कथेशी विसंगत वाटल्यावाचून राहात नाहीत.

त्यामुळे कलात्मक दृष्टिकोनांतून खरी ऐतिहासिक कविता फार थोडी लिहिली गेली आहे असें विधान करावेसें वाटतें. वास्तविक संभाजी–राजाराम–पहिला बाजीराव यांच्या जीवनांत काय संघर्ष कमी होते ? गुप्तांच्या, देवगिरीकरांच्या किंवा विजयनगरच्या राजवटीचा इतिहास काय कमी रोमहर्षक होता ? पण तिकडे त्यांची दृष्टि वळली नाही याचें कारण इतिहासाकडे पहाण्याची त्यांनी एकच एक दृष्टि ठेवली होती. ती म्हणजे

इतिहासाच्या सहाय्याने लोकजागृति करावयाची. त्यामुळे निव्वळ काव्यदृष्टीने त्यांना इतिहासाकडे पहाताच आले नाही. ज्यांनी पाहिले त्यांच्या प्रतिभेचें स्वरूप मर्यादित होते. शिवाय दीर्घकाव्याची रचनाहि हळूहळू मागे पडत चालली होती—वस्तुनिष्ठ कवितेकडे अधिकाधिक दुर्लक्ष होत होते—प्रतिभासंपन्न कवींनी इतिहासाकडे पाठ फिरविली होती—सामान्य कवींनी स्वकालीन भावनेचा अभिनिवेश त्यांत आणला होता. त्यामुळे ' सजिव कलाकृति ' असें ज्याला आपण म्हणूं तशी ऐतिहासिक काव्यक्षेत्रांत निर्माण होऊंच शकली नाही. सावरकरांचें ' कमला ' काव्य कदाचित् त्या पदवीला पोहोचलें असते—तें पुरे झालें असतें तर!

पूर्वजांचे पराक्रम गाणाऱ्या शाहिरांची राष्ट्राला दोन वेळां गरज असते. एक अत्यंत उन्नतीच्या काळीं लोकांना रिझविण्यासाठीं व एक अत्यंत अवनतीच्या काळीं लोकांना स्फूर्ति देण्यासाठीं. अवनतीचा काळ आता संपला—स्वातंत्र्य मिळाले—आता या काळांत एका विशिष्ट अभिनिवेशाने पूर्वेतिहासाकडे पहाण्याची गरज उरली नाही. नव्या उत्साहाने व आशेने आपल्या राष्ट्राचें पाऊल पुढे पुढे पडत आहे. अशा वेळीं पूर्वजांच्या स्मृतींना आदराञ्जलि वाहण्यासाठी एकाद्या कलावंताची नजर जर पूर्वेतिहासाकडे वळली व त्यांतून त्याने एकादी सुंदर कलाकृति निर्माण करून आपणापुढे ठेविली तर ती आज आपणाला हवी आहे. असा कलावंत आज जर पुढे आला तर त्याचें स्वागत करावयास रसिकवर्ग सिद्ध आहे.

—*—

अनुक्रम २.८.३५
२५/१२४

## मराठ्यांचीं
# संग्राम-गीतें

## हिंदूंचा हिंदुस्थान.

ब्राह्मण ब्राह्मणेतर वा मुसलमान, हिंदू जैन
पारशी शीख वा बौद्ध बहुधर्मश्रद्धावान
आह्मी भारत-भू-पुत्र अंतरांत जाणूं ह्मण
बंधु बंधु यांच्या कलहीं
जरि शिरला कोणी गेहीं
उसळून बोलुं सारेही—
"पाय काढ गेहांतून हिंदूंचा हिंदुस्थान!" १

"दोघांचें भांडण लाभ तिसऱ्याचा," ही ह्मण ठावी;
ना तुला, न मजला पोळी श्वानाला कां वाढावी?
नीच-वृत्तिनें परहस्तीं जन्मभूमि केवीं द्यावी?
स्वर्गलोक सुरलोकांचा
पाताळ नागलोकांचा
अभिमान तयांना त्यांचा
अमुचाहि हा अभिमान 'हिंदूंचा हिंदुस्थान'! २

उन्नत त्या हिंदुकुशाला हिंदीमहासागर त्याला
वा प्रचंड सिंधुनदाला ब्रम्हपुत्र—नद जो त्याला
जा पुसा, तुम्हा ऐकाया येईल श्रुतिवचमाला
जेथलें ज्ञान मिळवोनी
जाहलें जगत् सज्ञानी
यद्यशो—दुंदुभि श्रवणीं
ऐकाया येतो अजुन हिंदूंचा हिंदुस्थान ! ३

जो हिमाचलानें शोभे हिमगिरिही ज्यानें शोभे
जो भागीरथिनें साजे भागीरथि ज्यानें साजे
जो भरतकीर्तिनें गाजे भरतकीर्ति ज्यानें गाजे
धर्माच्या क्रांतीकालीं
विश्वनाथ वेळोवेळीं
प्रगटला जिथें जयशाली
कवण देश कीर्तिवान ? हिंदूंचा हिंदुस्थान ! ४

यत्कीर्ती—हंसी उठली ब्रम्हलोकिं जाउन ठेली
वाहन जो हंस विधीचा त्याशीं रत होउन वळली
येतांना स्वर्गंगेंत ती प्रसूत साध्वी झाली
धवलांग चंद्र हा नोहे
हें तदंड विलसत आहे
पितृलोक जयावर मोहे
ऐसा सद्यश—संपूर्ण हिंदूंचा हिंदुस्थान ! ५

भू-ग्रह-गोलाच्या भंवती घेऊन उपग्रह--रूप
कां प्रदक्षिणा घालितसे रजनीचा नाथ समीप?
ज्योतिर्विद् ग्रहविद् ज्ञानी कारणें वदोत अमूप
मज कारण वाटे एक
मणि महि—कंठांत सुरेख
भाळला तयास शशांक
तो मणी कोणता छान हिंदूंचा हिंदुस्थान! ६

या भारत--भूच्या पोटीं जाहला जयांचा जन्म
जाहल्या तदंकीं ज्यांच्या मधु शैशव-लीला पूर्ण
हृदयांत खळाळे रक्त पाहतां तिचें दुर्दैन्य
पुत्र ते तिचे झटतांना
जे पराभिलाषी त्यांना
छळिती त्या दुर्वृत्तांना
इतुकेंहि नसावें ज्ञान हिंदूंचा हिंदुस्थान! ७

# लववेना हें शिर मातें !



"बाळ शिवबा! तुला आग्रहानें दरबारीं नेलें पण तेथें तूं सुल्तानाला सलाम केला नाहीं; ऐकतें"! असें वीरमाता जिजाईनें विचारल्यावरून बाल शिवाजी म्हणतातः—

* * *

होतात देउळें नष्ट होतात देवता भ्रष्ट
धेनु ब्राह्मण ओरडती धर्मावरती संकष्ट
न्याय नीति उरली नाहीं सारेच भोगिती कष्ट
हा घोर मांडिला ज्यांनीं
त्यांचिया पुढें जावोनी
देशाभिमान सोडोनी
प्रेमाच्या मंगल माते! लववेना हें शिर मातें! १

तूं सांग!--तुझ्या चरणाशीं ही तोडुन ठेवीन मान!
तूं सांग!-- तात--चरणाशीं कापोनी ठेविन मान!

गोब्राह्मण यांच्या करितां खड्गावर ठेविन मान !
परि परके सत्ताधारी
गृहिं शिरून झाले वैरी
बघतांच तयांना भारी—
सक्रोध वृत्ति मम होते लववेना हें शिर मातें ! २

मी म्हणतां 'नाहीं नाहीं' दरबारीं नेलें आई !
जों आंत शिरोनी पाही तों चढून गेली भुवई !
भुजऱ्याला हात न वाही शिर लववूं शकलों नाहीं !
हें सिंहासन कोणाचें ?
हें वैभव तरी कोणाचें ?
काहूर मनीं प्रश्नांचें
अपहारीं नृपसत्तेतें लववेना हें शिर मातें ! ३

एकटाच रात्रीं बसतों मी जन्मभूस आठवतों !
ढळढळा आइ‌ गे ! रडतों त्वेषानें क्षणिं संचरतों !!
झोंपेंत देशबंधूंच्या दुःखानें दचकुन उठतों !!!
बोलते भवानी " ऊठ ?"
बोलते जन्मभू " ऊठ ?"
" धर समशेरीची मूठ !"
अवमानुन त्या आज्ञेतें लववेना हें शिर मातें ! ४

देशाचा राजा नाहीं राजनिष्ठ राहूं कैसा ?
धर्माचा राजा नाहीं राजभक्त होऊं कैसा ?

या उलट्या बोध-गळातें जीवाचा अडके मासा !
ज्या शिरीं भार देशाचा
ज्या शिरीं भार धर्माचा
कर्तव्यें वाहायाचा
विसरून देशधर्मातें लववेना हें शिर मातें ! ५

स्वाभिमान सुटला ज्यांचा देशभक्ति सुटली ज्यांची
कुलकीर्तीचा इतिहास स्मृति देइ न उज्ज्वलतेची
वाढवोत ते ते शोभा दास्याच्या दरबाराची
" उद्दाम " म्हणो कुणि मातें
कीं करोत उपहासातें
परि जागोनी स्वत्वातें
हिंदद्वेषी तख्तातें लववेना हें शिर मातें ! ६

सुलतान जाहला क्रुद्ध उमराव जाहले क्रुद्ध
जातिवंत झाले स्तब्ध जनकही होय हतबुद्ध
परि तुझी आणि अंबेची शिरीं कृपा असावी शुद्ध
मावळचे जमवुन भाई
स्थापीन मराठेशाही
हालवीन आदिलशाही
बोलतों सत्य जें गमते लववेना हें शिर मातें ! ७

# " जय जय रघुवीर समर्थ "

प्रबल यवन झाले होते  वंद्य या महाराष्ट्रांत
आक्रंदत होता धर्म  परसत्तेच्या दारांत
शौर्य धैर्य रुपलें होतें  पर सेवेच्या पंकांत
ऐशा वेळीं कल्याणी—
धीराची केवळ खाणी
श्रीसमर्थ सद्‌गुरुवाणी
दुमदुमली हो सर्वत्र  " जय जय् रघुवीर समर्थ "  १

भोसले--कुलोत्तम शिष्य  हा ब्राम्हण सद्‌गुरु होता
तो राजविभव--संपन्न  हा विरक्त साधु होता
ब्रह्म क्षत्रिय तेजाचा  हा अपूर्व संगम होता
संकटास ज्या देखोनी
शंकितही होय भवानी
तेथें गर्जे गुरु-वाणी
देशाच्या कल्याणार्थ  " जय जय रघुवीर समर्थ "  २

" जोमांत निघाला खान  सरदार विजापुरवाला
शिवनेरीच्या शिव-सिंहा !  हो सावध झुंजायाला
भिडव तो मराठी भाला  नाचत्या चंद्रकोरीला "
या वार्ता पोंचविणारे
भगव्या वस्त्रें फिरणारे

शिष्य जे मठाचे प्यारे
ते घोषत होते मंत्र "जय जय रघुवीर समर्थ" ३

घेवोनी गरुड–भरारी शत्रूच्या सदनीं शिरावें
हिंदवी राज्यवैरांचें फळ दुष्टांना अर्पावें
मिरवीत राज्यलक्ष्मीला निज-रायगडीं चढवावें
आशिर्वच देइ जिजाई
गुरुदर्शनेच्छु नृप होई
गिरिवनांत विचरे पायीं
प्रगटे वाणी भक्तार्थ "जय जय रघुवीर समर्थ" ४

सह्याद्रींतिल मावळचे कडनिकडीचे झुझार
एकेक लाख मोलाचा शिवशाहीचा सरदार
थाटला अशा वीरांनीं शिवसर्जाचा दरबार
तों दंडकमंडलुधारी
कफनीला शोभविणारी
प्रगटतां समर्थ--स्वारी
ध्वनी उमटले तेथ पवित्र "जय जय रघुवीर समर्थ" ५

पतिनिष्ठ मराठी ललना स्वांकावरि घेउनि बाळ
पुसते–" विजयी होईल ना तव तात संगरीं बाळ?"
"हो" शब्द अहेतुक वदतां करि लाल मुक्यानें गाल
इतुक्यांत अतिथि कुणि आला
सति ठेवोनी पुत्राला

कर—भिक्षा घाली त्याला

तद्ध्वनि शकुनाचा मित्र " जय जय रघुवीर समर्थ " ६

ही वाणी म्हणजे जननी धर्माच्या अभिमानाची
संजीवनि दुर्लभ मात्रा ऐक्याच्या सद्भावाची
यक्षिणीच केवळ गमली राष्ट्राच्या उद्धाराची

त्या काळाची स्मृति होते
या कालाला मन विटतें
मागें हो धांवत जातें

परिसतां आज मंत्रार्थ " जय जय रघुवीर समर्थ " ७

---

# कल्याणी कल्याणाची

शिवाजी महाराजांनीं कोंकणच्या घाटांतून विजापूराकडे जातांना कल्याणचा खजिना लुटला. तिकडे आबाजी सोनदेवानें कल्याण प्रांतावर हल्ला चढवून तेथील सुभेदार अहंमद मुल्ला यास गोटासह लुटला. त्या गर्दीत मुल्लाची रूपसंपन्न सून सांपडली. तिला महाराजांस अर्पण करण्याकरितां त्यांजकडे आणिलें. त्या नीतिमान व शीलवान राजानें तिला वस्त्र-भूषणें देऊन तिची पतीकडे रवानगी केली !

कोंकणच्या घाटामध्यें　　कल्याणी खजिना आला
वाजलें खुणेचें शिंग　　शिवबाचा छापा पडला
तिकडे कल्याण प्रांतीं　　आबाजी चढवी हल्ला
गोटासह लुटला मुल्ला
बंदिस्त तयाला केला
धांवता जनाना धरिला
सांपडली सून तयाची　　कल्याणी कल्याणाची　　१

नैसर्गिक सुंदरतेनें　　युवती ती नटली होती
लावण्य—रसाची सीमा　　तद्वदनीं झाली होती
भूलोक बघाया खालीं　　जणुं परी उतरली होती
संयम वृत्तिहि लोल—
होवोनी, न धरी तोल
ऐसें तद्रूप अमोल
परमावधि विधि—कृतीची　　कल्याणी कल्याणाची　　२

हें सुंदर ललना रत्न निज शिव—प्रभूला द्यावें
भक्तीच्या पदरीं पाप आबाजी बांधी भावें
आणिली सभेमाझारी विस्मयें सभा तिज पाहे

धर्मबिंदु नटले भालीं
रक्तिमा विलसला गालीं
लज्जेनें पाही खालीं

मोहिनी मनोहरतेची कल्याणी कल्याणाची

मदनाचा मोहक बाग तेथील लता ती होती
दुःखाचा वाहून वायू जरी मलूल झाली होती
दर्शनें शांति--लहरींना अंतरीं उसळवित होती

धर्म--नीति यांचा दीप
भोसले कुलाचा भूप
सच्छील बघे निष्पाप

मोहकता चंद्रकलेची कल्याणी कल्याणाची ४

गोब्राह्मण--पालक वदला श्रवणीय मंगला वाणी
" जरि अशीच असती अमुची सुंदरा जिजाई जननी
रूपवान गणिलों असतों आम्ही लोक-वचांनीं

जरि हवी यशाची सिद्धी
स्त्री—हरणाची दुर्बुद्धी—
सोडोनी, राखा शुद्धी

ही माता भगिनी अमुची कल्याणी कल्याणाची ५

शत्रुवरी घाला घाले करुं नका परस्त्री—छलना
जय--लक्ष्मी खेंचुन आणा पारि आणुं नका पर-ललना
कुणिं घेउं नये निजशीर्षीं अबलांच्या अभिशापांना
भूषवुनी वस्त्राभरणीं
पाठवा पतीच्या सदनीं"
ही शिवभूपाची वाणी
ऐके निज कल्याणाची कल्याणी कल्याणाची ६

नीतिमंत शिव-भूपाल गाजला महाराष्ट्रांत
शीलवंत कुलवंताचें मोहवी मनाला चरित
गावोत शिवाचीं गाणीं कवि उत्साहें रसभरित
शिव उन्मत्तांचा वैरी
त्यांवरी तयाची स्वारी
पारि अबलांचा कैवारी
देतसे साक्ष सुगुणाची कल्याणी कल्याणाची ७

# " बेभान लढे नरसाळा. "

मोंगल सरदार षाहिस्तेखान यानें पुण्यास शिवाजी महाराजांच्या वाड्यांत तळ दिला. नंतर त्यानें लागलीच पुण्याच्या उत्तरेकडील १२ मैलांवरील चाकण किल्ल्यास जातीनिशीं वेढा घातला. ते पावसाळ्याचे दिवस होते. किल्ल्यावर फिरंगोजी नरसाळा नांवाचा महाराजांचा किल्लेदार होता. खानाची फौज अफाट होती हें लहानसें ठाणें सहज हातीं येईल अशी खानाची समजूत होती. त्यानें चाकणवर मोठ्या निकराचे हल्ले केले परंतु फिरंगोजीनें वरून सारखा मारा चालू ठेऊन तटाजवळ येणाऱ्या मोंगलांच्या ठिकऱ्या उडविल्या. यावेळीं श्रीशिवाजी महाराज पन्हाळगडावर अडकून पडले होते. यामुळें त्यांस चाकण किल्ल्याकडे मदत पाठवितां येईना. त्यांनीं फिरंगोजीस निरोप पाठविला कीं, " किल्ला लढवेल तितका शिकस्तीनें लढवा. " किल्लेदार नरसाळ्यानें खरोखर बेहद्द लढाई चालविली होती. आधींच पावसानें खानाच्या दारूसामानाची व धान्याची नासाडी झाली होती. त्यांत रात्रीच्या वेळीं किल्ल्यांतून अचानक छापे येत व याचवेळीं नेताजी पालकराच्या घोडदळाचे पाठीमागून हल्ले होत. यामुळें खान अगदीं जिकिरीला आला. त्यानें नेटानें सुरूंग लावून किल्ल्याच्या ईशान्य बाजूस खिंडार पाडिलें. खिंडाराच्या तोंडांतून मोंगल सैन्य आंत घुसत असतां तेथें फिरंगोजी नरसाळा बेभान होऊन लढला. आंगावर अनेक जखमा झालेला हा मावळा वीर लढतां लढतां धरला गेला. खानानें त्याचा बहुमान करून बादशाही चाकरीकरितां त्याचें मन वळविलें. परंतु स्वामिभक्त नरसाळ्यानें त्याच्या वचनाचा धिःक्कार केला. तरीही खानानें न रागावतां त्यास नांवाजून शिवाजी महाराजांकडे रवाना केलें. महाराजांनीं फिरंगोजीची पाठ थोपटून त्यास भूपालगडावर किल्लेदार नेमिलें.

शिवरायाच्या सदनांत म्लेंच्छानें वसती केली
दुर्गादुर्गाच्या हृदयीं इंगळी जणो ही डसली

खानाची विजय-पताका चाकणाकडे मग वळली
वाजे किल्ल्यांत नगारा
तो धारकऱ्यांस इषारा
सजला सजला गढ सारा
पेटतां रणाची ज्वाला बेभान लढे नरसाळा १

तो वर्षर्तूचा काल मेघांसह गर्जति तोफा
आधींच धुंद आकाश आगीच्या त्यांतच वाफा
अरि--सेना चवताळोनी घालिते तटावर झेपा
खालूनी चढला हल्ला
भडिमार वरोनी झाला
गोटांत बावटा फिरला
दुःखें दुस्मान म्हणाला 'बेभान लढे नरसाळा' २

हे परिमित गडकरि वरचे ते अगणित होते यवन
यांची परिमित सामुग्री त्यांना तर नव्हती वाण
शिवशाहीच्या भक्तीची होती परि चढति कमान
संदेश पन्हाळ्याहूनी
पाठविला शिवरायांनीं
"गढ लढवा शर्थ करोनी"
परिसोनी प्रभु वचनाला बेभान लढे नरसाळा ३

चौफेर पसरला गोट निजले गोटांत शिपाई
उघडलें दार किल्ल्याचें काळ्या रात्रीच्या समयीं

एकाकी घालिती छापा मावळचे कडवे भाई
शोधितो कुणी शस्त्राला
शोधितो कुणी वस्त्राला
कुणि सज्ज होय युद्धाला
रंग ये खडाजंगीला बेभान लढे नरसाळा ४

एक एक म्हणतां म्हणतां पेटल्या असंख्य मशाली
खानाच्या तंबूजवळी टिपरघाइ भारी झाली
काळोखी असुनी रात्र शौर्यानें उज्ज्वल केली
तों टापा घोडदळाच्या
नेताजी पालकराच्या
ऐकूं येती वेगाच्या
उत्साह भरे शूराला बेभान लढे नरसाळा ५

मागोनी घुसले भाले चमकल्या पुढें समशेरी
स्वारांच्या पायदळांच्या कैचींत सांपडे वैरी
विजयेच्छू षाहिस्त्याच्या धैर्याला आली घेरी
सांवरून अपुला तोल
फौजेचा बांधी गोल
" इन्शा अल्ला " चे बोल
बोलत जों पुढती आला बेभान लढे नरसाळा ६

गनिमी काव्याची खूण 'धुतुतू' गर्जे रणशिंग
पांगले मावळे सारे जाहला विपक्षी दंग

क्रोधानें थरथरणारे शय्येला लावि न अंग
निवडून बहाद्दर धीट
चालोनी गेला नीट
कोटाशीं केली लगट
सुटल्या वरुनी जेजाला बेभान लढे नरसाळा ७

मेघांचा पाऊस वरुनी दारूची करि नासाडी
आगीचा पाउस वरुनी सेनेची करि नासाडी
तळवटीं सुरंगीं काम निग्रही खान ना सोडी
ईशान्य दिशेला बार
जाहला भयंकर फार
पडलें पडलें खिंडार
चवताळुन तेथें आला बेभान लढे नरसाळा ८

रणबहिरी डंके शिंगें कडकडलीं खालीं वरतीं
'दीन दीन' आवेशाची लाट सरे पुढतीं पुढतीं
मावळचे कडवे वीर झुंजीवर झुंजी घेती
कुणि जांघेपासुन तुटला
कुणि शिरोविहीनचि झाला
कोणाचा हात उडाला
पाणी चढलें खड्गाला बेभान लढे नरसाळा ९

"शिवशाहीच्या भक्तांनों ! ही वेळ असे भक्तीची
मावळच्या अभिमान्यांनों ! ही घटिका अभिमानाची

तुमच्या बाहूवरि आहे अब्रु आज या चाकणची "
रसरसलेल्या शद्बांनीं
उत्तेजित गडकरि करुनी
खानाचा रोंख धरोनी
नीटच चालोनी गेला बेभान लढे नरसाळा १०

उजव्या बाजूला फटका दिधला, तों सैयद पडला
खड्गाची डावी फेक कोथळा अमीरी पडला
सांपडला जो मार्गांत निशद्ब त्यास निजवीला
रणकुंदळ जे सरदार
सरसावुनि ते हतियार
घालिती अचानक घेर
संताप चढे वीराला बेभान लढे नरसाळा ११

एका डाळिंबा भंवतीं शुक-पंक्ति जमाव्या जैशा
एका मोहोळावरतीं घोंगावत याव्या माशा
अफगाण बल्लूची तैसे मोंगल जमले तन्नाशा
देखिले विपक्षी अदय
वज्रासम केलें हृदय
मृत्यूचें गणिलें न भय
निर्वाणीच्या समयाला बेभान लढे नरसाळा १२

मर्द तो मुसंडी सरसा शेणसडा उडवूं लागे
ढालेवरि चापल्यानें घावांना झेलूं लागे

धावले धारकरि त्याच्या रक्षणास लागे वेगें
कल्लोळ उडाला भारी
झाली बहु मारामारी
हटला न वीर निर्धारीं
दलभंजक धुंद जहाला बेभान लढे नरसाळा १३

मांडींतुन गेली गोळी बाहूवरी बसला घाव
तापलें मराठी रक्त शेवटची घेई धाव
वैऱ्यांचा विळखा पडला द्वेषाचा केवळ भाव
पंचानन बद्ध जहाला
खानांच्या पुढती नेला
शूर तो वदे शूराला
'गातिल जन तव कीर्तीला बेभान लढे नरसाळा' १४

"हे भीम बहाद्दर वीरा! शाबास तुझ्या धैर्याची
अरि-हृदयींही मर्यादा वाढविली त्वां मानाची
करितों गौरव, तुज देतों मनसबी बादशाहीची"
"जो छलक महाराष्ट्राचा
त्या भजक काय शाहाचा
मी होऊं? धिक् ही वाचा
वदवीन पुन्हां वैऱ्याला 'बेभान लढे नरसाळा' १५

दिलदार मनाचा खान थाखाणी नरवीराला
सन्मान करुनि पाठवि तो भोसलेभूप-भक्ताला

थोपटी पाठ शिवराय  अश्रू येति तन्नयनाला

"नरसिंह तुम्ही नरसाळे'
बेहद्द शौर्य गाजविलें
यश तुमचें हें विस्तारिलें"

"चाकणचा किल्लेवाला  बेभान लढे नरसाळा"  १६

---

# "धाडसी गनीमी कावा!"

## ( षाहिस्तेखानावरिल छापा. )

औरंगजेबाचा सरदार षाहिस्तेखान हा इ.·स. १६६०त शिवाजीवर एक लक्ष सेनेनिशीं चालून आला. दिल्लीहून निघतांना त्यानें अशी प्रतिज्ञा केली होती कीं, 'शिवाजी महाराजास विलंब न लावतां मारुन गर्दीस मिळवितों.' त्यानें पुण्यास येऊन शिवाजी महाराजांच्या 'लालमहाल' नामक वाड्यांत तळ दिला. या त्याच्या धाष्टर्याची महाराजांना भारी चीड आली. आणि त्यांनी खानाला चांगलीच शिक्षा लावण्याचा बेत केला. अफजुलखानसारखा आपला घात होऊं नये म्हणून षाहिस्तेखानानें चौक्या पहाऱ्यांचा मोठा कडेकोट बंदोबस्त केला होता. तरी या दख्खनच्या धाडसी वाघानें त्याच्यावर अचानक झेंप घातलीच!

खानाच्या फौजेंतील मराठे सरदारांस वश करून घेऊन त्यांनीं त्याजकडून लग्नाची मिरवणूक काढवली आणि सिंहगडावरून दोनशें निवडक मावळे घेऊन ते त्या वरातींत जाऊन मिसळले! पुढें वरातींतून न कळत निघून खान उतरला होता त्या वाड्याची मागची भिंत फोडून ते आंत शिरले व तेथें त्यांनीं एकदम घाव घालण्यास सुरवात केली. हा छापा इतका भयंकर व उग्र होता कीं, जो जो सापडेल व दिसेल त्याचे तुकडे होत होते. खानाचा मुलगा ठार झाला. प्रत्येक पलंगावर मराठी झेंप जाऊन पोंचली. घाबरलेल्या व भेदरलेल्या दासींना व बेगमांना तरवारीवर रोंखून 'खान कोठें आहे?' म्हणून विचारण्यांत आलें. त्यांनीं खानाच्या पलंगाकडे बोट दाखवितांच त्याच्यावर महाराजांनीं प्राणघातक वार केला. परंतु खानानें प्राणभयानें घाबरून जवळच्या खिडकींतून उडी घेतली व तो वार हातावर झेलला त्यामुळें त्याचीं बोटें उडालीं!

अशी त्या वाड्यांत कत्तल उडवून महाराज बाहेर पडले आणि "गलीम कोठें आहे" असें ओरडत आपल्या लोकांसह धांवत सुटून शहराबाहेर आले व सिंहगडाच्या मार्गास लागले.

इकडे शत्रूस चकविण्याकरितां कात्रजच्या वाटेनें झाडांस व बैलांच्या शिंगास बांधिलेल्या दिवट्या पेटल्या म्हणून त्या दिशेनें शत्रू पाठलाग करूं लागला व महाराज मात्र गडावर सुखरूप पोंचले.

स्वातंत्र्य चिंतनीं जेथें झोंपेविण रात्री गेल्या
गोब्राम्हण-चिंता जेथें— रात्रंदिन बैसुनि केल्या
राज्यप्राप्तीच्या जेथें— योजना नियोजित झाल्या
त्या सदनीं शिरला खान
शिव-भूपास न साहून
तन्निश्चय झाला पूर्ण
"खानाला या दावावा धाडसी गनीमी कावा १

चिलखत चढवोनी अंगीं- घातला झगा त्यावरती
जमवून शिरस्त्राणाला- मंदील बांधिला भंवतीं
बिचवा डाव्या हातांत- उजव्यांत भवानी[1] होती
वीराग्रणि ऐसा सजुनी
अंबेला वंदन करुनी
बाहिर ये किल्ल्यांतूनी
नेत्रांत भरे देखावा— धाडसी गनीमी कावा २

अपुल्या स्वामीच्या साठीं संसार न ओळखणारे

[1] भवानी नांवाची तरवार

अपुल्या देशाच्या साठीं जीवाला तृण गणणारे
पाठीस उभे ते होते मावळी मराठी प्यारे
योजना तयांतुनि झाली
खिंडी खोऱ्यांच्या खालीं
उरलेली टोळी सरली
अश्वांसहि झाला ठावा 'धाडसी गनीमी कावा!' ३

ती दौड महाराष्ट्राच्या निधड्या छातीची होती!
ती लाट महाराष्ट्राच्या उज्ज्वल शौर्याची होती!
उन्मुख झालेली स्फूर्ती खड्गाग्रीं नाचत होती!
भूतल होतें निजलेलें
आकाश जागतें ठेलें
त्यांतून दौड ती चाले
कैसा शत्रूस कळावा धाडसी गनीमी कावा ४

कोंडाणा कंपित झाला रात्रही बोलली 'किर्र'!
लुकलुकणाऱ्या ताऱ्यांचें काळीज जाहलें चर्र!
एकलक्ष सेनेवरती दोनशें निघाले स्वार!
मर्द ते मराठी पूत
काळाचे केवळ दूत
घुसले चौक्या टाळीत
काळहि ज्याला दचकावा धाडसी गनीमी कावा ५

तें पुण्यपुरींतिल सदन ती गुहाच शिव–सिंहाची
हा खान मतंगज तेथें निजला, ही बुद्धि कैची

फोडून भिंत शिव शिरला चाहूल लागली त्याची
तेव्हां गोंधळ बहु झाला
दिसला जो जो नयनला
तो मुंड–विमोचित झाला
कोणत्या वचें वर्णावा धाडसी गनीमी कावा ! ६

प्रत्येक मंचकावरती पोंचली मराठी झेंप
सांपडला सुत खानाचा खड्गाला चढला कोप
खंडित जाहला तद्देह रक्ताचा शयनीं लेप
धावले पहारेवाले
उमरावहि उसळूनि आले
कबरेंचे स्वामी झाले
नव्हता शस्त्रास विसावा धाडसी गनीमी कावा ७

दासीस पुसतसे खड्ग 'दाखीव खान तो कोठें !'
बेगमेस पुसतें खड्ग 'दाखीव खान तो कोठें !',
स्वप्राणाच्या भीतीनें पर्यंकिं दाविती बोटें !
उसळलें खड्ग भूपाचें
तों दैवच कीं खानाचें
तुकडे झाले बोटांचे
ध्वनि उठला 'धावा ! धावा !' धाडसी गनीमी कावा ८
तो प्राणावरचा घाव चुकला, बोटांवर गेला
उडि घेइ गवाक्षामधुनी मृत्यूनें घाबरलेला
गर्दी झाली चहुंकडुनी गोटच तो जागा झाला

काढिला पाय तेथून
शत्रूच्या छातीवरुन
गेला शिव सिंह निघून
जो तो प्रगटवि या भावा धाडसी गनीमी कावा ९

वाजलीं खुणेचीं वाद्यें खिंडी खोऱ्यांतुनि रात्रीं
पेटले पोत एकाकी कात्रजच्या वाटेवरती
त्या खुणेवरी रिपु धावे रोवून दात अधरोष्ठीं
इकडे शिव सिंहगडाला
निर्वेध जाऊनी ठेला
साश्चर्य करी शत्रूला
शाहिरांनीं किति गावा धाडसी गनीमी कावा १०

---

# पावनखिंडीचा गाझी

श्री छत्रपती शिवाजी महाराज पन्हाळगडावर असतां विजापूरकरांचा सरदार सिद्दी जोहार यानें त्या किल्ल्यास वेढा घातला. चार महिने वेढा चालल्यावर त्या वेढ्याची कोंडी फोडण्याचा महाराजांचा निश्चय झाला. त्यांनीं निवडक मावळे वीर बरोबर घेऊन कर्तव्यवीर बाजीप्रभु देशपांडे यांसह काळोख्या रात्रीं परवलीची खूण सांगत व चौक्या पहारे टाळीत मैदान गांठलें. आणि विशाळगडाकडे तोंड वळवून घोड्यास टांच मारली. महाराज किल्ल्यांतून निसटल्याची बातमी शिद्दीच्या गोटांत हां हां म्हणतां पसरली. त्यासरसा अफजुलखानाचा मुलगा फाजलखान हा आपलें घोडदळ घेऊन महाराजांच्या पाठलागावर धांवला. विशाळगडाजवळील खिंडींत लगट होण्याचा रंग दिसतांच स्वामिनिष्ठ बाजीप्रभूनें महाराजांस आग्रहपूर्वक गड गांठण्यास सांगितलें व हा जवानमर्द प्रभुवीर खानाच्या आवेशी घोडदळाचा हल्ला परतविण्यास सज्ज झाला. त्यानें तात्काल जेजालांचे मोर्चे बांधून खिंडीच्या तोंडांत घुसलेल्या विजापुरी स्वारांवर आगीचा केवळ पाऊस पाडला. मागून आलेल्या पायदळास हटविण्या-करितां तो छातीचा कोट करून तरवार उपसून धांवला! या खणाखणीनंतर मुसलमानांच्या तिसऱ्या तुकडीच्या हल्ल्यांत तर या नरवीरानें स्वतःचें बलिदान केलें पण खिंडींत मुसलमानांचें पाऊल शिरूं दिलें नाहीं! इतक्यांत महाराज सुरक्षित पोहोंचल्याची खूण म्हणून किल्यावरून तोफांचे पांच बार झाले ते ऐकून त्याचा रणशय्येवरील उसळता देह शांत झाला, "मीं माझें कर्तव्य योग्य रीतीनें बजाविलें" हें त्या वीरश्रेष्ठाचें शेवटचें वाक्य होय.

गिरिदुर्ग पन्हाळ्यामाजी अडकला वाघ दख्खनचा
भंवताली वेढा पडला सिद्दीचा फाजलखांचा
रायाचा निश्चय ठरला ती कोंडी फोडायाचा

पर्वतापरी धैर्याचे
सागरापरी शौर्याचे
निवडिले मराठे साचे
सेनापति केला बाजी पावनखिंडीचा गाझी १

चाळीस हजारी गोट त्या गोटामधुनी जाणें
ही गोष्ट नव्हे सामान्य तळहातावर शिर घेणें
शौर्याच्या शिखरावरती धैर्याचें चढलें लेणें
त्या काळोख्या रात्रींत
परवलची खूण कथींत
शिव-पथक निघे चौकींत
प्रभुसन्निध चालवी बाजी पावनखिंडीचा गाझी २

निघतांच पाय बाहेर सर्पाच्या विळख्यामधूनी
मारिल्या हयांना टांचा खेळण्याकडे वळवोनी
टापांनी सावध झाला धांवला शत्रू मागोनी
सुटकेची धाव शिवाची
पकडीची धाव अरीची
चालली दौड शर्तीची
फुरफुरे अंतरामाजीं पावनखिंडीचा गाझी ३

खिंडीच्या तोंडाजवळ जाहली लगट यवनांची
स्वामिभक्ति गद्गद बोले हिरडसच्या कुलवंताची
" आपण जा पुढती राया अडवितो लाट वैऱ्याची "

शेवटचे मुजरे झाले
माऱ्याचे मोर्चे ठरले
मावळे टपोनी बसले
राखाया सजला बाजी पावनखिंडीचा गाझी ४

घेईन सूड जनकाचा क्रोधानें या भरलेला
फाजलखां घोडदळाचा टापांना उडवित आला
वदनावर विलसत होत्या भृकुटीच्या नर्तन-लीला
शिरला खिंडींत रिसाला
धडकल्या वरूनि जेजाला
आगीचा पाऊस झाला
रंगवी शैलवनराजी पावनखिंडीचा गाझी ५

कोणी तुरुगावर निजला कुणि तुरुगाखालीं पडला
अवसान-घातकी घोडा चढत्या घोड्याला अडला
घोड्यावरि पडलें प्रेत प्रेतावर घोडा पडला
जेजालांच्या फैरींचा
गहजब दोन्ही बाजूंचा
मांडुनी डाव पैजेचा
रंगला प्रभूच्या काजीं पावनखिंडीचा गाझी ६

खानाच्या घोडदळाच्या हृदयाचे तुटले बंद
पहिल्या चढतीचा झाला उत्साह मुखावर मंद
लज्जेच्या पदरीं लपला पकडीचा प्रथमानंद

मागून पायदळ आलें
खांडे-जमदाडावाले
खानाला खान मिळाले
सर्वांस अग्निनें भाजी पावनखिंडीचा गाझी ७

गर्जना करीतच जेव्हां खिंडींत पायदळ शिरलें
फोडीत डुरकण्या हा! हा! मावळे तुटोनी पडले
समशेरीला समशेर भाल्याला भाले भिडले
शिरतोड कमरकस्तीचे
घाव ते कटाछानीचे
चालले अहा बाजीचे
रक्ताच्या नटला साजी पावनखिंडीचा गाझी ८

ती खिंड नव्हे, मृत्यूचें विकराल वदनची होतें!
मृत्यू-स्वर्लोकामधलें कीं भुयार भीषण होतें!
मारणें स्वतां वा मरणें हटणें पारि ठाऊक नव्हतें
आधींच शिलामय घाट
त्यांतही शैलवन दाट
अडवि तो शवांनीं वाट
थांबवी न कत्तलबाजी पावनखिंडीचा गाझी ९

दोप्रहर जाहली झुंज प्रखर त्या शक्तिमंतांची
रेटून सारिली मागें सेना आदिलशाहीची
प्रभुवीर नरोत्तम धीरा! धन्य कूस तव जननीची

जोंवरी महाराष्ट्राचा
इतिहास शौर्यवीर्याचा
तोंवरी अमर बा ! सांचा

तूं रणकुंडाचा याजी पावनखिंडीचा गाझी १०

देशाच्या कार्यी पडले बाजीचे अर्धे लोक
खानाला पांच हजार सेनेचा घडला शोक
जाहली प्रतिज्ञा वंध्या पाऊल न शिरलें एक

आला जों त्वेष मनाला
रिपु करी पुढें तोफांला
आरंभ होय वृष्टीला

चळला न अग्निच्या तेजीं पावनखिंडीचा गाझी ११

हा तिसरा हल्ला होता मर्दुमकीच्या शर्थीचा
येथेंच खरा बाजीचा पोवाडा चिरकीर्तीचा
येथेंच उमटला लेख तेजस्वि महाराष्ट्राचा

तोफांच्या मारगिरींत
शिरतांच यवन बारींत
थडकला पुढें जोमांत

नर-मुंडांनी महि पूजी पावनखिंडीचा गाझी १२

मर्दाच्या आयुष्याची मर्यादा हा ! हा ! सरली
तोफेची चमक उडाली हृदयाला जाऊन भिडली
उलथोनी पडतां बाजी तनु एकानें सांवरिली

मजकडे नका कुणि पाहूं
बाहूला भिडवा बाहू
रिपू शको न पुढती येऊं
बोले-'विमुख न् व्हा आजी' पावनखिंडीचा गाझी १३

लागले गडाशी डोळे घुटमळला प्राण गळ्यांत
'पोंचला धनी कीं नाहीं?' तळमळ ही एक मनांत
जाहले खुणेचे बार गगनाच्या गाभाऱ्यांत
'कर्तृत्व जाहलें सफल
जीवितहि झालें सफल'
अंतींचे वदुनी बोल
पहुडला रणाच्या शेजीं पावनखिंडीचा गाझी १४

# गडकरी पुरंदरवाला.

छत्रपती शिवाजी महाराजांनीं पुण्यांत षाहिस्तेखानाचीं त्रेधा उडवून दिल्यानंतर औरंगजेबानें दिल्लीरखान व जयसिंग या दोघांस दक्षिणेंत शिवाजी महाराजांवर पाठविलें. जयसिंगानें कोंडाण्यास वेढा घातला. आणि दिल्लीरखानानें पुरंदर किल्ल्यास वेढा घातला. या वेळीं पुरंदरावर महाराजांचा मुरारबाजी नांवाचा लढवय्या किल्लेदार होता. त्यानें शत्रूचें सैन्य जवळ येत आहे असें पाहून बाणांचा वर्षाव व तोफांची सरबत्ती यांचा धूमधडाका उडवून दिला! पराभूत झालेल्या खानानें चिडून जाऊन आपल्या डोक्याची पगडी जमिनीवर आपटली आणि प्रतिज्ञा केली कीं, " पुरंदरावर निशाण लावीन तेव्हांच पगडी डोक्यावर घालीन! " मुरारबाजीला ही प्रतिज्ञा कळली तेव्हां त्यालाही चेव आला. तो एका रात्रीं मावळ्यांच्या निवडक टोळीनिशीं खालीं उतरला व खानाच्या छावणीमागें जो दारूगोळा होता त्याला त्यानें आग लावून दिली. त्यानंतर त्या अग्निप्रळयांत मोंगलांच्या गोटावर छापा घालून तो धाडसी वीर पुन्हां किल्ल्यांत निघून गेला! अशा प्रकारें हा पुरंदरचा सिंह छाप्यावर छापे घालून विजय मिळवितच होता.

इतक्यांत खानानें किल्ल्याच्या बुरुजाला सुरुंग लावून तो जमीनदोस्त केला. तेथून ' अल्ला हो अकबर ' या गर्जनेनें मोंगल सैन्य आंत घुसूं लागलें. तेव्हां या शिवभक्तानें हातांत ढाल फिरंग घेऊन तेथें आपल्या छातीचा कोट उभारिला. परंतु थोड्याच वेळांत मोंगलांचा अफाट सेनासागर तेथेंच लोटलेला पाहून त्यानें दूरदर्शीपणानें किल्ल्याच्या वरच्या कोटाचा आश्रय केला. खालच्या कोटांत विजयी तुर्कसेना लुटीच्या नादीं लागलेली पाहून त्या समयचतुर सेनापतीनें तोफांच्या भडिमाराखालीं तिची दाणादाण करून सोडिली आणि याच वेळीं त्या धडाडीच्या वीरानें किल्ल्याचे दरवाजे उघडून मैदानावरची लढाई दिली. अहाहा! या महाराष्ट्रवीराच्या त्या वेळच्या शौर्याचें काय

वर्णन करावें ! त्याच्या बहादुरीनें चकित झालेल्या खानानें त्याला मनसबी देऊन आपणाकडे वळविण्याचा प्रयत्न केला. परंतु त्या स्वामिभक्त वीरानें त्याचा धिक्कार केला. लढतां लढतां त्याच्या हातांतील ढाल तुटली. तेव्हां तो शत्रूचे-घाव आपल्या उघड्या हातावर झेलूं लागला. शेवटीं खानाला समोर पाहतांच या पुरुषसिंहानें त्याच्यावर धाव घेतली तोंच खानानें हत्तीच्या हौद्यांतून तीर सोडून त्याचा शिरच्छेद केला ! त्या वेळीं या शूराग्रणीच्या शरिरांत एवढी वीरश्री संचरलेली होती कीं, शिर तुटलें तरी त्याच्या धडानें रणांगणांत पांचशें तुर्कांचीं धडें धरणीवर पाडिलीं ! आपला सेनानायक पडला तरी पुरंदरच्या गडकऱ्यांनीं किल्ला कांहीं शत्रूच्या स्वाधीन होऊं दिला नाहीं !

जयसिंग दिलेरीखान दिल्लीचे मनसबदार
मोंगलशाहीला ज्यांच्या समशेरीचा आधार
पातले दक्षिणेमाजी घेउनि सेना—संभार

कोंडाणा जैसिंग घेरी
खान तो पुरंदर घेरी
गर्जल्या रणाच्या भेरी

युद्धास मुरारी सजला गडकरी पुरंदरवाला १

काबुली पठाणी फौजा पसरल्या गडाभंवताली
हिरवा ध्वज चालुन आला माचीवर तोफ उडाली
ईर्षेनें मावळ—सेना कमरबंद होऊन आली

तिरकमठ्यावर शर चढले
तोफांतहि गोळे भिडले
बारावर बार उडाले

शौर्यश्रीनें फुरफुरला गडकरी पुरंदरवाला २

आदळली फिरली लाट खळबळलेल्या दर्याची
खानाच्या पुरुषार्थाला जोड ना मिळे देवाची
काढोनी पगडी त्यानें आपटली निज–शिर्षाची
"लावीन निशाण गडाला
घालीन तदा पगडीला
निश्चयी प्रतिज्ञा वदला
ऐकुन उपसी खड्गाला गडकरी पुरंदरवाला ३

रात्रीचा होता समय गडकरी उतरले खालीं
चाहूल न कळली कोणा दारूवर ठिणगी पडली
आगीचा उठला डोंब छावणी भयें घाबरली
आकस्मिक पडला घाव
खासे खासे उमराव
अल्लाचें घेती नांव
गनिमी काव्यानें लढला गडकरी पुरंदरवाला ४

दारूच्या स्फोटामाजी अगणित सेनेचा नाश
खंबीर मनाचा खान निज धैर्याची धरि कास
तोलून धराया सजला कोसळलें जरि आकाश
येऊन नव्या कुमकेला
उलटून धरि बुरुजाला
लाविलें सुरुंग तळाला
वर्षला वरुन आगीला गडकरी पुरंदरवाला ५

७०३७.५ ९२८२ नों. दि. २९/१२/५ ग्रं

ते अचूक मावळ-नेम जणु अचूक ती विधि·रेखा
शेकडो बहादुर पडले धरणीला देउन विळखा
राहिलीं कठे ती दिल्ली मृत्यु हा कुठें तरि देखा
भीषण ध्वनी तों झाला
माचीचा बुरुज उडाला
गगनास धुरोळा गेला
अडवून धरी खिंडीला गडकरी पुरंदरवाला ६

‘ अल्ला हो ! अकबर ! घोषें खिंडींतुनि मोंगल घुसले !
मावळच्या भुजशौर्याला भरतें तें भारी आ[illegible]!
नौबतिवर टिपरी पडली डंक्यावर डंके झडले!
तुर्कांचा पाहुन लोट
आवरी चमूचा गोट
चावीत खालचा ओठ
कोटावर वरच्या चढला गडकरी पुरंदरवाला ७

जाळपोळ कत्तल लूट माचीवर हाच अनर्थ
विसकटलें मोंगल सैन्य द्रव्याच्या निज लाभार्थ,
समय--ज्ञ मुरारी त्यानें संधी न दवडिली व्यर्थ
बंदुका कडाविनी तोफा
धडकला वरोनी ताफा
आगीच्या उठल्या वाफा
गोलंदाजीवर चढला गडकरी पुरंदरवाला ८

ते अचूक मावळ-नेम  जणु अचूक ती विधि-रेखा  
शेकडो बहादुर पडले  धरणीला देउन विळखा  
राहिलीं कठे ती दिल्ली  मृत्यु हा कुठें तरि देखा  
भीषण ध्वनी तों झाला  
माचीचा बुरुज उडाला  
गगनास धुरोळा गेला  
अडवून धरी खिंडीला  गडकरी पुरंदरवाला ६

' अल्ला हो! अकबर! घोषें  खिंडींतुनि मोंगल घुसले !  
मावळ्या भुजशौर्याला  भरतें तें भारी आले!  
नौबतिवर टिपरी पडली  डंक्यावर डंके झडले!  
तुर्कांचा पाहुन लोट  
आवरी चमूचा गोट  
चावीत खालचा ओठ  
कोटावर वरच्या चढला  गडकरी पुरंदरवाला ७

जाळपोळ कत्तल लूट  माचीवर हाच अनर्थ  
विसकटलें मोंगल सैन्य  द्रव्याच्या निज लाभार्थ ,  
समय--ज्ञ मुरारी त्यानें  संधी न दवाडिली व्यर्थ  
बंदुका कडाबिनी तोफा  
धडकला वरोनी ताफा  
आगीच्या उठल्या वाफा  
गोलंदाजीवर चढला  गडकरी पुरंदरवाला ८

हातांतील ढाला फुटल्या    डोक्यांच्या कवचा फुटल्या !
तिरपगडी होतां सेना    बरगड्या तनूंच्या तुटल्या !
बीजेच्या चांद-खुणेच्या    उमळून पताका पडल्या
चरणा चरणाच्या पुढती
प्रेतावर प्रेतें पडतीं
करवे कोणाला गणती ?
यवनांना काळ जहाला    गडकरी पुरंदरवाला ९

गोळ्यांच्या फैरी जणुं कीं    बरसाती मधल्या धारा
बाणांची वृष्टी जणुं कीं    हेमंत ऋतूचा वारा
लपवितात वैरी जीव    जीवांना नुरला थारा
पाहिलें चमूचें दैन्य
राखीव घेतलें सैन्य
दारावर भिडला खान
दरवाजा उघडून आला    गडकरी पुरंदरवाला १०

सिंहाची पहिली झेप    मर्दाची मर्द चढाई
असहनीय दोन्ही गोष्टी    तुलनेला उपमा नाहीं
चालली कचाकच तेथें    काळही दिपोनी जाई
खानाच्या सात हजार
चमुवरी, सातशे वीर
उडविती अहा ! काहूर
संतोषवि रण-चंडीला    गडकरी पुरंदरवाला ११

हटतां दिल्लीची फौज गडकरी करिति जयघोष
संगरीं उडोनी गेला सय्यद शेखांचा होष
खानाला जाळित सुटला विन्मुखतेचा बहु रोष
थांबवी ध्वजाचा हत्ती
तिरकमठा घेउन हातीं
वळविलें पुन्हां सांगाती
सरला रग जिरवायाला गडकरी पुरंदरवाला १२

मारिली मिठी मगरानें अजुनी हा सोडित नाहीं !
शिवशाहीची मर्दुमुकी दिपवीत अरीला नाहीं !
रणदेवीची रुधिरेच्छा अजुनी संतृप्त न होई !
क्रोधाचा सागर उहुळे
वीर तो मुरारी खवळे
रणकुंदळ 'हर हर' - वाले
त्यासवें तुटोनी पडला गडकरी पुरंदरवाला १३

भाल्यांची झाली फेक मिसळली धार धारेला
बिचवे बरच्या गर्गूज डसलीं शस्त्रें अंगाला
पट्टा पट्टीश परीघ खड्गांचा कहर जहाला
सरमिसळ होय दुर्गेश
आरक्त दिसे तद्देश
पाहतां पुढे खानास
खानावरि धावुन गेला गडकरी पुरंदरवाला १४

मुर—दैत्यावर बलहारी धावला मुरारी जैसा
कीं सुयोधनावर भीम कंसावर कान्हा जैसा
दिल्लीरावर कोपानें उफळला मुरारी तैसा
"तूं मर्द शिपाई शूर
दे टाकोनी हतियार
करितों तुज मनसबदार"
रिपुशद्धें अधिकचि चिडला गडकरी पुरंदरवाला १५

"भोसले कुलोत्तम राजा प्राण या महाराष्ट्राचा
स्वातंत्र्याचा अभिमानी मी सेवक सत्य तयाचा
राहुं दे विभव तव जवळी हा प्रभाव बघ खड्गाचा"
उसळे जों तेजोगोल
तों तुटे करांतिल ढाल
हांसलें दैव विक्राळ
हातास लपेटी शेला गडकरी पुरंदरवाला १६

शत्रूचे झेलित असतां उघड्या हातावर घाव;
तो पुरंदरचा सिंह खानावर घेई धाव
शाहीरांच्या कंठांत वीराचें चढले नांव
हौद्यांतुनि सुटला तीर
शिर छेदुनि गेला दूर
वाहिली धडांतुनि धार
संगरीं धडानें लढला गडकरी पुरंदरवाला १७

संचरलेली वीरश्री जाइना कबंधामधुनी
पांचशें धडें तुर्कांचीं पाडिलीं धडानें भुवनीं
किति भीषण तो देखावा वर्णावा कैसा कवनीं ?
हा भक्त महाराष्ट्राचा
प्रभुवंशाच्या शौर्याचा
इतिहास पुरंदरगडचा
रक्तानें लिहुनी गेला गडकरी पुरंदरवाला १८

पडला जरि एक मुरारी गडकरि सारेच मुरारी !
गढपति गेला स्वर्द्वारीं कुणि वळे न परि माघारी !
धन्य स्वर्गस्थ पुढारी धन्यहि ते वीर करारी !
शौर्यस्थानावरि येतां
वीरांचीं चरितें गातां
रोमांचित होते कविता
उचित वीर हा कवितेला गडकरी पुरंदरवाला १९

★

# स्वराज्य आणि पुत्रप्रेम

संभाजी फितुर होऊन दिल्लीरखानाच्या गोटांत गेला. खानानें त्याला पुढें करून भूपालगडावर हल्ला चढविला. त्या गडावर चाकणचा किल्लेदार फिरंगोजी नरसाळा याची नेमणूक होती. छत्रपतींच्या ज्येष्ठ पुत्रावर–महाराष्ट्राच्या युवराजावर - त्या स्वामिभक्त शूराच्यानें तोफेचा गोळा टाकवेना ! तो किल्ला सोडून रायगडावर पळाला ! 'भूपालगडाकडे खान वळला आहे. तेथील नरसाळा किल्लेदार मोठा लढवय्या आहे ' म्हणून महाराजांस तितकी चिंता नव्हती. परंतु महाराज रायगडाच्या दरबारांत बसले असतां फिरंगोजी नरसाळा तेथें आला.

चाल :– भूपती • –

शिव छत्रपती भोसले कुळाचा राणा
तो स्वराज्य सिंहासनिं बसला असतांना
भूपालगडाचा 'नरसाळा' नर-गाझी
गड सोडुन आला राजमंदिरामाजी
पाहतां तयाला प्रभुला विस्मय झाला
या चाकणचा लढवय्या कैसा हरला !
"शत्रुच्या करीं गढ दिला, कशाला आलां ?
भरवंसा आपुल्या मर्द कुळाचा गेला !
भूपालगडाचा बार न ऐकूं आला
शिवशाहीचा कां आज दरारा गेला ?"

कुजबुजती कोणी, कोणी खाली बघती
शूराची लज्जा राख विभो ! मनिं म्हणती

* * *

तो स्वामिभक्त बहु विनीत – वचनें बोले,
" खानानें पुढती संभाजीला केलें !
युवराज पाहिला, स्वामिभक्ति गहिंवरली,
तोफेची बत्ती हातामधुनी गळली !
हा भावी राजा रायगडाचा अमुचा
यावरती टाकूं गोळा कां तोफेचा ?
येसूबाईच्या सौभाग्याचा तिलक
म्यां कसा पुसावा शिवराया, निःशंक ?
भोसले कुळाचा वंश कसा निर्दाळूं ?
शिवछत्रपतीचें हृदय कस मी जाळूं ?
कर्तव्य तेविं निज राजकुलाची भक्ती
दोघांचें काहुर माजे माझ्या चित्तीं !
जरि राजपुत्र मम तोफेपुढती नसता;
चाकण किल्ल्याचा सूड उगविला असता
अपराधी झालों, आलों आपुल्या चरणीं
मज तोफेवरतीं बांधुन उडवा गगनीं "!

* * *

त्या स्वामिभक्त शूराच्या भक्तिवचांनीं
शिवभूप विरोनी गेला अंतःकरणीं.

हिंदवी स्वराज्य स्थापनकर्ता बोले
"मी स्वराज्य - कंकण निजहस्तीं बांधियलें
जो फितुर जाहला पुत्र, रोधितो प्रगती
बळि पडो तयाचा स्वराज्य देवी पुढती !
जरि येइल सुत आडवा स्वराज्या पुढतीं
तोफेचा गोळा टाकीन त्याच्यावरती.
भूपालगडावर मी असतों जरि तेव्हां -
मम हस्त नें ढळता तोफेवरचा केव्हां !
सारून विवशता पुत्राच्या प्रेमाची
वल्हवली असती नौका कर्तव्याची !
जर संभाजीला पुढें करूनी खान
गड घेउं लागला, चिरू लागला मान,
तर रक्त सिंचुनी वृद्धिंगत जो केला
तो स्वराज्य-तरु वाळेल, कीड ही त्याला !
जा फिरवा दुर्गा - दुर्गावरतीं द्वाही
कीं स्वराज्याहुनी सुतही प्रिय मज नाहीं !"

# पित्राज्ञा

शहाजी राजे यांस मुधोळच्या बाजी घोरपड्यांनीं दग्यानें पकडिलें तेव्हां त्यांची छत्रपती शिवाजी महाराजांनीं युक्तीनें सुटका करविली. सुटकेनंतर राजे कर्नाटकांत गेल्यावर त्यांनीं घोरपड्यांचा पुरा सूड उगविण्याविषयीं शिवाजी महाराजांस पत्र लिहिलें.

चाल :– भूपती ० –

"जरी असाल आमुचे वीर्यशालि सत्पुत्र
तरि घोरपड्यांना कराल शिक्षापात्र!
म्हणवितात बाजी 'कपटी', केवळ पाजी
मनसबीस चढले करुनी 'हांजी! हांजी!'
वरकरणी प्रीती, करणी मात्र कसाबी
विश्वासघातकी, स्वार्थाचे हे लोभी!
दाविलें प्रेम, भोजनीं निमंत्रण केलें
उलटले शेवटी, बद्ध अम्हाला केलें!
हा शत्रु जरी करिं खड्ग धरोनी येता
भोसले कुळाचा हात पारखा होता
रंगवू अजूनहि मुधोळचें मैदान
हा विजापुराच्या मागें लपतो हीन!
हें विदित तुम्हाला, काय पुन्हां सांगावे?
जळत्या हृदयाच्या अग्नीला शमवावें.

........

# घेतला सूड जनकाचा

शहाजी राजे यांस मुधोळच्या बाजी घोरपड्यानें दग्यानें पकडलें! त्यांस जिवंत पुरविण्याची शिक्षा देत असतां घोरपड्यांनीं त्यांच्या हनुवटी-खालीं शेवटची चोप दिली! इतक्यांत धापा टाकीत आलेल्या स्वारानें आदिलशहाचा हुकूम दिला, त्यावरून राजांची सुटका झाली! सुटकेनंतर राजे कर्नाटकांत गेल्यावर त्यांनीं घोरपड्यांचा पुरा सूड घेण्याविषयीं शिवाजी महाराजांस पत्र लिहिलें. बाजी घोरपडे मुधोळास त्यांच्या गांवीं आहेत अशी संधी पाहून महाराजांनीं अकस्मात् त्याजवर छापा घातला आणि बाजीस ठार करून आपल्या पित्याचा सूड उगविला. या वेळीं महाराजांचा क्रोधाग्नी इतका पेटला होता कीं, त्यांत घोरपड्यांचे आप्त-स्वकीय वगैरे २००० लोकांची कत्तल उडाली! त्यांचा एक मात्र वंशज या कत्तलींतून वाचला व तोही त्यावेळीं तेथें नसून विजापुरास होता म्हणून वांचला!

"जरि असाल अमुचे पुत्र भोसले मर्द वंशाचे
बाजीला शासन द्यावें आमुच्या प्राण – वैराचें"
कर्णांत शद्ब हे घुमती पूज्य त्या जन्मदात्याचे!
बाजीच्या गृहवासाची
साधून संधि मोलाची
भ्रुकुटी चढली शिवबाची
डहुळला सिंधु कोपाचा घेतला सूड जनकाचा १

वेळवाचे जैसे मेघ उसळती नभीं एकाकीं
वैशाख - ऋतूचे पूर आकस्मिक सिंधु - तटाकीं
टाकली मुधोळा पुढती मावळी फौजही बाकी !
होऊन परांचे दास
स्वजनांच्याही कंठास
लाविती नीच जे फास
गांठला समूह तयांचा घेतला सूड जनकाचा । २

तरवारी घोरपड्यांच्या जणु मृत्यु-मुखांतिल रसना
कोषांतुनि बाहिर आल्या कीं क्रुद्ध भुजंगम-ललना
इकडे तर घेई भरारी गरुडाची केवळ सेना
ढालीस लागली ढाल
नाचले तीक्ष्ण करवाल
एकेक पडे घायाळ
घातला सडा रुधिराचा घेतला सूड जनकाचा ३

शिव-शंकर दोघांमध्यें कांहींही नव्हता भेद
पाहवें न मुख रायाचें सूडाचा नयनीं क्रोध
एकेक गजासुर योद्धा गांठून करी तद्भेद
खड्गाच्या घाटावरचे
पाणी जे प्याले साचे
रणशूर मुधोळावरचे
केला निःपात तयांचा घेतला सूड जनकाचा ४

"तो कुठें? जयानें धरिलें निजजनकाला कपटानें ?
लाविली गळ्याला चीप भोसलेकुल-द्वेषानें !"
शोधीत फिरे जों भूप ठाकला तोहि शौर्यानि
उसळले हात दोघांचे
शौर्यांत चपलता नाचे
यश थोर जिजापुत्राचें
लाविला टिळा रक्ताचा घेतला सूड जनकाचा ५

हा भाऊ घोरपड्यांचा हा भाचा घोरपड्यांचा
हा कुमार हा तो पुतण्या ठेचला वंश सापाचा
तीनशें मारिले खासे केला उच्छेद खलांचा
वैऱ्यांचें झालें सत्र
वाचला एकची पुत्र
तेथें तो नव्हता मात्र
हा प्रभाव शिवकोपाचा घेतला सूड जनकाचा ६

जीवितही तृण मानावें जननि जनक यांच्यासाठीं
तळहातावर शिर घ्यावें, आपुल्या जन्मभूसाठीं
काळासह झुंज करावी प्राणप्रिय धर्मासाठीं
हा क्षत्रिय–धर्म पवित्र
गाववा यदीय चरित्र
तो पूज्य असे सर्वत्र
पाळिला धर्म पुत्राचा घेतला सूड जनकाचा ७

........

वेळवाचे जैसे मेघ उसळती नभीं एकाकीं
वैशाख - ऋतूचे पूर आकस्मिक सिंधु - तटाकीं
टाकली मुधोळा पुढती मावळी फौजही बाकी !
होऊन परांचे दास
स्वजनांच्याही कंठास
लाविती नीच जे फास
गांठला समूह तयांचा घेतला सूड जनकाचा २

तरवारी घोरपड्यांच्या जणु मृत्यु-मुखांतिल रसना
कोषांतुनि बाहिर आल्या कीं क्रुद्ध भुजंगम-ललना
इकडे तर घेई भरारी गरुडाची केवळ सेना
ढालीस लागली ढाल
नाचले तीक्ष्ण करवाल
एकेक पडे घायाळ
घातला सडा रुधिराचा घेतला सूड जनकाचा ३

शिव-शंकर दोघांमध्यें कांहींही नव्हता भेद
पाहवें न मुख रायाचें सूडाचा नयनीं क्रोध
एकेक गजासुर योद्धा गांठून करी तद्द्वंद
खड्गाच्या घाटावरचे
पाणी जे प्याले साचे
रणशूर मुधोळावरचे
केला निःपात तयांचा घेतला सूड जनकाचा ४

" तो कुठें? जयानें धरिलें  निजजनकाला कपटानें ?
लाविली गळ्याला चीप  भोसलेकुल-द्वेषानें ! "
शोधीत फिरे जों भूप  ठाकला तोहि शौर्यानं

उसळले हात दोघांचे
शौर्यांत चपलता नाचे
यश थोर जिजापुत्राचें

लाविला टिळा रक्ताचा  घेतला सूड जनकाचा ५

हा भाऊ घोरपड्यांचा  हा भाचा घोरपड्यांचा
हा कुमार हा तो पुतण्या  ठेचला वंश सापाचा
तीनशें मारिले खासे  केला उच्छेद खलांचा

वैऱ्यांचें झालें सत्र
वाचला एकची पुत्र
तेथें तो नव्हता मात्र

हा प्रभाव शिवकोपाचा  घेतला सूड जनकाचा ६

जीवितही तृण मानावें  जननि जनक यांच्यासाठीं
तळहातावर शिर घ्यावें  आपुल्या जन्मभूसाठीं
काळासह झुंज करावी  प्राणप्रिय धर्मासाठीं

हा क्षत्रिय–धर्म पवित्र
गाववां यदीय चरित्र
तो पूज्य असे सर्वत्र

पाळिला धर्म पुत्राचा  घेतला सूड जनकाचा ७

........

# पन्नीचा फन्ना उडवी

श्री. छत्रपती शिवाजी महाराज हे दुसऱ्यांदा सुरत लुटून परत येत असतां चांदवडच्या खिंडींत मोंगल सुभेदार दाऊतखान पन्नी हा त्यांस आडवा आला. त्याच्याबरोबर बाकेखानही होता. महाराजांनीं त्या खिंडींत दोन प्रहर पर्यंत घनघोर संग्राम करून दाऊतखान पन्नीचा फन्ना उडविला व सर्व लूट रायगडावर पोंचती केली. या युद्धांत बाकेखान जखमी होऊन चांदवडच्या किल्ल्यांत लपला व दाऊतखान पळून गेला !

बेसूरत करुनी सुरत शिव-सिंह रायगडि वळला
मोंगल रिपु दाऊद पन्नी मार्गांत आडवा आला
तोंडांत लुटीचा घास पारधी जिवावर टपला
गर्जलें चांदवड--खोरें
उभयतांच्या जंय-निर्धारें
जाहले वीर सामोरे
शिव पहिला हल्ला चढवी पन्नीचा फन्ना उडवी १

जों तीक्ष्ण चमकलें खड्ग तों तीव्र चमकले भाले
यावनी शक्तिच्या संगें मावळी चपलता खेळे
भाल्यांतील अंतर तुटतां सरमिसळ मावळे झाले
एकदांच झाला घाव
नामांकित जे उमराव
त्यांचेच्च बुडालें नांव
शिव शौर्य आपुलें मिरवी पन्नीचा फन्ना उडवी २

माथ्यावरि आला सूर्य थांबेना तरिहि धुमाळी
टोळीसह झुंजत होती आवेशें दुसरी टोळी
प्रबला प्रबलांची झाली खिंडींत अहा ! खांडोळी
खानाची ढाल फिरेना
शिवराज खड्ग वळवीना
जय-देवी कौल देईना
परि अंतीं शिव रिपु पळवी पन्नीचा फन्ना उडवी ३

बहुमोल लुटीचा खजिना त्यावरि गर्दि पन्नीची
लढवय्या बाकेखान तोही करि कुमक तयाची
भोसले कुलाचा राणा गर्जे वाणी शौर्याची
खवळले पहाडी वीर
चक्राकृति धरिला घेर
कोंडले पठाणी वीर
शिव शत्रु-मदातें जिरवी पन्नीचा फन्ना उडवी ४

तों बाका बाकेखान करकरा खाउनी दात
रायाच्या संमुख आला श्रीविष्णू पुढें जणुं दैत्य
उसळलें भवानी खड्ग घायाळ पळे निमिषांत
सन्निध गड चांदवडाचा
रक्षक झाला खानाचा
इकडे नृप रायगडाचा
यवनेश यशाला मळवी पन्नीचा फन्ना उडवी ५

दाउदखां पन्नी कोठें आढळे न छत्रपतींना
माणके-हिऱ्यांच्या पेट्या चालल्या कुणी अडवीना
पाडाव जाहले वैरी औदार्य दाविलें त्यांना

लक्ष्मीसह जयलक्ष्मीला
शिव-सिंह घेउनी गेला
वार्ता ही दिल्लीशाला

बहु चिंता-सागरिं बुडवी पन्नीचा फन्ना उडवी ६

★

# द्या माझी मज तरवार !

बेलवडीचा स्वामिनिष्ठ किल्लेदार येसप्रभु हा छत्रपतींच्या सैन्याशीं लढतां लढतां रणांगणीं पतन पावला. तेव्हां त्याची स्त्री सावित्रीबाई ठाणेदारीण ही घोडेस्वार होऊन पुढें आली. ती तेजस्विनी इतक्या शौर्यानें लढली कीं, शिवप्रभूंचे सरदार दादाजीप्रभु यांस शेवटीं पाठीमागून जाऊन तिच्या घोड्याचे पाय तोडावे लागले! पाय उतार झाल्यावर तिच्या मर्द कर्नाटकी सैन्याची व तिची ताटातूट करून दादाजीनें ती सिंहीण कोंडींत अडविली. कोंडी फोडून जाण्याकरितां तिनें इतका आश्चर्यकारक पराक्रम केला कीं, दादाजीला शेवटीं तिचा उजवा हात तोडून पकडावे लागले! तशा विकलांग स्थितींतही तिच्या पायांत लोखंडी बिड्या घालून तिला शिवप्रभुपुढें आणिलें!

जी खंडित सव्य कराच्या पुशिते न गलित रुधिरातें
ओसरल्या परि पदराला सांवरितें डाव्या हातें
मृदु वपु ज्या रक्ताक्षीची संग्रामपदें थरथरते
प्रभुवीर-पत्नि सावित्री
रविपुत्री जणुं गायित्री
आणितां शिवप्रभुपुढतीं
बोलली वाणि अनिवार 'द्या माझी मज तरवार' १

"पतिपूर्वजवीर-करांनीं जी नित्य विजयिनी
स्वामिभक्त पतिहस्तानें जी कीर्तिशालिनी झाली
माझ्याच मात्र ती हातें तरवार अपेशी झाली

दाउदखां पन्नी कोठें आढळे न छत्रपतींना
माणके-हिऱ्यांच्या पेट्या चालल्या कुणी अडवीना
पाडाव जाहले वैरी औदार्य दाविलें त्यांना

लक्ष्मीसह जयलक्ष्मीला
शिव–सिंह घेउनी गेला
वार्ता ही दिल्लीशाला

बहु चिंता-सागरिं बुडवी पन्नीचा फन्ना उडवी ६

★

# द्या माझी मज तरवार!

बेलवडीचा स्वामिनिष्ठ किल्लेदार येसप्रभु हा छत्रपतींच्या सैन्याशीं लढतां लढतां रणांगणीं पतन पावला. तेव्हां त्याची स्त्री सावित्रीबाई ठाणेदारीण ही घोडेस्वार होऊन पुढें आली. ती तेजस्विनी इतक्या शौर्यानें लढली कीं, शिवप्रभूचे सरदार दादाजीप्रभु यांस शेवटीं पाठीमागून जाऊन तिच्या घोड्याचे पाय तोडावे लागले! पाय उतार झाल्यावर तिच्या मर्द कर्नाटकी सैन्याची व तिची तातातूट करून दादाजीनें ती सिंहीण कोंडींत अडविली. कोंडी फोडून जाण्याकरितां तिनें इतका आश्चर्यकारक पराक्रम केला कीं, दादाजीला शेवटीं तिचा उजवा हात तोडून पकडावे लागले! तशा विकलांग स्थितींतही तिच्या पायांत लोखंडी बिड्या घालून तिला शिवप्रभुपुढें आणिलें!

जी खंडित सव्य कराच्या पुशिते न गलित रुधिरातें
ओसरल्या परि पदराला सांवरिते डाव्या हातें
मृदु वपु ज्या रक्ताक्षीची संग्रामपदें थरथरते

प्रभुवीर-पत्नि सावित्री
रविपुत्री जणुं गायित्री
आणितां शिवप्रभुपुढतीं

बोलली वाणि अनिवार 'द्या माझी मज तरवार' १

"पतिपूर्वजवीर-करांनीं जी नित्य विजयिनी
स्वामिभक्त पतिहस्तानें जी कीर्तिशालिनी झाली
माझ्याच मात्र ती हातें तरवार अपेशी झाली

मरणाच्या दुःखाहूनी
दुःख हेंच अंतःरकर्णीं
येईना वदतां वदनीं
अंतरीं रणेच्छा फार		द्या माझी मज तरवार	२

या तुमच्या सरदारांच्या		पुरुषार्थाला धिःकार!
या मर्द शिलेदारांच्या		मर्दुमकीला धिःक्कार!
मृत्यूच्या या चोरांनीं		मागून घातले वार!
निःशस्त्र_करोनी मातें
मद चढला नामर्दांतें
विसरलें धर्मयुद्धातें
हे खरे जरी झुंजार		द्या माझी मज तरवार	३

आवडतीं बाळें माझी		बांधा हत्तीच्या पायीं
सूळावर चढवा मातें		बांधा तोफेच्या ठायीं
तुह्मांस दयेची भिक्षा		मागणार केंव्हां नाहीं
एकवेळ सोडा मातें
या एका डाव्या हातें
दावितें शौर्य–तेजातें
हा लढो सर्व दरबार		द्या माझी मज तरवार	४

स्वामिभक्तीच्या देवीला		रक्ताभिषेक करण्याला
भवितव्यतेस संग्रामीं		लावून खड्ग–निकषाला

सौभाग्यतिलक तो माझा गर्जना करित जैं गेला

तैं कुलकीर्तीचें तेज

क्षण चमकुन होय वितेज

पहुडले रणीं पतिराज

शिरिं तत्कार्याचा भार द्या माझी मज तरवार

3542

स्वा[illegible] हाक सुखशय्या सोडुन धावूं

स्वामीची आज्ञा होतां कालमुखीं माना देऊं

पुरुषांमागें स्त्रीपुत्र- आहुती तनूंची वाहूं

प्रभू जातीच्या लोकांचा

ध्वज-लेख प्रभु-भक्तीचा

नित उज्वल चमकायाचा

तो मलिन जाहला फार द्या माझी मज तरवार ६

निर्मनुष्य सदनें दिसतीं तो स्मशानही गड दिसता

स्त्रीपुरुष वृद्ध—आबाल प्रत्येक लढोनी मरता

तुमच्या या विजयी नेत्री भिवविती उग्र भेसुरता

पेंढारी ढग हे सारे

नीतीला नख देणारे

पातले नटुनि सामोरे

सोडा व्हा अजूनी दूर द्या माझी मज तरवार ७

एकेक गडकरी माझा      रणमर्द मराठा गाजी
निश्चयी प्रभूच्या कार्जीं,      संकल्प तनूचा योजी
किल्ल्याचा बुरुजचि झाला      घनघोर संगरामाजी
जिंकिला पुरुष अबलेनें
हें नवल मुक्त कंठानें
कवि गाते आनंदानें
मम अढळ युद्धनिर्धार      द्या माझी मज तरवार  ८

शौर्यप्रिय शिवभूपाल      बोलला वीर विदुलेला
" मातोश्री तुजसम माता      वंद्य या महाराष्ट्राला
स्वामींचा शिकवो अर्थ      भक्तीच्या आधीं शिशुला "
बेभान जाहली होती
शुद्धिच तिज कांहीं नव्हती
उसळून पुन्हां बोले ती
' कर्तव्य करित मरणार      द्या माझी मज तरवार '  ९

........

# मुसलमान बंधूची हिन्दू भगिनी

## ' सांभाळा प्राणविसांवा '

रायगड किल्ला स्वाधीन करितांना येसूबाईनें झुल्फिकारखानाच्या बोलण्यावर विश्वास ठेऊन बाल--शाहूस त्याच्या हवालीं केलें. त्यानेंही हातीं कुराण घेऊन तिला बहीण म्हटलें व नातें शेवटपर्यन्त पाळिलें !

वाजवूनं गेला डंका शिवराज पितामह ज्याचा
यज्जनकें धर्मासाठीं बळी दिधला स्वप्राणाचा
यद्यशःसौरभीं रमुनी गातील कवींच्या वाचा
नातु तो शूरवीराचा
पुत्र तो धर्म शूराचा
स्वामी या रायगडाचा
म्यां कैसा हातीं द्यावा सांभाळा प्राणविसावा १

घालती पन्हाळी वेढे वेडेच त्यांस ठरवोनी
उडवीत छाति जाणारा शत्रुच्या छातीवरुनी
ठेंचून करी रांगोळी रांगण्यावरी खेंचोनी
तो भीष्म महाराष्ट्राचा
समयोचित बलधैर्याचा
हा वंशज हाय तयाचा
लावितें हात मीं दैवा ! सांभाळा प्राणविसावा २

१ श्रीशिवाजी महाराज

मी सून बरें कोणाची ? जों विचार करित्यें चित्तीं
मी पत्नि बरें कोणाची ? जों प्रश्न ठेवितें पुढतीं
हा समय करूं देईना मज मान खालची वरतीं
अबलांचे असतिल मानी
त्यांनींच मिशी ठेवोनी
मिरवावें पुरुष म्हणोनी
शूर–धर्म शूरां ठावा सांभाळा प्राणविसावा ३

जीवितेश्वराचा घात शिरिं वज्रघातची गमला
सुकली न अश्रुची धारा अद्याप पदर हा ओला
तो भोग पारतंत्र्याचा वाढून पुढें हा आला
ऐशी न कोणती जननी
सुत अर्पि परांलागोनी
विश्वास रणांत धरोनी
अर्पितें जिवाचा ठेवा सांभाळा प्राणविसावा ४

हा होइल राजविलासी जन्मतां ज्योतिषी वदले
दीर्घायुषि होइल भोगी रेखाशास्त्रज्ञ म्हणाले
वसवील घडी राज्याची संत–साधु बोलुन गेले
सर्वांनीं शुभ वर्तविलें
हें अशुभ वदाया आलें
काळिज पोळूनि गेलें
तुमचाच अतां ओलावा सांभाळा प्राणविसावा ५

भडभडून येतें पोटीं दुःखाचें गरळ न साहे
कोणाच्या जवळीं ओकूं प्रेमीजन कोठें आहे
रोधून पहातें कष्टें परि मातृहृदय ना राहे
मी अंगावर खेळविलें
कटिवरतीं घेउन फिरल्यें
पाळण्यांत गाणें म्हटलें
हा अत्तां तुम्हीं रक्षावा सांभाळा प्राणविसावा ६

परवांच्या तुमुल रणांत जै हताश सैनिक झाले
'परतले गडकरी'-ऐसें येऊन कुणीं सांगितलें ;
सिंहासन सोडुन उठला आरक्त करोनी डोळे !
देहानें जरि सुकुमार
घेऊन ढाल तरवार
युद्धाला होय तयार
हा रणसिंहाचा छावा सांभाळा प्राणविसावा ७

जोंवरी करीं तरवार तोंवरी शत्रुशीं दावा
टाकून शस्त्र जो आला त्याशीं न करावा कावा
निर्धौतयशःपट ज्यांचा प्रगटिती वीर सद्भावा
साम्राज्य-धुरंधर, त्यांच्या—
सत्यप्रिय असती वाचा
कृति करुन दाविती साच्या
बोलला तशी कृति दावा सांभाळा प्राणविसावा ८

विश्वास न येतां जरिहि    जातिचे मराठे आह्मी
मारतां मारतां मरतों    देशाच्या येतों कामीं
खंजीर–युक्त ललनांचे    चमकते हात संग्रामीं

विश्वासीं त्यजिला मान
मानेंत घातली मान
दोघांत ‘राम रहिमान’

राखोनी अपुल्या नांवा    सांभाळा प्राणविसावा ९

जर असेल घात करावा    आहेच उभें ह पोर !
वचनभंग करणें चित्तीं    आहेच करीं समशेर
होउं द्या खानसाहेब    सोक्ष कीं मोक्ष निर्वैर

मक्केचा वारा मजशीं
गुणगुणतो कीं कानाशीं
“ झुल्फिकारखाँ विश्वासी ”

आठवून तिथल्या देवा    सांभाळा प्राणविसावा १०

*    *    *

मुसलमान बंधू झाला    बहिण ती हिंदुधर्माची
हातांत कुराण–ग्रंथ    वाहतो शपथ तो त्याची
संकटांत एकी व्हावी    रीत ही हिंदुयवनांची

“ हें कुराण बघ उचलोनी
मानिली तुला मी भागिनी
हो विशंक अंतःकरणीं

सांगणें नको या भावा    सांभाळा प्राणविसावा ” ११

........

# संताजीची घोडदौड

संभाजी महाराजांच्या वधानंतर येसूबाई व बालशाहू मोंगलांच्या न सांपडले. रायगडाची गादी जिंजीला गेली ! स्फुरण पावलेली मोंगल किल्ल्यावर हिरवें निशाण फडकावूं लागली ! ती वेळ मोठ्या होती. धनाजी जाधव व संताजी घोरपडे या रणझुंजारांनीं निराजी सारख्या राजकारणी पुरुषांनीं त्यावेळीं मराठी राज्याची इमारत कृतिनिश्चयानें सांवरली. संताजी घोरपड्यांनीं तर आपल्या घोड–दळाच्या साह्यानें औरंगजेबाला अगदीं बावरून सोडलें होतें.

* * *

तळहातीं शिर घेउनियां दख्खनची सेना लढली
तरि विजयी मोंगलसेना ना नामोहरम जहाली
पडली मिठि रायगडाला सोडवितां नाहीं सुटली
राजरत्न राजाराम
कंठास त्यास लावून
जिवीवरती ठेवून
परते सर सेनापतिची घोडदौड संताजीची १

मिरजेवर पातशहाचीं शहाजणें वाजत होतीं
हाणिल्या तयांवर टापा फोडून टाकिलीं पुरतीं
मारिली टाच तेथून घेतला पन्हाळा हातीं
तों कळलें त्या वीराला
जिंजीला वेढा पडला
पागेसह वेगें वळला
चौखूर निघे त्वेषाची घोडदौड संताजीची २

झुल्फिकारखाँ लढवय्या कातरलीं झुल्पें त्याचीं
धुळधाण केली तेथें किति अमीर उमरावांची
उसळली तिथोनी मांड मग त्या कर्दनकाळाची
जिंजीचा धुरळा मिटला
जालना प्रांतिं तो उठला
चोळितो शत्रु नेत्रांला
गेली हां- हां म्हणतांची घोडदौड संताजीची ३

वाजल्या कुठें जरि टापा धुरळ्याची दिसली छाया
छावणींत गोंधळ व्हावा " संताजी आया! आया!"
शस्त्रांची शुद्धी नाहीं धडपडती ढाला घ्याया
रक्तानें शरिरें लाल
झोपेनें डोळे लाल
जीवाचे होती हाल
शत्रूला ऐशी जाची घोडदौड संताजीची ४

गिरसपा वाहे 'धों धों' प्रतिसारिल त्याला कोण?
शिशिराचा वारा 'सों सों' रोधील तयाला कोण?
हिमशैल - खंड कोसळतां प्रतिरोधिल त्याला कोण?
होता जो गंगथडीला
आला तो भीमथडीला
एकाच दिसांत उडाला
करि दैना परसेनेची घोडदौड संताजीची ५

पुरताच बांधिला चंग घोड्यास चढविला तंग
सोडी न हयाचें अंग भाला बरचीचा संग
औरंगाचा नवरंग उतरला जाहला दंग
तुरगावर जेवण जेवी
तुरगावर निद्रा घेई
अंग न धरेला लावी
भूमीस खूण टापांची घोडदौड संताजीची ६

संचरलें होतें न कळे तुरगांसही कैसें स्फुरण
उफळाया बघती वेगें रिकिबींत ठेवितां चरण
जणुं त्यांसहि ठावें होतें युद्धीं "जय किंवा मरण"
शत्रूचे पडतां वेढे
पाण्याचे भरतां ओढे
अडती न उधळती घोडे
चालली अशी शर्तीची घोडदौड संताजीची ७

नेमानें रसद लुटावी 'नेमाजी शिंदे' यांनीं
सांपडती हय गज तितुके न्यावे 'हैबतरावांनीं'
वाटोळे सर्व करावें 'आटोळे' सरदारांनीं
'खाड खाड' उठती टापा
झेंपावर घालित झेंपा
गोटावर पडला छापा
आलीच म्हणति काळाची घोडदौड संताजीची ८

चढत्या घोड्यानिशि गेला    बेफ़ाफ धनाजी स्वार
करि कहर बागलाणांत    ओली न पुशी समशेर
वसवितो जरब यवनांना    बेजरब रिसालेदार
वेगवान उडवित वाजी
तोंडावर लढतो गाजी
धाऊन येई संताजी
पळती मोंगल बघतांची    घोडदौड संताजीची    ९

नांवाचा होता 'संत'    जातीचा होता शूर !
शीलाचा होता साधू    संग्रामीं होता धीर !
हृदयाचा 'सज्जन' होता    रणकंदनिं होता क्रूर !
दुर्गति ती संभाजीची
दैना राजारामाची
अंतरीं सर्वदा जाची
उसळे रणशार्दूलाची    घोडदौड संताजीची    १०

मर्दानी लढवय्यांनीं    केलेल्या मर्दुमकीचीं
मर्दानी गीतें गातां    मर्दानी चालीवरचीं
कडकडे डफावरी थाप    मर्दानी शाहीराची
देशाच्या आपत्कालीं
शर्तीचीं युद्धें झालीं
गा शाहीरा ! या कालीं
ऐकूं दे विजयश्रीची    घोडदौड संताजीची    ११

........

# द्या करीं जरा समशेर !

संभाजीराजाच्या वधानंतर ज्यांनीं महाराष्ट्राची पडती बाजू शर्थीनें सांवरली, त्या सन्ताजी घोरपडे व धनाजी जाधव या अतिरथी–महारथींचा पुढें बिघाड झाला ! छत्रपती राजारामाच्या अप्रसन्नतेनें सन्ताजीच्या कपाळीं वनवास आला ! दुर्दैवानें रानोमाळ हिंडणारा हा वीर एका ओढ्यांत स्नान करीत असतां मारेकऱ्यांनीं त्याचा निर्दयपणें खून केला ! तो निःशस्त्र वीर शेवटपर्यन्त त्यांस म्हणत होता कीं, ' अरे ! हातांत समशेर द्या

संकटीं महाराष्ट्राची सांवरली बाजू ज्यानें
आवेशें घोडदळाचा थैमान घातला ज्यानें
औरंगशहाचे कळस कापून आणिले ज्यानें
तो संताजी दुर्वेषें
स्वजनांच्या व्यक्तिद्वेषें
सांपडला देहत्रासें
निःशस्त्र बोलला धीर द्या करीं जरा समशेर ! १

अचलाच्या निर्झरतीरीं अचल वीर उघडा होता
करणारा रक्तस्नानें स्नानाला सजला होता
दबलेले उसळुन आले पातकी घातकी घाता
चमकला जरासा देहीं
कर कमरेवरतीं जाई
तरवार कटीला नाहीं
समयचतुर बोले वीर द्या करीं जरा समशेर ! २

जीवाची आशा नाहीं    मरणाची भीती नाहीं
शूर मृत्यु पृष्ठीं वाही    विजयाला सन्मुख पाही
कोंदल्या दिशा जरि दाही    लढतांना स्वर्गीं जाई
शिवनेरीच्या दासाचा
शिवशाहीच्या भक्ताचा
संग्राम पहा अंतींचा
वारावरि घाला वार    द्या करीं जरा समशेर !    ३

एवढा धनाजी शूर    मित्राचा शत्रू झाला !
सुविचारी राजाराम    कर्णदंश त्यासही घडला !
प्रल्हाद निराजी एक    परलोकीं तोही शिरला !
कर्तृत्व जाहलें फोल
भक्तीचें गेलें मोल
जीवितही झालें लोल
बाहूला चढला जोर    द्या करीं जरा समशेर !    ४

देशभक्त बंधू सारे    चुगलखोर झाले कैसे ?
बंधूला तोडायाला    मारेकरी बनले कैसे ?
जाति-रक्त हे प्यायाला    हिंस्रपशु झाले कैसे ?
दगलबाज पापी चोर
होऊन येति शिरजोर
जोडाया पातक घोर
जरि असाल सारे शूर    द्या करीं जरा समशेर !    ५

या संताजीचे घोडे एकाच दमानें गेले
जिजीस्त्रे फोडुन वेढे गनिमास उधळुनी आले
घामानें डबडबलेले कृष्णेचें पाणी प्याले
त्या वाजींच्या गाजीला
गांठोनी एकांताला
कापाया सारे सजलां
पातला समय जरि घोर द्या करीं जरा समशेर ! ६

द्या माला बरची पट्टा द्या लँगोर अथवा सांग
द्या कट्यार गदका निमचा द्या लाठी कमठा बाण
मरतांना तालिमखाना घ्या योद्धयाचा पाहून
दावेदाराचा दावा
तुम्हि शौर्य आपुलें दावा
वंशाला डाग न लावा
मज नको शस्त्रसंभार द्या करीं जरा समशेर ! ७

युद्धाचीं नीतीतत्वें अधमांना रुचलीं नाहीं
पापिष्ट खुनी हृदयांत अल्पही दया ना राही
सक्रोध लाल--नेत्रांत उरला न विवेकहि कांहीं
दुष्टांचे सजले हात !
चमकला शूर देहांत !
सरकला हात दो हात
करि घोष पाहुनी घेर द्या करीं जरा समशेर ! ८

पुढच्यानें केला वार  हाताची केली ढाल !
मागचा घालतो घाव  हाताची दुसऱ्या ढाल !
तो उजवा डावा मारा  साहून उसळला लाल
एकाला लाथेसरसा
दुसऱ्याला ठोशासरसा
पाडोनी तोडी फासा
त्वेषानें गर्जे वीर  द्या करीं जरा समशेर ! ९

जों वर्मीं बसला घाव  'जय छत्रपतीकी' -बोले
जों खंडित झालें गात्र  'जय समर्थ सद्गुरु' -बोले
निःशस्त्र उभारुनि हात  'शिवशाहीकी जय' -बोले
बेदर्द कसाई चोर
निःशस्त्रीं ज्यांचे वैर
शिर करिति धडाहून दूर
पडतांना वदलें शीर  द्या करीं जरा समशेर ! १०

रिपुरुधिरानें देशाचा  धुतला हो ज्यानें डाग !
देशानें तद्रक्ताचा  लावून घेतला डाग !
घोरपडे वंशज घोर  विसरले न हा दुर्भोग
संग्रामीं योद्धे जबरे
दरबारीं डावे मुजरे

१ हे घोरपड्यांचे डावे मुजरे शाहू महाराजांच्या वेळेपर्यंत चालू होते. पुढें ते शाहू महाराजांनीं घोरपड्यांची समजूत घालून बंद करविले.

रायाला करिती सारे
तैं स्मरे वाक्य दरबार 'द्या करीं जरा समशेर' ! ११

व्यक्तिद्वेषाचें खूळ जातिद्वेषाचें मूळ
देशोन्नतिच्या मार्गांत हे मोठे उन्नत सूळ
हो ! महाराष्ट्र-भक्तांनों काढा उपटून समूळ
जो देशभक्त जातीचा
जो शौर्यशाली वंशाचा
तन्मुखिं न विनंती-वाचा
मागतो संकटीं शूर द्या करीं जरा समशेर ! १२

***

# शाहूची यवनी माता

राजारामाच्या मृत्यूचे वर्तमान शाहूला कळलें, त्यावेळीं त्याला अतोनात दुःख झालें. केव्हां ना केव्हां तरी काका आपली सुटका करतील अशी त्यास आशा होती, ती समूळ नष्ट झाली. आतां आपणास शेवटपर्यन्त मोंगलांच्या अटकेंत रहावें लागणार. या हृद्रोगानें त्याचें मनःस्वास्थ्य नाहींसें झालें व शेवटीं त्याला मोठा ताप येऊ लागला. येसूबाई व बेगम [रोषनार] साहेब फारच घाबरल्या. बेगम तर शाहूचा बिछाना सोडीनाशी झाली; व देवाची करुणा भाकू लागली. औरंगजेबाला ती गोष्ट कळली तेव्हां तो स्वतः शाहूच्या सामचाराला गेला व त्याच्या अंगावरून हात फिरऊन म्हणाला "तुम्हारा चाच्या मरगया उस्वाते तबियत बिघड गई? तुम् हमारे बेटीके बेटे हो फिकर मत करो. तुमारा राज्य तुमकू देऊंगा." पुढें बेगमच्या अविश्रांत खटपटीनें शाहूस आराम पडला. (गोगटेकृत शाहू म. चरित्र पान २८.)

काकांचा ऐकुन मृत्यू शाहूचा खचला धीर
आशेचा तुटला तंतू मुक्तीची इच्छा दूर
शय्येवरि हृद्रोगानें तनु झाली क्षणभंगूर
तो रायगडाचा कान्हा
येसूबाईचा तान्हा
तापांत कण्हत असतांना
तळमळते चिंतायुक्ता रोषनार बेगम माता १

"ध्यास सोड वेड्या जीवा! भेटतील कैचे काका

स्वातंत्र्य कोठचें दैवीं बंदिवास ठरला पुरता
वागवो शहा कैसाही तोच तात बंधू आतां"
अंतरांत कढ दुःखाचे
नेत्रांत नीर शोकाचें
नुमटती शद्व शाहूचे
अधिक बिंदु गळती, पुसतां रोषनार बेगम माता २

पाहतो जन्मदात्रीला तों हृदय भरोनी येतें!
पाहतो प्रेमदात्रीला तों अखंड धारा गळते!
"रडुं नको, नको मज रडवूं सांग काय तुजला गमतें?
धर्माच्या पुत्रासाठीं
औरंगशहाची बेटी
करिल शक्य साऱ्या गोष्टी"
समजावी तत्सुखनिरता रोषनार बेगम माता ३

प्रीतीची सरिता जेथें जातिभेद कुठचा तेथें?
मायेचा सागर जेथें धर्मभेद कुठचा तेथें?
एकात्मभावना होतां रक्तही वितळुनी जातें
ही दिव्य देवतानीती
जी साधुसंत आचरिती
ती निर्मल योषिज्ज्योती
दाखवीं सुकीर्ती-विख्याता रोषनार बेगम माता ४

घालून आपुला हात एसूबाईच्या कंठीं
भगिनीला भगिनी सांगे ती समजूतीच्या गोष्टी
परि तिचाच दाटुन कंठ फुटती न शद्ब तैं ओष्ठीं
वत्सलता स्फुंदत होती
प्रीतीला भाषा नव्हती
तिजसवें करी रोदन ती
कवण प्रीतीची वनिता ? रोषनार बेगम माता ५

"दुग्धाचा एकहि घोट बाळ कांहीं प्याला नाहीं !
टाकिलें बळें तोंडांत कंठांत उतरलें नाहीं !
हीं पात्रांतिल पक्वान्नें मज रुचतिल केवीं बाई !
मस्तकीं ठेवुनी हात
अनिमिष त्याला पाहात
अश्रुंचीं फुलें वाहात
बैसली निकट दुःखार्ता रोषनार बेगम माता ६

एवढें राजमंदिर तें तिज अरण्य भासत होतें
उपभोग्य वस्तु असतांना मन विषण्ण झालें होतें
नश्वरता बाणुन चित्तीं ऐश्वर्य न रमवि मनातें
रात्रंदिन बसुन उशाशीं
प्रार्थोनी परमेशाशीं
करि नाना उपचाराशीं
ती सम्राटाची दुहिता रोषनार बेगम माता ७

शेवटचा सुटला धाम वसनें तीं चिंब जहालीं !
देहास लावितां हात शीतता दिसे आलेली !
नाडीला लावुन हात हकिम मान खालीं घाली !
भेसूर दुःख तेव्हांचें
जननीचें कीं यवनीचें
वर्णावें तरी कोणाचें ?
कष्टली तनूस न बघतां रोषनार बेगम माता ८

स्वाभाविक अदय मनाचा औरंगशाहा विख्यात
प्रीतिशील त्याची कन्या ही आश्चर्याची मात
कोळशांत हिरकणी जैशी वा नलिनी जणुं चिखलांत
काष्ठाला अंकुर फुटला !
दगडाला फाझर फुठला !
कळवळा शहाला आला !
थोपटीत होती पुत्रा रोषनार बेगम माता ९

कठिण शैल चितीं द्रवतो सरितेच्या प्रेमजलानें
मेघाला सुटती धारा चमकतां वीज तेजानें
दिल्लीश्वर पाझरला तो त्या उदात्त देखाव्यानें
" अल्लानें खैर करावी
दख्खनचा राजा भावी
उपभोगो राज्य सुदैवी
दुहिता न यशाची सरिता रोषनार बेगम माता " १०

सर्व सदय झाले होते सर्वेशही निर्दय नव्हता
हरएक मंगलाकांक्षी हरिही न अमंगल—कर्ता
सकलेच्छा ‘ संकट जावें ’ सकलेशहि संकट—हर्ता
येसूबाईंचें सुकृत
निजलेलें उठलें हंसत
तरि बेगम होती जपत
झाली संजीवनि—माता रोषनार बेगम माता ११

वैभवावरी चढणारा शौर्यकीर्ति गाजवणारा
अटकेवर बाहु—बलानें जरिपटका नाचविणारा
बा! अशा महाराष्ट्रा! तूं यवनी मातेचा प्यारा
तत्स्मरण सदा तुज व्हावें
यवन सर्व बंधू—भावें
प्रेमानें तूं कवळावें
शिकवून जाय सच्चरिता रोषनार बेगम माता १२

***

# मोहरा इरेला पडला

## ( वसईचा वेढा )

मोठ्या तुमुलयुद्धाचे व अगदीं निकराच्या हल्ल्याचे अनेक प्रसंग महाराष्ट्राच्या इतिहासांत आहेत; पण त्या सर्वांत वसईचा वेढा अधिक महत्वाचा होय. किल्ला पोर्तुगीजांच्या ताब्यांत असून तो सर करण्याचा चिमाजी अप्पांचा निर्धार होता. किल्ल्याच्या तिन्हीं बाजूस पाणी, जमिनीच्या बाजूनें सुरुंग लावावे तो वरून पोर्तुगीजांनीं आगीचा वर्षाव करावा ! चार महिने झाले तरी किल्ला हातीं येईना. तेव्हां एके दिवशीं आप्पांनीं आपल्या सरदारांस बोलावून सांगितलें कीं, " माझें डोकें तरी तोफेच्या धडाक्यानें उडवून वसईच्या किल्ल्यांत जाऊन पडेल असें करा, म्हणजे माझा हेतु पूर्ण होईल ! " अशा प्रकारें आप्पासारखा " मोहरा इरेला पडला ! " हें पाहून सरदारांस चेव आला आणि त्यांनीं आगीचा मारा होत असतां वाळूंत चर खणून सुरंग लाविले. सुरंगांनीं खिंडार पडतांच " हर हर महादेव " अशा गर्जनेनें मराठ्यांनीं निकराचा हल्ला केला आणि तटावर बावटा रोविला !

बेलाग दुर्ग जंजीरा वसईचा किल्ला असला
दुस्मान ' फिरंगी ' तिथला आटोपे नच कोणाला
त्या सिंहाला पकडाया भारतीय ' चिमणा ' सजला
गोव्याचा टोपीवाला
कोंकणचा पगडीवाला
लागली झुंज उभयांला
बुद्धीचा डाव उडाला मोहरा इरेला पडला १

मर्द त्या मराठी फौजा रणकीर्ति जयांच्या गाव्या
तळ्हातीं शिर घेउनिया चालुनी तटावर जाव्या
जणुं घोंगावत मधमाशा झणिं मोहळास बिलगाव्या
कडकडाट वरुनी व्हावा
सारखा अग्नि वर्षावा
परि सिंहाचा तो छावा
परतेना हिंमतवाला मोहरा इरेला पडला २

बोलाउनि सरदारांना तो समरधुरंधर बोले
शूरांनो वेढा द्याया चार मास होउनि गेले
आवडते कंठमणीही कार्य काय त्यांनीं केले ?
बेहिंमत जे असतील
परतोनी ते जातील
मी आहे निश्चयशील
जा कळवा श्रीशाहूला मोहरा इरेला पडला ३

घालुनी उडी संग्रामीं जिंकील भयंकर काळ
मी असा घेतला होता एकेक निवडुनि लाल
मी तुम्हांस मानीत होतों शौर्याचे तेजोगोल
जाहली परीक्षा आजी
मति खिन्न जाहली माझी
म्हणतील काय ते बाजी ?
जा कळवा घरीं दादाला मोहरा इरेला पडला ४

तोफेच्या तोंडीं मातें बांधोनी उडवा हातें !
शिर तुटुनी त्या आघातें किल्ल्यांत पडूं द्या त्यातें !
प्रिय असेन मी तुम्हातें पुरवा अंतिम इच्छेते !
तीं निर्वाणीची वाणी
डोळ्याला आले पाणी
प्रत्येक वदे गहिंवरुनी
'इर्षेस वीर हा चढला मोहरा इरेला पडला' ५

लागला विषारी बाण सकलांच्या अंतःकरणीं
शस्त्रांस पोंचले हात लढवय्यांचे फुरफुरुनी
उतरुनी रक्त डोळ्यांत नजराही गेल्या फिरुनी
ध्वनि 'हर हर' ऐसा झाला
पाठीच्या सुटल्या ढाला
बोलती सकल या बोला
'राखूं निज लौकीकाला मोहरा इरेला पडला' ६

गोळ्यांच्या माऱ्याखालीं चर खोदोनी रेतींत
उडविले सुरंगी बार तट लोळविला मातींत
गर्जना एकदम झाली पडलेल्या खिंडारांत
जों बांध तटाचा फुटला
तों सेनासागर सुटला
धैर्याचा किल्लेवाला
बंदुकीस भाला भिडला मोहरा इरेला पडला ७

कदमाच्या पुढतीं कदम चालले कदम सरदार
वारावरि करिताचि वार अनुसरले शूर 'पवार'
शिंद्याचा खंदा घोडा सोडिला जणुं कीं तीर
वावटा धरुनि तोंडांत
भोंसला चढे जोमांत
आगीच्या वर्षावांत
सामना भयंकर झाला मोहरा इरेला पडला ८

गरनाळी तोफा मोठ्या धुंकार कराया सजल्या
घायाळ धडाधड खालीं तनु कितीकांच्या धडपडल्या
छातीचे निधडे वीर चिंध्या परि त्यांच्या झाल्या
पगडीची फौज हटेना
शत्रूची पकड सुटेना
तो विजयश्रीचा 'चिमणा'
बेहोष होउनि लढला मोहरा इरेला पडला ९

शौर्याची शर्थ जहाली बावटा तटावरि चढला
जयनादानें वसईचा दिक्प्रांत अहा दुमदुमला
पोर्तुगीज किल्लेवाला अप्पांच्या शरणीं आला
राष्ट्राची वाढे किर्ती
तो समय आणि ती मूर्ती
ठाके कवि नयना पुढतीं
आठवतां या वाक्याला मोहरा इरेला पडला १०

***

# कुंभेरीची भंबेरी

सर्व उत्तर हिंदुस्थान काबीज करण्याच्या इराद्यानें इ०स० १७५४।५५ सालीं श्रीमंत रघुनाथराव पेशवे यांनीं पुण्याहून नगारे वाजविले! त्यांच्या बरोबर मल्हारराव होळकर, जयाजी शिंदे, यशवंतराव पवार, वगैरे मातब्बर सरदार होते. हा पेशव्यांचा दिग्विजयी काळ होता. जयपूर, बिकानेर, कोटा या संस्थानांतून खंडण्या घेत घेत मराठी फौज सुरजमल जाटाच्या मुलखांत शिरली. मराठ्यांनीं त्याजकडे एक कोट रुपये खंडणी मागितली; तो ४० लक्ष रुपये देण्यास कबूल झाला. मराठे ऐकेनात. जाट चांगला सामर्थ्यवान व लढवय्या होता. कुंभेरीच्या अभेद्य किल्ल्यांत त्याचें ठाणें होतें. त्यानें ४० लक्ष रु. घ्या नाहींतर युद्धास तयार रहा, असा निरोप देऊन बरोबर ५ गोळ्या व दारूही पाठऊन दिली.

मराठ्यांस मनस्वी अपमान वाटून त्यांनीं कुंभेरीस मोर्चे लाविले. मल्हारराव होळकरासारखा युद्धकलापटु सेनापति पुढें होऊन त्यानें खंदकातून तोफा,-हत्तनाला सुरतनाला यांचा कुंभेरीवर मारा सुरू केला ! जाटांनींही वरून आगीचा केवळ पाऊस पाडला! इतक्यांत मल्हाररावाचा एकुलता एक पुत्र, सती अहिल्येचा सौभाग्यतिलक खंडेराव, जाटाकडील जेजालेच्या गोळ्यानें मोर्चांत ठार झाला. पुत्रदुःखानें भडकून गेलेल्या त्या कर्दनकाळ वीरानें यमुनेच्या तीरीं त्याचें श्राध्द करीत असतां घोर प्रतिज्ञा केली कीं, "कुंभेरीची माती खणून यमुनेंत टाकीन तरच जन्मास आल्याचें सार्थक !"

सुरजमल्ल जाट मल्हाररावास ओळखून होता. होळकर आपली प्रतिज्ञा पूर्ण केल्याशिवाय राहणार नाहीं म्हणून त्याला जरब बसली व तो घाबरला. त्याचा रूपराम नांवाचा एक मोठा राजकारणी मंत्री होता. त्यानेंही जाटास

तह करण्याची सल्ला दिली. जाट अर्ध कोट रुपयांची खंडणी देऊन शरण आला ! होळकरांच्या नुसत्या जरबेनें 'कुंभेरीची भंवरी' उडाली ! शरण आलेल्यावर शस्त्र धरूं नये हें लक्षांत घेऊन त्या उदार सरदारानें त्यास सोडून दिलें.

दाक्षिणात्य शौर्याब्धीचा भरतीचा विजयी काळ
केंद्रस्थल पुण्यपुरीचें उसळली लाट त्रिकाळ
उत्तर विंध्याद्रीपुढचा मुलूख तो बिकट खडकाळ
जयपूर बिकानिर कोटा
तुडवून मुलुख गढ-कोटा
जाटावर वळल्या लाटा
मग ये वेळा उडणारी कुंभेरीची भंवरी १

सरदारांच्या तोफांचे कोटाला मोर्चे भिडले
गोळ्यावर सुटती गोळे तटबंदी लेश न हाले
रेतीचें रणमैदान यत्न ना सुरंगी चाले
चावती मराठे ओठ
सांपडतां थोडी वाट
कापोनी काढूं जाट
म्हणती उडवूं निर्धारी कुंभेरीची भंवरी २

भाल्याच्या फाळावरती बसवोनी जयलक्ष्मीला
दुंदुभिच्या ठेक्यावरती नाचवींत शौर्यश्रीला
ढालेचा मिरवित हात इंदुरचा गाजी आला

अनुक्रम
विभाग
क्र.
नों. दि.

अभिमान सुभेदारीचा
विश्वासही कर्तृत्वाचा
उचलिला विडा पैजेचा
उडवीन म्हणे मल्हारी    कुंभेरीची भंबेरी

जोडी कर्णार्जुन यांची    किंवा अर्जुन—भीष्मांची
कीं सुरेंद्र इंद्रजीतांची    इंद्रजीत सौमित्रांची
वा रावण रघुनाथाची    रघुनाथ परशुरामाची
त्या रणतीर्थांच्या तीरीं
एकाला दुसरा भारी
जन म्हणती "निश्चयकारी—
हा उडविल रिपुबलहारी    कुंभेरीची भंबेरी!" ४

घनघोर युद्ध करणारा    छातीचा बांधून कोट
कोटाला मारुन बगल    दारावर गेला थेट
'एळकोट' करुनी सजला    फौजेचा घेऊनि गोट
हस्तनाळ गर्नाळांचा
सुतरनाल जेजालांचा
वर्षाव करुनि अग्नीचा
चढवी उडवाया स्वारी    कुंभेरीची भंबेरी ५

घन गर्जे सुरजमल्ल    मल्हार केसरी गर्जे
हेमंत भानुसम जोट    हा ग्रीष्म-भानुसम साजे
तो[1] नीळ शनैश्वर तारा    हो[2] मंगळ तारा शोभे

१ कुंभेरीचा किल्लेदार २ मल्हारराव होळकर

कुंजर जैसा नंदीला
कीं गरुड जणों हंसाला
तैसा भिडला जाटाला
उडवाया समरविहारी कुंभेरीची भंवेरी ६

विजयाचे तोरण इकडे अर्जुन हो बांधित होता
तिकडे सुत खंडेराव अभिमन्यू झगडत होता
मोर्चाच्या चक्रव्यूहीं जणुं भास्कर तळपत होता
अवतारच खंडोबाचा
भंडारा उडवी रिपुचा
तो कसचा परतायाचा
उडविल्याविना माघारीं कुंभेरीची भंवेरी ७

जाटांची कडवी जात अब्रूला मरतिल सारे
दांतीं तृण धरतिल कसचे जीवाला तृण गणणारे
मरतांना पडतिल उलथे पाठ न परि दाखविणारे
त्यांनाच तयांची जननी
धन्य होय हो प्रसवोनी
तन्निश्चय गेला ठरुनी
"पाहूं कैशी उडणारी कुंभेरीची भंवेरी" ८

कडकडाट इतुका झाला कीं असंख्य विदूयुत्पात
गोळेही इतुके सुटले जणुं ताऱ्यांची बरसात
उठला कीं इतुका धूर जणुं जमले घन व्योमांत

दरवाजा पहिला फुटला
दुसऱ्यावर हल्ला चढला
चिरडून तिथें वैऱ्याला
उडविण्यास घेइ भरारी कुंभेरीची भंबेरी ९

अपशकुनी डावा बाहू तों एकाएकीं स्फुरला
गोळ्यानें जेजालेच्या 'खंडोजी' ठार जहाला
ऐकतांच दुर्वार्तेला हातांतुन भाला पडला
शव लावोनी पोटाशीं
अश्रूंच्या गाळी राशी
गमलें परकीय जनांसी
विसरेल वाक्य मल्हारी 'कुंभेरीची भंबेरी' १०

नारिला फणेवरी टोला फणि सूड न घेईल काय?
छाव्याचा मुडदा बघुनी संतप्त केसरी होय
जल–ओघाखालीं खळगा पाडितां गर्जना होय
ज्याचा विजयी भुजदंड
शत्रूची शमवित कंड—
मिळवी जयकीर्ति अखंड
उडवील न काय करारी कुंभेरीची भंबेरी ११

"त्वां माझें श्राद्ध करावें मज तुझेंच करणें आलें!
तव हस्त-तिलोदक प्यावें मीं तुलाच प्याया दिधलें!
सुत एकचि तूं होतांसी मत्सद्गति पुढची न कळे!

जाहला आज निर्वंश
जो करी दुष्ट विध्वंस
छेदीन तयाचा वंश
उडवितों पहा अनिवारी कुंभेरीची भंबेरी ॥ १२

ऐक गे! अहिल्ये! देवी! ठेवी न चितेवर पाय
विरहाची तूंही आग मज लावुं नको गे हाय!
श्वशुराची विनंती माझी तूं अमान्य करिशिल काय?"
ती स्नुषा शीलकुलवान
परतवी तिला विनवून
येतोंच म्हणे उडवून
रिपुवंश हनन करणारी कुंभेरीची भंबेरी ॥ १३

"कुंभेरीचा कुंभार बसवीन गाढवावरती
चौमुलुख धिंड काढून देईन यमाच्या हातीं
यमुनेचा बनवीन गाळ या कुंभेरीची माती
सार्थकता तरि देहाची
पूर्तताहि जनकत्वाची
त्यावीण शांतता कुठची?
अजि उडेल संस्मृतिकारी कुंभेरीची भंबेरी" ॥ १४

ऐकुनी प्रतिज्ञा घोर वायूही चित्तीं त्याला
तव भरलीं शंभर वर्षे सांगून जाय जाहला
मोठीच वावटळ उठुनी गड पांडुरवर्ण जहाला

उमळोनी तरुवर पडले
घन विवर्ण होऊन गेले
कीं उडवी आजचि नकळे
हा भीष्म वाक्यनिर्धारीं कुंभेरीची भंबेरी १५

घेतलें सतीचें वाण परतेल न तो माघारी
राहिला उभा बदलून तो दहांस असतो भारी
तळहातीं शिर जो घेतो काळहि ना त्यास निवारी
रूपराम मंत्री वृद्ध
राजनीति कुशल गुणज्ञ
स्वामीस करी सद्बोध
उडवील वीर इंदोरी कुंभेरीची भंबेरी १६

" ऐकोनी नांवचं घोडे लाविती न मुख पाण्याला
थोपटून मानेवरती पुसतात तुर्क तुरगाला
"क्या पानीमें दिखता है मल्हारी[1] भालेवाला?"
ऐसा हो ज्याचा धाक
तो करील दौलत खाक
माराल मागुनी हांक
उडतांची हृदय-विदारी कुंभेरीची भंबेरी १७

कोपून पुणें दरबारीं आपटतां पद जोरानें

१ मल्हारीचें

तो काबुलचा दरबार      दरकला उग्र भीतीनें
तें सुलेमान तख्ताचें      हाललें शिखर कंपानें
वेळीं न हुशारी धरिली
पगडी न जरी लववीली
तरि सर्वांशीं उडलेली
येईल बघुन अंधेरी      कुंभेरीची भंबेरी १८

भाल्यावर ज्याच्या निंबू      शेंदूर फांसुनी राही
तें निंबू कसचें राया !      वैऱ्याचें डोकें पाही
काळाचा दंड बघोनी      रक्ताचें पाणी होई
बुद्धीशीं वैर न आणा
सलतिल जरि हित–वच कर्णा
तरि उडलेली बघतांना
डोळ्यांतुन वाहिल वारी      कुंभेरीची भंबेरी १९

राजस्थानाची भूमी      हयपदोत्कीर्ण झालेली
आर्यावर्ताची धरणी      वृकगृध्र-काकमय असली
अंतर्वेदीची क्षोणी      नररुधिरसिक्त बनलेली
यांकडे तरी पाहून
आपुली शक्ति जाणून
उडवा न गर्व वाहून
अंतर्यामीं सलणारी      कुंभेरीची भंबेरी २०

*      *      *

खंडणी अर्धकोटीची देउन रिपु शरणीं आला
चरणीं लवलेल्यावरतीं धरवे न शस्त्र कोणाला
शूरास दयेचीं शास्त्रे लागती न पढवायाला
औदार्य मनाचें दावी
रक्तपात चुकवी भावी
नुसत्या जरबेनें उडवी
रिपु गर्व हनन करणारी कुंभेरीची भंबेरी २१

# कीर्तीचा ध्वज मळवीला

## विषय-सूत्र

"गिलचांच्या सरदारांनीं रोज रोज आमचीं रसद लुटावी, पठाणांनीं आमच्या सैनिकांचा धुव्वा उडवावा, आणि आमच्या एकाही मराठे सरदारास या गोष्टीचा सूड उगवितां येऊ नये! ही मोठी नामुष्कीची गोष्ट आहे! आमचे कांहीं सरदार तर पोरवयाचेच आहेत, पण–" जनकोजी शिंद्यानें भाऊसाहेबांस पुढें बोलूंच दिलें नाहीं; तो ताडकन् उठून उभा राहिला आणि म्हणाला–, "कां हा रणसिंह शिंद्यांचा छावा स्वामीस तेजोहीन वाटला कीं काय? हा असा जातो आणि या म्यानांतून बाहेर काढलेल्या समशेरीचा प्रभाव दाखवून नंतर चरणांचें दर्शन घ्यावयास येतों." असें बोलून तो अठरा वर्षांचा फाकडा वीर भरदरबारांतून निघून गेला! भाऊसाहेब व त्यांचा तो दरबार त्या बालवीराकडे विस्मयपूर्ण दृष्टीनें पहातच राहिला!

हा तरुण वीर आपल्या बोलण्यानें इर्षेस चढून साहसास प्रवृत्त झाला हें ध्यानीं येऊन प्रसंगीं मदत करावी व पाठ राखावी म्हणून बळवंतराव गणपत मेहेंदळे यांस हुकूम सुटला! बळवंतराव व जनकोजी यांचे मनोमनीं चांगलें नव्हतें. मेहेंदळे आपली खास पागा घेऊन गेले. पण शिंद्यावर ऐन गर्दीच्या वेळीं एकजात ५०० पठाणी स्वार तुटून पडले असतांही ते गिधाडासारखे घिरट्याच घालीत होते! मेहेंदळ्यांची हरामखोरी शिंद्याच्या तेव्हांच लक्षांत आली आणि त्या झटक्यांत तर तो अधिकच मर्दुमकीनें लढला.

विजयी होऊन रक्तानें भरलेली ती जनकोजीची बालमूर्ती आपल्या कंगणीदार पगडीला मिरवीत, घाम पुसीत दरबारांत ठाकली! तेथें मोठ्या जोरदार भाषेत त्यानें मेहेंदळे यांचा पाजीपणा व्यक्त केला. भाऊसाहेबांनीं शिंद्यांची

पाठ थोपटून बळवंतरावास दोष दिला. गुडघ्यांत मान घालून बसलेले बळवंतराव घरीं येतात तो दारांतच उभ्या असलेल्या त्यांच्या पत्नीनें 'कीर्तीचा ध्वज मिळविला !' असें म्हणून त्यांचा धिःकार केला. घरीं दारीं चोहींकडे होत असलेल्या अपमानानें तो मानी पुरुष चिडून गेला. मळविलेला कीर्तिध्वज उजळून येईन नाहीं तर आपली 'स्वर्गात भेट होईल' असें पत्नीला सांगून त्यानें एकदम डंके वाजविले! ते ऐकतांच आपली खास तैनाती फौज घेऊन तो सरदारांचा सरदार सदाशिवरावभाऊ बळवंतरावाच्या रक्षणाकरितां त्याच्या पाठीशीं धाऊन आला. स्वतः श्रीमंत भगवा झेंडा तोलीत आपणाकरितां येत आहेत, हें पाहतांच बळवंतरावाचा कंठ भरून आला! या युद्धांत बळवंतराव पडले. भाऊसाहेब अत्यंत दुःखानें त्यांचे प्रेत घेऊन परत वळले. मेहेन्दळ्याबरोबर त्यांची सत्यचवनी पतिव्रता स्त्री तिथेंच सती गेली !!

खारींनीं म्हणती काल कीर्तीचा ध्वज मळवीला
जनकोजी ऐसा शिंदा बालवीर तोंडीं दिधला
दुरुनीच घालुनी घिरट्या गृध्रासम डोळा दिधला
मी महिंदळे वीरांची
वीर–पत्नि असतां साची
वार्ता दुर्लौकीकाची
मग कैशी ऐकूं बोला कीर्तीचा ध्वज मळवीला १

ओठाच्या वरचें दूध अजुनी न जयाच्या सुकलें
अठरा वर्षांचें पोर झेंडे फडकावित आलें
रणशूर शिकंदर गाझी ते माशा उडवित आले
व्यक्तिद्वेषाचा सूड
देशाच्या कार्यीं मूढ

उगवितात मानारूढ
नुमगलें कसें स्वारीला        कीर्तीचा ध्वज मळवीला        २

पांचशे पठाणी स्वार        शिंद्यावर येउन पडतां
एकटाच 'हर! हर!' शद्वें        बेहोष होउनी लढतां
तुम्हि भीमासम लढवय्ये        तै कोठें गेला होतां ?
कांकणें अम्हांसम हातीं
भरलेलीं कां हो होती?
दगडाची करुनी छाती
परतोनी कैसे आलां ?        कीर्तीचा ध्वज मळवीला        ३

रक्ताच्या कारंजांचे        तनुवरी फवारे उडले
घामाच्या धारा फुटुनी        डबडबुनी मुखही गेलें
श्रम होतां अपरंपार        तें म्लान जरासें झालें
शिंद्याची ऐशी मूर्ती
ठाकतां पेशव्यापुढतीं
शाबास! वाहवा! म्हणती
धिक्कार जाहला अपुला        कीर्तीचा ध्वज मिळवीला        ४

"काळीजच उलटे ज्यांचे        कुलटे आम्हांसह होते
चोरटे दगलबाजीनें        ते घिरट्या घालित होते
उलटेल केधवां डाव        उलटे ते चिंतित होते!"
शिंदे ऐसे रागांत—

वदतां भर दरबारांत—
घातली मान गुढघ्यांत
निर्लज्ज कसे तै झालां? कीर्तीचा ध्वज मळवीला ५

पाहतांच रणमैदान रोमांच थरारुनि जावे
आवेश भरोनी अंगीं छातीचे बन्द तुटावे
हृदयाच्या ठोक्यां सरसी शरीरांत रक्त खवळावें
जे प्रळयकाळचे सांब
काळाला म्हणतील ' थांब !
पळ असा तूं लांब '
बळि पडले ते द्वेषाला कीर्तीचा ध्वज मळवीला ६

ऐकुनी जयांचें नांव अरि-शरिरीं कंप सुटावा
नौबतिचा ध्वनि दुमदुमतां धैर्याचा दोर तुटावा
उसळुनी धडाडी घेतां शेल्यांचा कळप पळावा
ते काल ऐन समयातें
लावितां न कर खड्गातें
टकमक कां पाहत होते ?
मतविकार कैसा झाला कीर्तीचा ध्वज मळवीला ७

करकरीत कोरे कपडे रक्ताचा डाग न एक !
घमघमाट या गंधाचा घामाचा थेंब न एक !
तरवार कटीला नाहीं हातांत छडीचा झोंक !

या ऐशा वेषें मजला
कां भुलवायाला आलां ?
भुलणारी नाहीं विदुला
शौर्यावरि पाडुनि घाला कीर्तीचा ध्वज मिळवीला ८

स्वारी विजयाची माला येईल कंठिं घालून
दारांतचि मी आनंदे पंचारति ओवाळीन
राहुनी उभी शेजारी वरतीं पंखा वारीन
भोपळा भ्रमाचा फुटला
आशातरु दग्ध जहाला
मी सोडी निश्वासाला
ऐकिलें यदा ध्वार्तेला कीर्तीचा ध्वज मळवीला ९

दोषितात तुमचे तुम्हां सरदार तसेंच शिपाइ
गोटा--गोटांतुनि ऐका किति निंदा चाले बाई
देतात तुम्हाला उपमा "हे बारगिरांचे भाई !"
दुःशब्द कसे ऐकवती
अपमान कसे साहवती
कां वाटत नाहीं खंती ?
लाविला डाग वंशाला कीर्तीचा ध्वज मळवीला १०

'हा बेहिमत्याचा मुलगा' वदतील लोक बाळाला !
'ही नामर्दाची दासी' हिणवितील बाई मजला !
'विश्वासघातकी, पाजी' हीं विशेषणें तुम्हांला !

वडिलांची तुमच्या किर्ती
दुमदुमते आर्यावर्ती
शौर्याची होती मूर्ती
मोठ्यांच्या पोटीं आला  कीर्तीचा ध्वज मळवीला  ११

एरंड उसाच्या पोटीं  शेवाळ नदीच्या कांठीं
कीं आम्रफळाच्या पोटीं  निसत्व असावी बाठी
कंटक पुष्पाच्या देठीं  कांटे फणसाच्या पाठीं
कीं काच हिऱ्याच्या पोटीं
तुळशींत भांग उफराटी
अंधार रवीच्या पाठीं
जन्माला तैसे आलां  कीर्तीचा ध्वज मळवीला  १२

आलांत तसें जा परती  हें तोंड न मज दावावें
घालून पालथे शत्रू  मातींत मिळवुनी द्यावें
पडलेला डाग धुवोनी  दासीला दर्शन द्यावें
जरि गेलां स्वर्गावरतीं
तनु ठेविन सरणावरतीं
सेवीन येउनी वरतीं
बोलोत न जन या बोला  ‘ कीर्तीचा ध्वज मळवीला ’  १३

—*—

# २ स्वर्गांत भेट होईल

भामिनी पुरें कर आतां वाणीचें शर-संधान
त्वां जागविला हा सिंह खुपसून विषारी बाण
दारूच्या कोठारास लाविला अग्नि हा जाण
हो बाजूला चल दूर
गिलच्यांचा किति मगदूर
जरि दैवाचि झालें क्रूर
तरि शेवटचे हे बोल 'स्वर्गांत भेट होईल' १

वडिलांचे स्मरुनी पाय वाहतों शपथ कीं साफ
कीर्तीस लागला डाग तो क़रीन रुधिरें साफ
देणें मी देई पुरतें प्राणाचें भरुनी माप
कां प्रबळ गजाचा छावा
अबलेनें धिक्कारावा ?
हा दुर्दैवाचा कावा
जर शेवटचाच असेल स्वर्गांत भेट होईल २

ऐसाच जाऊनी घेतों समशेर आणि ती ढाल
बळवंतराव मी नाहीं जाहलों पुरा वेताळ
एकची करोनी देतों आकाश आणि पाताळ

रिपुपक्षाकडच्चीं भूतें
नाचवितों 'थैं थैं' तेथें
आलों तर येइन येथें
अंतिम वा संगमकाल स्वर्गांत भेट होईल ३

दुसऱ्याचें साह्य कशाला वनराज एकटा जातों
गर्जना फोडुनी मोठी शत्रूला धडकी भरितों
मेंढ्यांचा झेंपेसरसा पाडोनी फडशा येतों
कोल्ह्यांची गडबड काय
ठेवील न एकहि पाय
म्हणतील जिवाला हाय
दुर्दैवचि जरी उलटेल स्वर्गांत भेट होईल ४

बडबडती षण्मुख गर्वी थोपटती निज भुजदंड
गणपतिच्या बलवंताचा पाहिला न शुंडादंड
बघतों मजसह लढतीं कीं अजि वीर कोणते चंड ?
मी जीव तृणासम गणितों
हें नशीब ठोकुन जातों
जातांना तुजला वदतों
उलटेल जरी हा खेळ स्वर्गांत भेट होईल ५

त्या रणदुल्लाखानाला खेंचून आणितों पुढतीं
खिळखिळी करोनी हाडें वाघाला धरितों हातीं
मिरवीत आणितों येथें बांधोनी हत्तीवरतीं

त्या कापाकापीमध्यें
येतील पुढें जे योद्धे
पाडीन तयांचे मुर्दे
आलीच तशी जरि वेळ स्वर्गांत भेट होईल ६

मी महिंदळे नांवाचा गोंधळांत उडविन खटका
गांठून वजिर काबुलचा हातानें मारिन झटका
मग बघेन येतो कोण करण्याला त्याची सुटका
सिंहाच्या दाढेखालीं
एकवेळ जी सांपडली
वांचते कशाची शेळी
जरि निष्फळ वच होतील स्वर्गांत भेट होईल ७

मज मनःपूत निंदाया ज्यांचिया जिभा चुरचुरल्या
धरतील जिभा दातांत लाविल्या जयांनीं चुगल्या
तोंडांत घालतिल बोटें म्हणतील 'कल्पना चुकल्या'
हे कानामागून आले
शाहणे फारचि झाले
उघडितों तयांचे डोळे
अवतार जरी संपेल स्वर्गांत भेट होईल ८

अजवरी चकमकी झाल्या पोरखेळ पोरांचे ते
हैदोस कसा घालावा शिकवीन आज मी त्यांतें

कितिकांच्या विधवा दुःखें लावितील कर भाळांतें
आकाशीं जी थरथरली
उतरेल भूवरी बिजली
जर असेल वेळचि भरली
ज्योतींत ज्योत जाईल स्वर्गांत भेट होईल ९

कटिवरतीं नाहीं बाळ झोंपला काय नुकता तो ?
जागवूं नको · झोपूं दे एकवेळ पाहुन घेतों !
कमरेस घालुनी विळखा तो म्हणेल 'मीही येतों'
"जरि आलों बाळा परतीं
तरि घेइन मांडीवरतीं
नाहीं तर जेव्हां पुढतीं
मिळवून कीर्ति येशील स्वर्गांत भेट होईल" १०

येतोंच, अतां चढतीचा साध्वी ! कर्णा वाजेल
तास दोन तासांमध्यें मोठी दंगल माजेल
ही पानपताची भूमी नर-रुधिरानें रंगेल
तूं रहा बसोनी येथ
येतों जयघोष करीत
जरि फसले माझे बेत
मग ठरले अपुले बोल स्वर्गांत भेट होईल ११

* * *

तोडुनी पाश मायेचा कर्मवीर निघुनी गेला
ती तटस्थ पाहत होती हरिणाक्षी निश्चल विदुला

निज सौभाग्याचा लाल तो दृष्टिआडही झाला
निश्वास सोडुनी घ्याई
'हे देवी ! अंबाबाई !
काळजी इकडची नाहीं
इच्छा जरि तवचि असेल स्वर्गांत भेट होईल ' १२

***

## ३ विजयाच्या द्वारीं अडला

रणवाद्यें नौबत डंके कोणाचीं हीं दुमदुमतीं ?
कोणाचीं निवडक पथकें वळलीं कुरुभूमिवरतीं ?
हा महिंदळे सरदार ज्या 'पंचहजारी' म्हणती !

शिंद्यांचे वच ऐकोनी
अपमानानें जळफळुनी
अजि कम्मरबंद होवोनी

ललकारी ठोकित गेला विजयाच्या द्वारीं अडला १

श्रीमंत सदाशिव भाऊ सरदारांचा सरदार
पाठीवर धांवत आला दासांचा पालनहार
दिलदाराला बघुनीया गहिंवरुनी आलें फार

"कीर्तीचा ध्वज मळवीला
हो ! स्वामिं अशा दासाला
कां परतविण्याला आलां ?

परतेल न चाकर अपुला विजयाच्या द्वारीं अडला" २

"बळवंतराव ! इर्षेनें एकटे चालुनि आलां
सांभाळा आतां बाजू लागेल डाग तोंडाला,
भिडवितों बगल-मी डावी उजवीला तुम्हि सांभाळा."

तो गरुड भरारी मारी
भुज-पक्षानें रिपु सारी
कितिकांना ठोके मारी
कलकलाट भारी केला विजयाच्या द्वारीं अडला ३

बाणांच्या कैच्यावाले धाडसी जंबूरे वाले
उडवीत आगिच्या ठिणग्या अंगावर धाऊन आले
बाहूला बाहू भिडतां घाल्यावर पडले घाले
'मी मरेन वा मारीन
कीं कटेन वा काटीन
परि कीर्तीला उजळीन'
निर्धारें ऐशा लढला विजयाच्या द्वारीं अडला ४

तो ज्वालामुखिचा स्फोट पाषाण द्रवुनी जावे
कीं प्रभंजनाचा लोट उमळोनी वृक्ष पडावे
प्रक्षुब्ध अब्धिची लाट मासे खळबळुनी जावे
होणारें होवो कांहीं
मागें ना परतुन पाही
तुडवीत शवांना जाई
चौफेर घेरला गेला विजयाच्या द्वारीं अडला ५

भीषण शब्दांचे मेघ पर्वतावरी घसरावे
मोठाल्या जल-ओघांनीं सिंधुच्या तटीं नाचावें
कीं पतंग दीपाभंवतीं चहुबाजूंनीं झडपावे

धिप्पाड काबुली वीर
होउनी लाल अंगार
ठाकले कराया वार
फिरविना पाय तरि अपुला    विजयाच्या द्वारीं अडला    ६

एकटा वीर सगळ्याशीं    तो झगडे अति निर्धारें
ढालेचा फिरवित हात    खड्गाचे चुकवी मारे
धावोनी पट्टे आले    जीवास जीव देणारे
खणखणाट मोठा झाला
रक्ताचा पाउस पडला
तो महिंदळा मरणाला
थोडाहि न चित्तीं भ्याला    विजयाच्या द्वारीं अडला    ७

जाळ्यांत वाघ[1] सांपडला    हे दुरून अवलोकोनी
[2]भाऊही भगवा झेंडा    तोलीत येइ धावोनी
नेटानें चढवुन हल्ला    घुसला तो फाळि फोडोनी
तो योद्धा[1] हिंमतवान
पाही गर्दन वळवून
प्रेमाश्रू आले भरून
दुप्पट अवसानें लढला    विजयाच्या द्वारीं अडला    ८

मोहरा[2] महाराष्ट्राचा    जवळा आलेला दिसला
आरक्त रिपूचा डोळा    श्रीमंतांवरतीं फिरला

१ बळवंतराव मेहेंदळे.   २ सदाशिवराव भाऊ.

नरहरीचा तो तर होता आंतड्याच फाडित गेला
तो प्रसंग पाहुन नयनीं
चावून ओठ दातांनीं
पलटी घेऊन रावांनीं
ध्वनि हर हर ऐसा केला विजयाच्या द्वारीं अडला ९

उसळावा रबरी चेंडू तैसा उसळे त्वेषांत
स्वामींच्या भंवतीं फिरवी पठ्ठ्याचे गरगर हात
जणुं भरली होती वीज शूराच्या सर्वांगांत
पळसासम देहीं नटला
कमरेचा शेला सुटला
अवसर ना बांधायाला
तो रते स्वामिसेवेला विजयाच्या द्वारीं अडला १०

उंच उंच हिमगिरि-शिखरें देखावा पाहत होतीं
लाल लाल शोणित-सरिता धों धों खालीं वाहातीं
चळवळती गंगा यमुना भूवरच्या पुण्य-ज्योती
मेघांच्या नूतन पंक्ती
कोलाहल ऐकुन भीती
गिरिशिखराशीं दृढ धरिती
लढवय्या ऐसा लढला विजयाच्या द्वारीं अडला - ११

नामर्दाच्याही अंगीं स्फुरवील चेतना मोठी
विजयश्री हांसत यावी घालाया माला कंठीं

अनुक्रमांक ... नोंद दि. ...

कर्तृत्व बघोनी शद्ब भाऊंच्या आले ओष्ठीं
"बळवंतराव, शाबास !
द्या नीचांना गळफांस
कोंडून धरा अधमांस"
तो स्वामिवचें सरसरला विजयाच्या द्वारीं अडला १२

दैवानें केला घात घातली झडप काळानें
खंजीर खुपसला पोटीं गर्दीत कुणी पाप्यानें
भूमीवर उलथून पडला त्या प्राणांतिक घावानें
आरोळी एकच उठली
भाऊंच्या कानीं आली
तद्वाणी शोकें वदली
'कर्णासम योद्धा गेला' विजयाच्या द्वारीं अडला १३

हा तुटे स्वामिभक्तीचा तेजस्वी सुंदर हार
सति सुलोचनेचा झाला इंद्रजीत युद्धीं ठार
साध्वीच्या नेत्रीं आतां लागेल अश्रुंची धार
दैवाचा उलटा वारा
वाहतां जिवाचा प्यारा
धरणीवर फेंकी शरिरा
तो काय करिल दैवाला विजयाच्या द्वारीं अडला १४

* * *

तें प्रेत परत मिळवाया प्रेतावर प्रेतें पडलीं !
परतले सदाशिव-भाऊ बाष्पाला गाळित खालीं !
जखम ती स्वामिभक्ताची स्वामीला बाधक झाली !
म्हणती दैवाचे वादी
'पुढच्या नाशाच्या आधीं
अपशकुन घडोनी बाधी'
हा शकुन तसा भाऊला विजयाच्या द्वारीं अडला ५

---

# मुसलमान असलों म्हणून काय हिंदूंशीं बेइमान होऊं ?

पानिपतच्या संग्रामांतील मराठ्यांकडील प्रसिद्ध योद्धा इब्राहिमखान गारदी—ज्यावर भाऊंचा एवढा विश्वास कीं, शेवटचा विजय मी खानाच्या तोफांवर मिळवीन !—त्याला जातीच्या नांवाखालीं आपल्याकडे वळवून घण्याकरितां आदल्या दिवशीं रात्रीं अहमदशहा अबदल्लीनें आपल्या डोक्याची पगडी पाठविली व पगडीभाई होण्यास सांगितलें ! त्या स्वामिभक्त शूरानें ती परत करून त्याच्याकडे मुठभर दारू मात्र पाठवून दिली !

पाठविली पगडी अपुली 'करण्याला पगडी–भाई '
प्रेमाची भाषा तव जी भेद-नीति केवळ तीही
निश्चय मम ढळला नाहीं परि विचार आले कांहीं !
पाजिले जयानें दूध
त्यावरी करोनी क्रोध
ओकूं विष मी कां आज ?
स्वामीस घालुनी फासा बेइमान होऊं कैसा ? १

उदगीरावरचा माझा तो तोफांचा भडिमार
संगीनींची चतुराई ती कडाबिनीची फैर
पाहुन जो आनंदानें ' धन्य ! धन्य ! ' बोले वीर
'हाय' काय त्या वदवाया—
राज्यलोभ तव पुरवाया

दुर्लौकिक घेऊं वायां ?
जातीच्या मोहासरसा बेइमान होऊं कैसा ? २

व्यक्तीच्या स्वार्थासाठीं कां देशाला बुडवावें ?
जातीच्या मोहानें कां जन्मभूस बा रडवावें ?
नश्वर निज सौख्यासाठीं कां एकीला फोडावें ?
समर्यींच परीक्षा होते
शीलाला महती येते
वाढवी अचल कीर्तीतें
तो समय लाभतां ऐसा बेइमान होऊं कैसा ? ३

" आकाश फाडुनी खालीं सैतान उतरुनी आला
इब्राहिम माझा असतां काढीन भाजुनी त्याला
बसवोनी तोफेवरती पाठवीन निज–धामाला "
हा भाऊंचा विश्वास
मजविषयीं असतां, त्यांस--
सोडाया लावूं श्वास !
हा नव्हे गारदी पेशा बेइमान होऊं कैसा ? ४

सजलेली दाढी माझी भरलेला पीळ जियेला
याहुन जो हात न लावी रुसलेल्यांच्या दाढीला
ताठ्यानें जातां जाट जाईना परतविण्याला !
माझ्या संगीनी–वरतीं
दिसते ज्याला जयकीर्ती

त्यावरीच फिरवावी ती
शिवते न कल्पना सहसा · बेइमान होऊं कैसा ? ५

कोणती बगल भिडवावी कोणता व्यूह फोडावा ?
आणीबाणीच्या वेळीं मनसुबा काय ठरवावा ?
बोलावुन आधीं ज्यानें खानाचा सल्ला घ्यावा !
सरदारांचा सरदार
दिलदारांशीं दिलदार
माझ्यावर ज्याचा प्यार
विसरोनी तत्सहवासा बेइमान होऊं कैसा ? ६

चाळितां कुराणग्रंथ स्वामीची मूर्ती दिसते !
खलिपांचीं वचनें स्मरतां तद्वचमाला आठवते !
भाऊंचे बघतां वैरी रक्ताला उसळी येते
बंदुकीच्या नळिकेंतूनी
तोफेच्या तोंडांतूनी
उडती गोळे मैदानीं
करिती भाऊंच्या घोषा बेइमान होऊं कैसा ? ७

जातीचे हिंदु असोत देशाचे बंधू माझे
अभिमान तयांना माझा माझ्यावर त्यांचें ओझें
कर्तव्याच्या धर्माला जागोनी कीर्ती साजे
आज काय सांगूं वर्म
शिकवीन उद्यां तुज धर्म

कीं स्वामिभक्तिचें कर्म

निरवावें स्वामि-त्रासा बेइमान होऊं कैसा ? ८

उतरोनी यमुना, दिल्ली अडवूनी तुवां जी धरिली
दख्खन वाटेवरची नाकेबंदी ती केली
तळव्याची चढली आग मस्तकास जाउन भिडली !
दाराला लावुन पाय
वळवाया बघशी काय ?
मी होइन कां निरुपाय ?
सोडून दीर्घ निश्वासा बेइमान होऊं कैसा ? ९

होईल उद्यां उभयांचें जें हटा-तटाचें युद्ध
इतुतूंत तुम्ही बोलाल 'दीन दीन' ऐसे शब्द
मी कर्तव्याच्या घोषें हसवीन ज्ञानी वृद्ध
गोलघुमट बांधुन पुढतीं
देऊन अराबा भंवतीं
एकदांच ती सरबत्ती
देईन घालुनी वळसा बेइमान होऊं कैसा ? १०

बरवा हा माझा मजला शोभतो शिपाई बाणा,
मोत्यांची पगडी तूझी ही परती तुज करितांना,
एक मूठ दारू देतों हा शूरांचा नजराणा !

'मुसलमान हिंदूसाठीं
घेती मृत्यूच्या गांठी
हा इतिहासाच्या पाठीं'
लिहवीन लेख सुंदरसा		बेइमान होऊं कैसा ?		११

***

# गारदी कटोनी मेला !

कुरुक्षेत्रावर निदानीचा संग्राम करावयास मराठी फौज सज्ज होऊन पुढें आली. इब्राहिमखानाचे पडघम ढोल झडूं लागले. त्याच्या पलटणी आघाडीवर चालल्या. नखशिखांत लष्करी पोषाखांत नटलेला तो जग–बहादूर भाऊसाहेबापुढें शेवटच्या सलामीस आला, आणि अहमदशहा अबदालीकडून– आपणांस येऊन मिळण्याविषयीं आलेलीं पत्रें दाखवून म्हणाला, "साहेब, मी इस्लामधर्माचा आहे पण निमकहराम नाहीं हें आपल्या प्रत्ययास येईल. या युद्धांत जरी मी नामोहरम झालों तरी घन्याकरितां– "गारदी कटोनी मेला" हेच माझ्या कीर्तीचे शद्ब जगाच्या कानीं जातील ! भाऊसाहेबांचा त्याच्यावर फार लोभ होता; तीं पत्रें पाहून ते फार सद्‌गदित झाले आणि इतकेच म्हणाले कीं, "खानसाहेब मीही तुम्हांबरोबर कत्तल होऊन जाईन पण मागें हटणार नाहीं ! आतां बोलायला वेळ नाहीं. घोडा मैदान समोर आहे. या भाऊचा अभिमान खानसाहेब कसा ठेवितात तो मी आज पहाणार आहे." इब्राहिमखानानें मान लववून फिरून एकवेळां सलाम केला; घोड्यास टांच मारिली आणि एकदम तोफांना सरबत्ती दिली !!

जातीचा 'खान' परंतू जो भारतभू-सुत होता
जो तिच्याच अंकावरतीं दुग्धामृत प्याला होता
यत्प्रवाह नवरुधिराचा नसनसांत खेळत होता
जननी–ऋण फेडायाला
स्वामिभक्ति दावायाला
'भाऊसह' पानपताला
इब्राहिम संगिनवाला गारदी कटोनी मेला १

# गारदी कटोनी मेला !

कुरुक्षेत्रावर निदानीचा संग्राम करावयास मराठी फौज सज्ज होऊन पुढें आली. इब्राहिमखानाचे पडघम ढोल झडूं लागले. त्याच्या पलटणी आघाडीवर चालल्या. नखशिखांत लष्करी पोषाखांत नटलेला तो जग–बहादूर भाऊसाहेबापुढें शेवटच्या सलामीस आला, आणि अहमदशहा अबदालीकडून– आपणांस येऊन मिळण्याविषयीं आलेलीं पत्रें दाखवून म्हणाला, " साहेब, मी इस्लामधर्माचा आहे पण निमकहराम नाहीं हें आपल्या प्रत्ययास येईल. या युद्धांत जरी मी नामोहरम झालों तरी धन्याकरितां– " गारदी कटोनी मेला " हेच माझ्या कीर्तीचे शद्ब जगाच्या कानीं जातील ! भाऊसाहेबांचा त्याच्यावर फार लोभ होता; तीं पत्रें पाहून ते फार सद्‌गदित झाले आणि इतकेच म्हणाले कीं, " खानसाहेब मीही तुम्हांबरोबर कत्तल होऊन जाईन पण मागें हटणार नाहीं ! आतां बोलायला वेळ नाहीं. घोडा मैदान समोर आहे. या भाऊचा अभिमान खानसाहेब कसा ठेवितात तो मी आज पहाणार आहे. " इब्राहिमखानानें मान लववून फिरून एकवेळां सलाम केला; घोड्यास टांच मारिली आणि एकदम तोफांना सरबत्ती दिली !!

जातीचा 'खान' परंतू जो भारतभू- सुत होता
जो तिच्याच अंकावरतीं दुग्धामृत प्याला होता
यत्प्रवाह नवरुधिराचा नसनसांत खेळत होता
जननी–ऋण फेडायाला
स्वामिभक्ति दावायाला
'भाऊसह' पानपताला
इब्राहिम संगिनवाला गारदी कटोनी मेला १

तो कवायती फौजेचा चौफेर बांधुनी गोल
चालला अघाडीवरती वाजवीत पडघम ढोल
भाऊस सलामी देतां शेवटचे वदला बोल
'मी धर्माचा इस्लाम !
नाहीं परि निमकहराम !
जरि झालों नामोहरम
संपादिन या कीर्तीला गारदी कटोनी मेला ' २

" ही वेळ न बोलायाची कर्तव्यसमय हा खान
हा समोर आतां आहे घोडा आणि मैदान !
पाही ठेवितां कैसा या भाऊचा अभिमान !"
चढवुनी मिशीवर हात
बोले तो आवेशांत--
येतील शब्द कानांत
' विजयी झाला वा गेला गारदी कटोनी मेला ' ३

मांडीच्या खाली घोडा फुरफुरुनी नाचत होता
टांचेनें उडवित गेला डोळयांनीं बघतां बघतां
तो मेघ वायुवेगाचा वीजेनें भरला होता
' कड कड ' या आवाजानें
दशदिशांस भरिलें ज्यानें
अंतींही तो जोमानें
गगनांत निघोनी गेला गारदी कटोनी मेला ४

गिलच्यांच्या तोफांवरतीं फेंकतां नेमके गोळे
होऊन तयांच्या ठिकऱ्या अस्मानीं तुकडे गेले
अफगाणी गोलंदाज होते कीं, नव्हते केले
तें युद्ध तोफखान्यांचें
चातुर्य खानखानाचें
उलटले डाव युद्धाचे
गढला, तेथुनी न ढळला गारदी कटोनी मेला ५

भेसूर गर्जना व्हावी नाचावी चपला वरतीं
वृष्टि श्रावण महिन्याची खंड ना जियेला पडती
खालतीं रक्तमांसांच्या चिखलानें भरली माती
तो घटोत्कची अवतार
गारदी रिसालेदार
रक्ताची गाळित धार
गर्दींतचि गारद झाला गारदी कटोनी मेला ६

तें दैवचि फिरलें होतें करणार काय त्या कोणी?
आकाश फाटलें त्याला लावावें ठिगळ कुठोनी?
रोधावें सागर फुटतां खडकानें किति अडवोनी
'विश्वास' सोडुनी गेला
'भाऊ' न दिसे नयनाला
स्वामीच्या परि कामाला
लढला तेथेंचि निजला गारदी कटोनी मेला ७

होळीच्या होळकरांची आधींच परतली स्वारी
बिजलीवर बनुनी स्वार शिंद्यांची फिरली स्वारी
रणरंग पाहुनी घेती एकेक पाय माघारी
समशेर-बहाद्दर पडले
तेजस्वी तारे तुटले
पेंढारी धावत सुटले
रणसिंह न परि चळवळला गारदी कटोनी मेला ८

शिंद्यांची दृष्टी गेली इब्राहिमखानावरतीं
फेट्याचे पेंच सुटोनी मानेच्या भंवतीं रुळती
अर्धीच जळाली दाढी फेंसाची तोंडीं भरती
परि कवायती फौजेशी
दे वरचेवर हुकुमाशीं
नेउन भिडवी गिलच्यांशीं
नखशिखांत शौर्ये भरला गारदी कटोनी मेला ९

शूराचे शौर्य बघोनी राहवे न त्या शूराला
'शाबास ! खानसाहेब !' गहिंवरुनी शिंदा वदला
तो जंग-बहादुर मान लववोनी थोडा हंसला
"पाटील चाललां तुह्मी
येऊं न शके परि हा मी
कळवा नानांस सलामी
सांगा कीं—"नाहीं हटला गारदी कटोनी मेला १०

तनख्याच्यासाठीं ज्यानें अडवून कितीदां धरिलें
हट्टही तुम्ही लाडानें ज्याचे सगळे पुरवीले
आपुल्या कृपेची छाया ज्यावरी सर्वदा डोले
बेइमान नाहीं झाला
जागला खऱ्या निमकाला
घनघोर अशा समयाला "
हें कळवा हो ! नानांला गारदी कटोनी मेला ११

रडतील बायका पोरे जा सांभाळा जा त्यांना
घ्यों सलाम शेवटचा हा मज मारूं द्या गिलच्यांना
शिद्यांनीं मुख फिरवीलें लावून पदर डोळ्यांना
चालली लांडगे-तोड
आली बाजू बिनतोड
सर्वस्वी झाला मोड
विच्छिन्न होउनी पडला गारदी कटोनी मेला १२

हिंदूंच्या मानेवरतीं ठेवोनी अपुली मान
देशाचा अमुचा भाई निजला इब्राहिमखान
जातीचा पडदा आम्ही फेकोनी देऊं मान
निजराष्ट्रहिताच्यासाठीं
व्हाव्या सकलांच्या गांठीं
परवा न जिवाची मोठी
हें दावाया सकलांला गारदी कटोनी मेला १३

---

# विश्वास सोडुनी गेला !

पानिपतचें रणकंदन जोरांत येऊन जेव्हां खाशाखाशांचे मुडदे पडूं लागले, तेव्हां विश्वासरावांनीं हुजुरातीची पागा घेऊन दुराणीवर घोडे घातले आणि एकदम घाव केला ! तों एकाएकीच छातींत गोळी लागून विश्वासराव ठार झालें ! नानासाहेबांचे निधान हरपलें ! भाऊसाहेबही सरमिसळ होऊन स्वतः हत्यार चालवीत होते. 'विश्वास सोडून गेला' ही वार्ता ऐकतांच त्यांचे अवसान गेलें. त्यांनीं जवळ येऊन 'बाळ विश्वास' म्हणून त्याला उराशीं लाविलें. त्यानें 'काका!–' एवढेंच म्हणून भाऊंच्या खांद्यावर जी मान टाकिली ती पुन्हां उचललीच नाहीं !! तेव्हांचें भाऊंचें दुःख किती वर्णावें ?

रणदेवी कुरुभूमीची शतवर्ष उपोषित होती
पातला सदाशिवभाऊ रणकंकण बांधुनि हातीं
पेटलें कुंड युद्धाचें कित्येक आहुती पडती !

आकाश फाटलें सारें
भाऊंना शिरलें वारें
पाडिले शवांचे भारे

तों दुःखध्वनि हा उठला 'विश्वास सोडुनी गेला !' १

तें सळसळणारें रक्त गोठलें आंतल्या आंत
चेहरा उग्र भानूचा झांकला दुःखमेघांत
दृढ मिठी तीक्ष्ण खड्गाची जाहली शिथिल हातांत

शत्रूला कर्दनकाळ
पातला तेथ तत्काळ
लावुनी उराशी बाळ
शोकानें 'भाऊ' वदला ‘विश्वास सोडुनी गेला !' २

बोलुनी मुखानें 'काका' टाकिली मान ती स्कंधीं
बोलणें राहिलें पुढचें मृत्यूची चढली धुंदी
अंतींची इच्छा वदण्या राहिली न थोडी संधी
"घरबुडवे स्वामिद्रोही
गेले मज सोडुनि, कांहीं
चिंता मी केली नाहीं
परि हाहि लाडका मातें ‘विश्वास सोडुनी गेला !' ३

जिंकुनी दोन दिवसांत दिल्लीला दासी केली !
फोडुनी तक्त यवनांचें उधळोनी शकलें दिधलीं !
दक्षिणचा राजा तेथें बसविन प्रतिज्ञा केली !
आशेचे उंच मनोरे
जे गगनाला भिडणारे
ज्यावरतीं रचिले सारे
युवराज इथें तो मातें ‘विश्वास सोडुनी गेला !' ४

वसईच्या युद्धीं ज्यांनीं घाबरा ‘फिरंगी' केला
दभईला ज्यांनीं पुरता 'दाभाडयाला' निजवीला
भूषवी सदा उभयांना विजयश्री घालुनि माला

ते दोघे 'अप्पा' 'बाजी'
बैसुनी विमानीं आजी
मर्दुमकी बघती माझी
पण काय करूं हो बाबा ! 'विश्वास सोडुनि गेला !' ५

तोडून आइचें पोर मी निष्ठुर घेउनि आलों
तो बळी इथें हा दिधला खाटकी कसाई ठरलों
मिळविलें जरी यश आतां या जगीं निंद्य मी झालों
वेगांत हाकिली नौका
खडकाचा बसला ठोका
मृत्यू या क्षणीं प्रत्येका
दुःखांत दुःख हें मजला 'विश्वास सोडुनी गेला !' ६

पुसतील गोपिका वहिनी " विश्वास कुठें भावोजी ?
सौन्दर्यगुणाची ठेव विसरलीं कुठें ती माझी ?
कंठाचा मणि तो होता निजविला कुठें रणगाजी ?'
दाबिल्या आंतल्या ज्वाला
तोडिला पोटचा गोळा
स्वाधीन जियेनें केला
मी सांगू काय तियेला 'विश्वास सोडुनी गेला !' ७

टाकुनी लेखणी ज्यानें समशेर चढविली हाता
ती टाकुन या संग्रामीं येइल कां मजला जातां ?

दादाला काळें तोंड दाखवूं कसें तरि आतां ?
मारुनी धडक गिलच्याला
घेऊनी विश्वासाला
फिरविल्याहि असत्या ढाला
पण तोच कलीजा माझा 'विश्वास सोडुनी गेला !' ८

नानांना जाउनि माझें साष्टांग नमन सांगा हो !
भट कुळांतील भट गेला अश्रू ना कुणाचा वाहो !
श्री छत्रपती शिवबांचें तें तक्त सलामत राहो !'
बोलुनी अशा या बोला
आगीचा तो जणुं गोळा
आमींत उडोनी गेला
जाळिती शब्द हृदयाला 'विश्वास सोडुनी गेला !' ९

# गिलचा खाशानिशीं मारीन !

' विश्वासराव ठार झाले ! हें वर्तमान भाऊसाहेबांनीं पाहून अवसान सोडलें. बहूतसा विलाप करूं लागले. मग भाऊंनीं निश्चय केला कीं, या उपरी ' गिलचा खाशानिशीं मारीन ' म्हणोन लोकांस ताकीद केली, आणि झुंज केलें. हाणा ! हाणा ! असें मुखें बोलोन बरोबर समशेर घेऊन पुढें झाले, आणि तीन वेळ हत्यार केलें ! लोकांनीं हिंमत धरून भाऊसाहेबाबरोबर पुढें सरसावून शिपाईगिरी बहुत केली. दुराणी व नर्जाबखान रोहिला १०।१२ हजार फौजेनिशीं भाऊवर येऊन वर्षले ! ते समयीं मारामार अशी झाली कीं, ' न भूतो न भविष्यति ' एकदांच भोंवताले वेष्टून उभे राहिले. आंत रवंदळारवंदळ क्षणभर बहूतच केली त्यांत भाऊसाहेब यांची गत कशी झाली न कळे खासे कोणी दृष्टीनें पाहिले नाहींत. "

( पानीपतची बखर )

विश्वासनिधन—दुःखाचे भाऊनें डोळे पुसिले
पिळवटलेल्या हृदयाच्या उच्छ्वासांना आवरिलें
पाहिलें पुन्हां तें प्रेत क्रोधानें डोळे चढले

हृदयाचे ठोके पडती
सूडाची भाषा वदती
उठला ऐकून 'भाऊ' ती

निश्चयांत वदला वाचा 'खाशानिशीं मारिन गिलचा' १

सौभाग्यतिलक पार्वतिचा प्रळयार्थ 'सदाशिव' सजला
बलसागर पुण्यपुरीचा सोडोनी सीमा सरला
पुण्यप्रभु उदयगिरीचा मध्यान्हीं तप्त जहाला;

रणवाद्यांच्या नादांत
'हर! हर!' या रणघोषांत
चमके जें खड्ग करांत
त्यावरी लेख शूराचा 'खाशानिशिं मारिन गिलचा' २

भीष्मास वधाया कैसा श्रीकृष्ण त्वेषें गेला?
निःक्षत्रिय महि करण्याला परशुराम कैसा सजला?
भाऊनें गतगोष्टींची स्मृति दिधली कुरुभूमीला
अंगार भडकली होती
तरि तोफांपुढतीं छाती
शूराची नाचत होती
वाहे वायु श्वासाचा 'खाशानिशिं मारिन गिलचा' ३

प्रत्येक हिरहिरीसरसा गर्जे कीं 'हाणा! हाणा!'
हुतुतूनें लढतां लढतां खुणवी कीं 'हाणा! हाणा!'
'ठेवा मर्दांनों ठेवा भगवा झेंड्याचा बाणा!'
राष्ट्रीय निशाणावरतीं
गिलच्यांची झाली भरती
भाऊची गर्जे मूर्ती
'समय हा क्षात्रधर्माचा खाशानिशिं मारिन गिलचा' ४

उजव्या बाजूनें शिंदा 'हर हर' गर्जोनी उठला
तीराचा सुटला बाण कमरग्यांत जाऊन भिडला

डाव्या बाजूला खानें[1] गिरिसम होता गढलेला
शिंद्यांचा पुढुनी मार
खानाचा मागुन जोर
शत्रूस करी बेजार
अभिमान स्वामिवचाचा 'खाशानिशिं मारिन गिलचा' ५

हुजुरातीच्या फौजेनें राखिलें नांव हुजुराचें
वंशदीप यशवंतांनीं फेडियलें ऋण वंशाचें
दौलतिच्या आधारांनीं लाविले कौल देहाचे
दमदार दमाजी दमला
समशेर बहाद्दर अडला
विठ्ठल शिवदेवहि फिरला
फिरला निर्धार न त्याचा 'खाशानिशिं मारिन गिलचा' ६

विजयाच्या उन्मादांत होता तो अहमदखान
फत्ते झाली म्हणुनी तो धुंदीतच दुंदीखान
चावली जीभ वजिरानें उतरे तो हौद्यांतून
टिपरघाई तरवारीची
केली क्षणभर निकराची
दिसतां स्वारी शाहाची
कळवी निश्चय भाऊंचा 'खाशनिशिं मारिन गिलेचा' ७

---

१ इब्राहिमखान गारदी.

भीमानें शक्ती अपुली भाऊला दिधली होती!
विजयानें[1] आनंदानें चपलता दिलेली होती!
जो धर्म युधिष्ठिर त्यानें धीरता अर्पिली होती!
पांच नद्या वाहति जेथ
अगणित हा वाहवि तेथ
भिन्नता मात्र वर्णांत
भटमंत्र समरतीर्थाचा 'खाशानिशिं मारिन गिलचा' ८

नजिबखान अहमदशाहा अगणित सेनेनिशिं आले
'दीन दीन' वदुनी त्वेषें एका भाऊवर पडले
त्यानेंही टाकुन खड्ग पट्टे हातीं चढविले
एकवटुन शक्ती सारी
रोख धरून तो बलहारी
शाहावर चढवी स्वारी
समय सत्यसंकल्पाचा 'खाशानिशिं मारिन गिलचा' ९

पुण्यश्री श्रीवर्धनची राज्यश्री शिवनेरीची
विभवश्री पुण्यपुरीची धर्मश्री सज्जनगडची
अभिवांछा प्रत्येकीला भाऊच्या मांगल्याची
शोणभद्र नद तो तिकडे
शोणितनद वाहे इकडे
मांसखंड जिकडे तिकडे
शाहास धाक भाऊचा 'खाशानिशिं मारिन गिलचा' १०

१ अर्जुनानें

भेसूर कृष्ण मेघांत चमकोनि लपला तारा
नाहींच पुन्हां तो दिसला निखळला कुठें कीं गेला
परि 'भाऊ! भाऊ!' म्हणुनी हळहळला भारत सारा
सत्प्रतिज्ञ असती त्यांच्या
जरि सिद्ध न झाल्या वाचा
आहुती देति प्राणांच्या
अर्थ हाच या वाक्याचा 'खाशानिशीं मारिन गिलचा' १.९

---

# भाऊवर गर्दी झाली!

सदाशिवराव भाऊंनी पानिपतच्या समरांगणांत शेवटची उडी घेतल्या-वर जेव्हां त्यांच्यावर चहूंकडून गिलच्यांची गर्दी झाली तेव्हां तुकोजीराव शिंदे व सोनजी भापकर यांनीं त्यांस परत फिरण्याविषयीं पुष्कळ सांगून पाहिलें पण भाऊंनीं निदानीचे जाबसाल केलें.[1] तेव्हां भाऊंकरितां जनकोजी शिंदे व तुकोजी शिंदे यांनींही घोड्याखालीं उड्या घातल्या आणि मातब्बर मर्दुमकीनें झुंजून आपल्या कुळाला धन्य केलें. शेवटीं या गर्दीत भाऊही गारद झाले.[2]

शौर्यांत जणों अभिमन्यु ‘ विश्वास सोडुनी गेला ! ’
संगरीं घटोत्कच ऐसा ‘ गारदी कटोनी मेला ! ’
‘ समशेर बहाद्दर ’ प्यारा सन्निध तो लढतां पडला !
दुर्दैव हांसलें विकट
विसकटला सेना-शकट
राहिला न कोणी निकट
असहाय अशा त्या कालीं भाऊवर गर्दी झाली १

---

१ ‘ तुकोजी बावा ! आतां कोणीकडे जावे ? नानासाहेब यास काय तोंड दाखवावें ? रावसाहेबांची ( विश्वासरावांची ) गत काय झाली ती पहावी-- ’ वगैरे बखरींतील भाऊसाहेबांचे उद्‍गार वाचवत नाहींत. ते डोळ्याला पाणी आणतात.

२ भाऊवरील गर्दीला दीडशें वर्षांहून अधिक काळ लोटला आहे तथापि अजून उत्तर हिंदुस्थानांतील लोक ‘ भाऊ गर्दी ’ हा शब्द विसरले नाहीत ? यावरून या महानप्रसंगाची व त्यांतील भाऊंच्या शौर्य– धैर्याची कल्पना होते.

मद–मत्त कुंजरीं व्याघ्र  घन–समूह भानूवरतीं
कीं तुहिनकणांची वृष्टी  तेजस्वी कमळावरतीं
अफगाणी फौजा वळल्या  त्वेषानें भाऊभंवतीं
जनकोजी आणि तुकोजी
शिंदे–कुलभूषण गाझी
उडवीत पातले वाजी
त्यांच्याही कानीं आली  'भाऊवर गर्दी झाली !' २

बोलले तुकोजी शिंदे  'जाहली शर्थ शौर्याची
फिरवावी भाऊ ! ढाल  दख्खनच्या ही छायेची
फाळि फोडूं पुढच्या वर्षीं  काबुलच्या दरवाजाची'
गर्जला पुण्याचा वाघ
'छे ! पराजयाचा डाग–
लावितो तनुला आग !'
मति हटातटाला भिडली  भाऊवर गर्दी झाली ! ३

टाकिल्या उड्या दोघांनीं  निर्धार धन्याचा बघुनी
गोटांत घातला गिल्चा  हिरहिरीसवें दडपोनी
शिंद्यांची नौबत गर्जे  'धन्य धन्य' या शब्दांनीं
गाजली अहा ! तलवार
तों होय आकस्मिक वार
जाहले तुकोजी ठार
अंगावर बाजू आली  भाऊवर गर्दी झाली ! ४

९८३८ ७८८२ २११२५

'हत्तीला बसवा खालीं जरिपटका आणा इकडे
राष्ट्राचें भूषण माझ्या होवो न तयाचे तुकडे'
त्यावर तर दाटी झाली भिडले जनकोजी निवडे
' आतां तरि भाऊ ! परता—'
सोनजी भापकर वदतां-
' होणारें होईल आतां !'
शूराची वाणी वदली भाऊवर गर्दी झाली ! ५

नजीबखां दुराणी दोघे दशसहस्र सेनेसाहित—
वेगानें ऐशा आले कीं दिसले भिडले निकट !
इकडे तर उरले होते सेनानी मात्र सहस्र !
जनकोजी संगर-धीर
पांचशे घेउनी स्वार
उसळला मराठा वीर
इकडे जरिपटक्याखालीं भाऊवर गर्दी झाली ! ६

कंदाहर—गिझनीवाले काबुली शिपाई बाके
मुलतानी खोरासानी यत्चित्त न मरणा धाके
शस्त्रासह ज्यांच्या वदनीं विजयाचें तेज लकाकें
एकदांच वेष्टुन भंवतीं
घावांची घाई करिती
वर्णावी कैशी विगती
लेखणी लववि शिर खालीं भाऊवर गर्दी झाली ! ७

'दीन ! दीन !' लाटेवरती     आदळली 'हर ! हर !' लाट
समशेरी भाले पट्टे     यांचाच उडाला थाट !
भाऊनें विरथपणींही     बहु केली काटाकाट !
मातब्बर झाली झुंज
एकावर सगळी झुंड
पाडिले अमित नर-रुंड
शेवटची घटिका आली     भाऊवर गर्दी झाली !     ८

क्षणिं दिसे, दिसेना फिरुनी     मच्छावतार भाऊचा !
बुडुनीया उदया येई     कच्छावतार भाऊचा !
'हाणा ! हाणा !' हा शद्ब     राहिला मुखीं वीराचा !
गर्दनतोडीचे डाव
खेळून घातले घाव
गाजलें भटाचें नांव
कळसास शूरता गेली     भाऊवर गर्दी झाली !     ९

हें महाराष्ट्र शौर्याचें     कुरुभूमीवरचें तेज
दिसणार पुन्हां जें नाहीं     पाहोनी घ्या तें आज
लष्करी तनूवर चढला     रक्ताचा ताजा साज
बगलफेक छातीचीर
चालले सफाई वार
भूमीस शवांचा भार
रणदेवी तरिहि न धाली     भाऊवर गर्दी झाली !     १०

मातब्बर मर्दुमकीनें जनकोजी झुंजत होते
वीर-प्रसवेचें दुग्ध बाहूंत उफाळत होतें
लपक चपक खांडाखांडी वर्णाया शब्द न पुरते
हातघाई अंतीं झाली
बसले हो ! घाव जिव्हाळीं
रणसिंह पहुडला खालीं
राहिला एक बलशाली भाऊवर गर्दी झाली ! ११

" तो कुठें सुजाउद्दवला ? विश्वासघातकी दावा"
" अब्दल्ली खासा कोठें ? त्याला तरी दावा दावा"
भाऊचे अंतिम बोल आले न पुन्हां ऐकाया !
दक्षिणी मोहरा मर्द
गर्दींतच झाला गर्द
अफगाण जात बेदर्द
हें वाक्य मनाला जाळी ' भाऊवर गर्दी झाली !' १२

* * *

कुरुभूमीवरच्या वीरा ! तुज नमन असो हें माझें
जाहला पराजय जरिही तव शौर्य- दुदुंभी गाजे
गायिलीं जरी तव गीतें होइना तृप्त मन माझें
कुरुभूमीचें मैदान
एकटा लढशि बेभान
हें चित्र जाइना पुढून
कविता ही मम गाईधरली ' भाऊवर गर्दी झाली !'

............

मातब्बर मर्दुमकीनें जनकोजी झुंजत होते
वीर-प्रसवेचें दुग्ध बाहूंत उफाळत होतें
लपक चपक खांडाखांडी वर्णाया शब्द न पुरते
हातघाई अंतीं झाली
बसले हो ! घाव जिव्हाळीं
रणसिंह पहुडला खालीं
राहिला एक बलशाली भाऊवर गर्दी झाली ! ११

" तो कुठें सुजाउद्दवला ? विश्वासघातकी दावा"
" अबदल्ली खासा कोठें ? त्याला तरी दावा दावा"
भाऊचे अंतिम बोल आले न पुन्हां ऐकाया !
दक्षिणी मोहरा मर्द
गर्दीतच झाला गर्द
अफगाण जात बेदर्द
हें वाक्य मनाला जाळी ' भाऊवर गर्दी झाली !' १२

* * *

कुरुभूमीवरच्या वीरा ! तुज नमन असो हें माझें
जाहला पराजय जरिही तव शौर्य-दुदुंभी गाजे
गायिलीं जरी तव गीतें होइना तृप्त मन माझें
कुरुभूमीचें मैदान
एकटा लढशि बेभान
हें चित्र जाइना पुढून
कविता ही मम गार्हैधरली ' भाऊवर गर्दी झाली !'

............

# धन्य जननि जनकोजीची

कुरुक्षेत्रावर भाऊसाहेबांवरोबर निधड्या छातीनें पराक्रमाची शर्थ करून शेवटपर्यंत लढणारा मराठ्यांपैकीं वीर जनकोजी शिंदे होय. "हाणा! हाणा!" म्हणतांना भाऊंच्या तोंडाला खरस आली; गळा कोरडा पडला! तेव्हां ते हातानें व मानेनें "हाणा ! मारा !" खुणवूं लागले ! त्यावेळीं या बालवीरास इतका त्वेष चढला कीं, दुराणीचा तोफखाना 'धूं धूं' करीत असतां तो दुंदेखान, नजीबखान या रोहिल्यांवर आणि अहमदखान पठाणावर एकटाच अभिमन्यूसारखा तुटून पडला ! त्यानें धमधम्यापर्यंत घोडदळ नेऊन तोफांच्या कानांत खिळे ठोकले व वरचेवर पडणारे अरबांचे व दुराणीचे वेढे फोडून पुन्हां भाऊसाहेबांजवळ जरिपटका आणून भिडविला! तेव्हां दोघांवरही दुराणी व नजीबखान हे १०–१२ हजार फौजेनिशी कोसळले!! तेथें देखील जनकोजीनें 'न भूतो न भविष्यति' असा पराक्रम गाजविला. अनेक घावांनीं घायाळ झालेला हा वीर रवंदळीरवंदळी करीत मूर्छित झाला. रोहिल्यांनी त्याला तशा स्थितींत उचलून नेला–पुढें या संग्रामसिंहाचा मृत्यु अत्यंत हृदयद्रावकरीतीनें झाला. रोहिल्यांनीं आपसांतील कलहानें त्याचे तुकडे तुकडे केले व ते जमिनींत पुरून टाकिले!!

आभाळ कोसळुनि पडलें ज्या दिवशीं भाऊवरतीं
"हाणा ! हाणा!" म्हणतांना कंठाच्या नाड्या फुगती
तोंडाला कोरड पडुनी शब्द ना उमटती पुढती
हातानें खुणवी मारा !
मानेनें खुणवी मारा !
शिंद्यांना भरला वारा !
सारिली भित फौजेची धन्य जननि जनकोजीची! १

बंदुका कडाविनि यांच्या    फैरीवर फैरी झडती
जेजाला तोफा यांची    सरबत्ती होतच होती
मारुनी मुसंडी त्यांत    मोर्चावर केली गर्दी
पाणी ओतुन तोफांत
ठोकिले खिळे कानांतं[1]
ठाके रणमैदानांत
द्यावया धडक जोराची    धन्य जननि जनकोजीची ! २

चरणारे भीमथडीचे    ते तुरग पंचकल्याणी
कांहीं प्यालेले होते    त्या मुळामुठांचें पाणी
इकडे तर भव्य रिसाला    काबुल खोकंद दुराणी
ते पठाण खैबरघाटी
करिती बहु आटाआटी
दावुनि चपळाई मोठी
भिजवी टोकें भाल्यांचीं    धन्य जननि जनकोजीची ! ३

वीरांच्या पायाखालीं    घोड्यांच्या टापाखालीं
धरणीगत घायाळांची    उठली भेदक किंकाळी
त्या निर्वाणीच्या कालीं    कोणी न कुणाचा वाली
दिसतील तयां कापावें
येतील तयां झोडावें

१ तोफांना बत्ती देण्याचीं जीं छिद्रें त्यांत.

यावीण दुजें ना ठावें
तृप्ति करी चामुंडेची धन्य जननि जनकोजीची! ४

वय पुसाल कितिसें होतें? विश्वास तरी तो मोठा!
जयवंत 'जयाप्पा' त्याचा बापसे सवाई बेटा!
पेटोनी क्रोधाग्नीनें वैऱ्यांचा शिजवी घाटा!
कुमक ना कुणाची पाही
येईल कुणी कीं नाहीं
हिमतीनें चालुन जाई
गाळण उडवी गिलच्यांची धन्य जननि जनकोजीची! ५

अश्वत्थामा द्रोणाचा कीं अभिमन्यू पार्थाचा
कर्ण वीर सूर्याचा वा कार्तिकेय रुद्रेशाचा
मारुती मारुताचा कीं इंद्रजीत लंकेशाचा
तैसा शूराचा शूर
वैऱ्यांचें दडपित ऊर
हांकून लावि तो दूर
सेवा करि निज-राष्ट्राची धन्य जननि जनकोजीची! ६

अरबांना चढुनि जोर गेले खवळोनि पठाण
कितिकांना धारेखालीं कंठाच घडलें स्नान
कापितात कणसें तैशी कापिलीं शिरें बेमान
देहाच्या लाह्या फुटल्या
पगडीच्या कंगण्या सुटल्या

घोड्यांच्या दुमच्या तुटल्या
हिंमत चढली फौजेची    धन्य जननि जनकोजीची ! ७

" माझ्या अन्नाचे जे जे    असतील जिवाचे प्यारे
या माझ्या जखमा बघुनी    ज्यांना येतील शहारे
असतिल जरि सेवायाचीं    स्वर्गाचीं उघडीं द्वारें
ते लढोत मजसह धन्य
जावोत पळोनी अन्य "
वच वदुनि असें सन्मान्य
गर्जना करी हल्याची !    धन्य जननि जनकोजीची ! ८

नेकजात कडवे वीर    भरधाव चालुनी गेले
चहुंकडून दाटी झाली    खाशाला खासे भिडले
भगव्या झेंड्याच्या खालीं    योद्धे ढालाइत पडले
बेसुमार कत्तल झाली
रुधिरानें भूमी न्हाली
शिंद्यांची मूर्ति निघाली
काठी घेऊन झेंड्याची    धन्य जननि जनकोजीची ! ९

दाढीके रखनेवाले    काबूल कंदाहरवाले
खांडेसे लढनेवाले    जंगसे न हटनेवाले
सूं सूं सणसण् बाणोंकी    बरसात बरसनेवाले
ऐशांचा पडला वेढा

झुंजार वीर तो गाढा
संतोषवि अमित गिधाडां
भागवी तृषा कालीची          धन्य जननि जनकोजीची ! १०

किल्ल्याच्या दरवाजाला          मारावी धडक गजानें
पारधी चिरुन टाकावे          जो मत्त वराह तयानें
वृक्षांच्या संमर्दांना          टक्कर द्यावी गेंड्यानें
सरकुनी जरासा मागें
तोंडानें बोलुनि 'घे ! घे'
उधळोनीं जाई वेगें
कोंडी फोडी वेढ्याची          धन्य जननि जनकोजीची ! ११

बंधारा दगड विटांचा          फोडावा जल-ओघानें
विदळावा तट दुर्भेद्य          तोफेच्या कीं गोळ्यानें
भेदावी शैलश्रेणी          देवेंद्र-तीक्ष्ण वज्रानें
तैसा आवेशें भरुनी
सेनेचे तट पाडोनी
चापल्यें नेला निघुनी
मति गुंग होय शत्रूची          धन्य जननि जनकोजीची ! १२

दोन्हीही हातीं पट्टे          चढवोनीं 'भाऊ' घुसला
आदित्य प्रळयाचा हो !          दैदीप्यमान तो गमला
कापित उडवित खांडोळी          गेला तो पुरता गेला

दरकेना छाती ज्याची
फिरवी न दिशा पायांची
चमके ठिणगी तेजाची
ऐशा त्या नररत्नाची धन्य जननि जनकोजीची ! १३

धूळीचे लोट उठोनी दिवसाची रजनी झाली
घनघोर गर्जना चाले तोफांची चमके बिजली
रुधिराच्या सर सर धारा वर्षोनी भूमी भिजली
मुंग्यांचें वारुळ फुटलें
तें थांबायाचें कुठलें
उठले ते धावत सुटले
तनु निश्चल धैर्यगिरीची धन्य जननी जनकोजीची ! १४

पाठीवर अरब पठाण पेंढारी पुढतीं पळती
दाढी शेंडीची गांठ तोडुन तुटणारी नव्हती
पुण्याइच ज्या साध्वींची तत्पति कहरांतुन सुटती
'पाणी ! पाणी !' मागून
कंठाला कोरड पडून
कितीकांचे सुटले प्राण
सोडी न बाजु शर्तीची धन्य जननि जनकोजीची ! १५

राष्ट्राचा शामीयाना चौफेर तणावे तुटले
धीराचा एकच खांब वायूसह झगडुन डोले
हाँ पडेल किंवा पडला मोठाले बसती झोले

एका खड्गाग्रावरतीं
दख्खनची अब्रू होती
तें खड्ग जयाच्या हातीं
त्या शिंदे-कुलदीपाची धन्य जननि जनकोजीची ! १६

बद्रिनाथ नारायण जो लाविले तयानें डोळे
काशी विश्वेश्वर शंभू तोही न जागचा हाले
वनदेवि अष्ट दिक्पाल कोणीही नाहीं द्रवले
सांगा नशिबाला काय
करितां येईल उपाय ?
वदतां न मुखानें हाय !
पूर्ति करी कर्तव्याची धन्य जननि जनकोजीची ! १७

वीत वीत जागेवरती जखमा झाल्या देहाला
जीवाचा होता कोण तैं पट्टया बांधायाला
होवोनी शक्तीपात झांपड पडली डोळ्यांला
खानानें धरितां हात
मारी झटका जोरांत
नरडीला देउन हात
शय्या केली धरणीची धन्य जननि जनकोजीची ! १८

मृत्यूच्या दरबाराचा शेवटचा साक्षीदार
मातृभूमिसाठीं सोडी नैराश्याचा हुंकार
डोळ्यांतुनि खळ खळ वाहे ती उष्णाश्रूंची धार

पाठीला दिनमणि झुकला
परक्यांना संमुख झाला
शेवटचा धीरा पडला
सोडी न मूठ खड्गाची धन्य जननि जनकोजीची ! १९

तो ग्वालेरीचा वाघ ग्लानीनें मूर्च्छित झाला
रोहिले शिकारी आले गोटांत उचलुनी नेला
नीचांनीं गृहकलहानें तो पंचीप्यारा चिरिला
हर ! हर ! केले हो तुकडे !
हृदयाचे होती तुकडे
पण वदते ऐका तिकडे
रणदेवी पानपताची 'धन्य जननि जनकोजीची !' २०

फत्तर हिमशैलेंद्राचे कारुण्यानें पाझरले
दुःखानें धवलगिरीचें मुख धूसर होउन गेलें
गौरीशंकर-नयनाचे हिमबाष्पराशि विरघळले
पावन पुरुषांची आई
जान्हवी प्रपातें गाई
जीं स्मृतिचित्रें उत्साही
त्यांतुनी नाद ये हाची 'धन्य जननि जनकोजीची !' २१

# भाऊ! भाऊ!

"नानासाहेब! आम्हांसारखे तुम्हांस पुत्र आहेत व आणखीही होतील परंतु भाऊसारखा बंधु मिळणार नाहीं." असें विश्वासरावांनीं पानिपताहून—भाऊसाहेबांस कळूं न देतां—पुण्यास पत्र लिहिलें होतें. त्याप्रमाणें नानासाहेब स्वतः ५० हजार फौज घेऊन त्यांच्या मदतीस निघाले. पण अर्ध्या वाटेंतच त्यांस भाऊसाहेब व विश्वासराव पडून मराठ्यांचा विध्वंस झाल्याचें वर्तमान कळलें. त्यावेळीं भाऊंच्या दुःखाचा त्यांस एवढा धक्का बसला कीं शेवटीं त्यांनी पर्वतीवर "भाऊ! भाऊ!" म्हणून प्राण सोडिला!!

\+ \+ \+

बोलता काय हे शद्ब ‘ भाऊ मज सोडुनि गेला ! ’
ही वार्ता कसली—कर्णीं ओतिलें तप्त तैलाला !
तळमळती पंचप्राण देहाचा भडका झाला !
शत्रूला न साहे मारा
ज्यापुढें न धरवे थारा
पळती ते सैरावैरा
ऐसा मम तुटला बाहू भाऊ तुज कोठें पाहूं ? १

करवीरीं रुसुनी जातां धावलों तुझ्यामागून
प्रेमाची घालुनि आण आणिलें तुला परतून
पुरवाया इच्छा सजलों हें राज्यपदहि सोडून
अत्यंत दिव्य ती प्रीती
तुजवर तीं माझी होती

रुसलास पुन्हां मजवरतीं
आतां पण कोठें जाऊ भाऊ तुज कोठें पाहूं ? २

गेला होता विश्वास यतासी तं परतून
तें विष मी गिळलें असतें माधवाकडे पाहून
ती जखम पुत्रदुःखाची भरली असती मागून
घावावरी बसला घाव
हृदयाचा घेई ठाव
आतां न सुखाचें नांव
'भाऊ' कोणाला बाहू भाऊ तुज कोठें पाहूं ! ३

अवतार परशुरामाचा तेजस्वी ब्राम्हणवीर
कर्णासम संकटकाळीं जो स्वावलंबनी धीर
जो युधिष्ठिरचि भासावा घनघोर संगरी स्थीर
ऐसा तूं भाऊराया !
दैवाचि वळतां छाया
त्वत्सद्गुण गेले वाया
विरहातें कैसा साहूं भाऊ तुज कोठें पाहूं ! ४

कां इतुका देहावरतीं तूं उदार झाला होता !
कां पुण्यपुरीला तूंतें मायेचा कोणी नव्हता ?
प्रीतिचा उन्हाळा राया ! तुजला कां झाला होता ?

मम छत्र तुझ्यावरि होतें
तुज कमी काय जागीं होतें
मज कळवायाचें होतें
नसताच दिला मी जाऊं भाऊ तुज कोठें पाहूं ? ५

जरिपटकेवाले योद्धे अटकला जाउन भिडले
शत्रूचे बसतां फटके पटकेहि गमाउन आले
फुटकें हें दैवचि माझें चटके हृदयाला बसले
उघडिला सिंह कोल्हयांनीं
काढिला पाय व्याघ्रांनीं
घेतला धाक शेळ्यांनीं
शोकाला कुठवर गाऊं ? भाऊ तुज कोठें पाहूं ? ६

उचलुनी तळीं शत्रुची 'एळकोट' करुनी घावा
लढवय्या ऐसा जबरा कां हात हालवित यावा ?
मग बरा म्हणावा 'खान' प्राणानें केली सेवा
पाहिजे तिथें जातीचें
ना काम मेंढपाळाचें
खाउनी अन्न देशाचें
आले हे नांव—गमाऊ भाऊ तुज कोठें पाहूं ? ७

घोरांत शत्रु पाडावा ते स्वतांच घोरत पडले !
मारावा मर्मी डंख ते डंखी होऊन आले !
चारावी धूळ रिपूला ते धुळींत लोळत पडले !

मुकुटांतिल हिरा गळाला
कंठातिल मणि हारवला
त्याला मी शोधायाला
आतां कोठें तरि जाऊं ? भाऊ तुज कोठें पाहूं ? ८

जातीचे पुरुष असोनी बायका होऊनी आले !
ज्या खऱ्या बायका त्यांच्या अब्रुवर पडले घाले !
आईबापाविण मुलगे कित्येक पोरके झाले !
आप्तांच्या भेटी कुठल्या
प्रीतीच्या माळा तुटल्या
दोन लाख विधवा रडल्या
कां प्राशोनी विष घेऊं ! भाऊ तुज कोठें पाहूं ? ९

आगींत उडी घेतांना त्या तुमुल युद्धसमयातें
पळपुटें अशांच्या हातें त्वां निरोप दिधला मातें
'स्वर्गांत पोंचलों आम्ही पावावें ना दुःखातें !'
मी वडील असतां मातें
सोडोनी जगतीं येथें
तुज उचितचि जाणें नव्हतें
कां स्वर्गी उडुनी येऊं भाऊ तुज कोठें पाहूं ? १०

अप्पांच्या जवळीं बंधो ! स्वर्गी गेला असशील
बाजीही विश्वासाला घेउन बसले असतील
तुज पाहतांच दोघांनीं मज दोष दिले असतील

संसार न झाला ज्याचा
बळि दिला अशा भावाचा
उरला न वंश काकांचा
हें शल्य कसें तरि साहूं भाऊ तुज कोठें पाहूं ? ११

दरबारीं तूं दिसशील म्हणुनी मी तेथें जातां–
दरबार ढाळितो अश्रू मी "भाऊ ! भाऊ" वदतां
परतुनी शयनगेहांत डोकावूनि तुजला बघतां
स्वकरीं ठेऊन कपोला
अश्रूंच्या वाही माला
त्या तुझ्या धर्मपत्नीला
कोणत्या वचें समजावूं भाऊ तुज कोठें पाहूं ? १२

जे सुभेदार सरदार विसरले तुला साचार
अंगचोर विधिच्या नांवें फोडिती खडे ते फार
घिसरावें मीही तुजला सांगतात गोष्टी चार
जे मोठे मोठे राव
दावितात अपुला भाव
त्यांनींच बुडविलें नांव
हे सारे भोजनभाऊ भाऊ तुज कोठें पाहूं ? १३

हृदयाचे दुःखद पीळ उकलून कुणा दावावे ?
जें कसेंसेंच मज होतें तें कसें मुखीं बोलावें ?
बंधुप्रीतीचें वेड वेड्यांना कसलें ठावें !

सौमित्रासाठीं हाय!
श्रीराम रडे असहाय
माकडांस त्याचें काय
बोलून कशाला दावूं? भाऊ तुज कोठें पाहूं? १४

तव वसतिक्रीडास्थानें दुःखातें करिती जागें
हा वाडा शनिवाराचा खायास धावतो मागें
ही धुरा राज्यशकटाची ओढाया मन ना लागे
एकान्तस्थल पाहून
पर्वतीवरी येऊन
बसलों तर विरह–क्षीण
जाईना क्लेशद आयु भाऊ तुज कोठें पाहूं? १५

उपवासी भाऊ गेला गिळवे न अन्न हें उचला
तो निजला भूमीवरती भूमीवर मजही घाला
तो गेला वाऱ्यावरती वाऱ्यावर मजही घाला
तेजाचा उघडा लाल
घेवोनी गेला काळ
मज हवी कशाला शाल!
काळाचा पडला बाहू भाऊ तुज कोठें पाहूं? १६

कां बसला शयनाभंवतीं घालोनी खालीं माना?
आणिले कशाला वैद्य जाऊन भाउला आणा?
आला कां माझा 'भाऊ' अंधारी आली नयना!

एकवेळ भाऊ बोल !
बोल हा चालला खोल !
करुं नको मदाशा फोल
ये आलिंगन वा ! देऊं भाऊ तुज कोठें पाहूं ? १७

' भाऊ भाऊ !' वदतांना देहांतुनि गेला श्वास
जीवास लागला ध्यास पण पुरली नाहीं आस
दुःखावर बसला डाग हळहळला सारा देश
इतिहास महाराष्ट्राचा
उज्ज्वल बंधुप्रीतीचा
अजुनीहि पर्वतींवरचा
वाहे या शद्बें वायू 'भाऊ तुज कोठें पाहूं ?' १८

---

## ( तोफ )

( चाल:-चंद्रकांत राजाची कन्या )

हिंदविजयलक्ष्मीची भगिनी तोफ महांकाळी!
त्वांच चढविली राज्यलक्ष्मिच्या सौभाग्यीं लाली
तुझ्या जिवावर विंध्याद्रींच्या फोडुनि कोटाला
तीक्ष्ण मराठी भाला नाचत गेला दिल्लीला
भीमथडीचा टाप उसळली तुझ्या दमावरती
हालविली सल्तनत उधळिली तख्तावर माती
जरिपटक्याचें पुच्छ उभारूनि सह्याद्री--कुहरीं
कारित गर्जना केली कितिदां शर्थ महा-समरीं
रिपुसेनेचे प्रचंड जलधर गर्जत असतांना -
लाल लाल रक्ताचा पाऊस वर्षत असतांना--
--तुझी गर्जना, तुझी धडाडी, तुझीच मर्दुमकी
पडती बाजू सांवरण्याला सहाय्य झाले कीं
पंचरसाच्या सप्तरसाच्या तोफांचा ताफा
ठिकऱ्या केल्या नभीं उडविल्या रिपु टाकी धापा
धैर्य गळालें, धैर्यासह कर-कृपाणही गळले
गोळे सुटले तोंच त्यांसवे प्राणहि ते सुटले
निनादिनी तव निनाद जों नच ऐकाया आले

नवजय निश्चय नवोत्साह तों पर—हृदयीं भरले
हां हां म्हणतां धूर पसरिला नभास तूं भरिलें
दिनमणिच्या साम्राज्यांतूनी तारे नाचविले
सूर्यज्योति चंद्रज्योती यांची बरसात
न पाहिलेली दाखविली तूं तुर्की समरांत
गोळ्यांचा सोपान रचियला भूस्वर्गामाजीं
रणतीर्थी जे पावन झाले ते चढले गाझी
बार ठासला, गोळा चढला, ठिणगी जों शिवली
मृत्युलोकची तोंच मंडळी स्वर्गावर चढली
होळकरांची उजवी बाजू डावीला शिंदा
तुझ्या दमावर भिडवित गेले खांद्याला खांदा
निधडे निधडे निदानसमयीं निकराला आले
धडड्ड्—धडड्ड् तुझ्या निनादें धडाडिनें लढले
अष्टदिशांच्या पडद्यामागें दडलेले वैरी
त्यांवरही अनिरुद्ध झाडिल्या फैरीवर फैरी
रक्तपिपासा मुंडावलिची इच्छा जी त्याली
त्या कालीची एकाकालीं तृप्ति तुवां केली
भैरव भूत प्रेतानंदी वेतालादिक जे
समूह त्यांचा त्वत्कंठाच्या नादें धाउन ये
शिर गेलें शिरिं हिमालयाच्या कर सिंधूतीरीं
धड न राहिलें धड जयसंगरिं जीव सुरद्वारीं
स्वराज्य आणि स्वतंत्रतेची त्रिभुवन—मातोश्री

# महांकाळी

## ( तोफ )

( चालः—चंद्रकांत राजाची कन्या )

हिंदविजयलक्ष्मीची भगिनी तोफ महांकाळी!
त्वांच चढविली राज्यलक्ष्मिच्या सौभाग्यीं लाली
तुझ्या जिवावर विंध्याद्रींच्या फोडुनि कोटाला
तीक्ष्ण मराठी भाला नाचत गेला दिल्लीला
भीमथडीचा टाप उसळली तुझ्या दमावरती
हालविली सल्तनत उधळिली तख्तावर माती
जरिपटक्याचें पुच्छ उभारूनि सह्याद्री--कुहरीं
करित गर्जना केली कितिदां शर्थ महा-समरीं
रिपुसेनेचे प्रचंड जलधर गर्जत असतांना -
लाल लाल रक्ताचा पाऊस वर्षत असतांना--
——तुझी गर्जना, तुझी धडाडी, तुझीच मर्दुमकी
पडती बाजू सांवरण्याला सहाय्य झाले कीं
पंचरसाच्या सप्तरसाच्या तोफांचा ताफा
ठिकऱ्या केल्या नभीं उडविल्या रिपु टाकी धापा
धैर्य गळालें, धैर्यासह कर-कृपाणही गळले
गोळे सुटले तोंच त्यांसवे प्राणहि ते सुटले
निनादिनी तव निनाद जों नच ऐकाया आले

नवजय निश्चय नवोत्साह तों पर–हृदयीं भरले
हां हां म्हणतां धूर पसरिला नभास तूं भरिलें
दिनमणिच्या साम्राज्यांतूनी तारे नाचविले
सूर्यज्योति चंद्रज्योती यांची बरसात
न पाहिलेली दाखविली तूं तुर्की समरांत
गोळ्यांचा सोपान रचियला भूस्वर्गामाजीं
रणतीर्थी जे पावन झाले ते चढले गाझी
बार ठासला, गोळा चढला, ठिणगी जों शिवली
मृत्युलोकची तोंच मंडळी स्वर्गावर चढली
होळकरांची उजवी बाजू डावीला शिंदा
तुझ्या दमावर भिडवित गेले खांद्याला खांदा
निधडे निधडे निदानसमयीं निकराला आले
धडड्ड्–धडड्ड् तुझ्या निनादें धडाडिनें लढले
अष्टदिशांच्या पडद्यामागें दडलेले वैरी
त्यांवरही अनिरुद्ध झाडिल्या फैरीवर फैरी
रक्तपिपासा मुंडावळिची इच्छा जी त्याली
त्या कालीची एकाकाली तृप्ति तुवां केली
भैरव भूत प्रेतानंदी वेतालादिक जे
समूह त्यांचा त्वत्कंठाच्या नादें धाउन ये
शिर गेलें शिरिं हिमालयाच्या कर सिंधूतीरीं
धड न राहिलें धड जयसंगरिं जीव सुरद्वारीं
स्वराज्य आणि स्वतंत्रतेची त्रिभुवन–मातोश्री

त्वद्भक्तीनें भोगुन गेले स्वतंत्रराज्य–श्री
भिवरावाचा प्रणाम तूतें फडक्यांचें नमन
सलाम इब्राहिमखानाचा तुजही ते मान्य

*　　　*　　　*

कुठें विजयिनी विजन-काननीं वससी एकांतीं
कुरुभूमीच्या बहुश्रमाची कीं ही विश्रांती ?
सर्वसाक्षि होतीस भयंकर नाशाच्या कालीं
सांग ऐकुं दे कसा उमटला दैवलेख भाळीं ?
काबुलच्या खड्गावर झाली अखेरची फेंक
तो दख्खनच्या शौर्यश्रीचा अखेरचा झोंक
श्रीवर्धनच्या धैर्यमेरुचा विलास शेवटचा
तेजःपुंज कसा मणि तुटला तो पुण्यश्रीचा ?
वसईच्या निश्चयवंताचा गर्भ निश्चयाचा
बुडी मारण्यापूर्वीं वदला सांग काय वाचा ?
निजभूपाच्या निर्वाणीच्या आज्ञा पाळाया
ग्वालेरीनें केंवि मानिली तृणापरी काया ?
जरिपटक्याच्या भंवतालीचे वेढे फोडोनी
पुनःपुनां आणून दाविला भाऊला कोणीं ?
कुणीं कुणीं आईचें केलें दुग्ध तिथें सार्थ ?
कालमुखीं घातल्या सुखानें माना देशार्थ !
काडनिकडीला निर्वाणीला अंतिम-समयाला
खंडित तोडा केंवि गारदी गदून तो गेला ?

‘ अब क्या हटना ? अब है मरना ? सलाम साहेबजी ’
संगीनींच्या फेंकी खेळत निजला रणगाजी
मेलें सारें शौर्य मरूं दे, मरणाच्यापूर्वी–
कसें चमकलें, तेंच ऐकुं दे हृदयाला सुखवी
समशेरीसम नित्य कटीशीं कटि भिडउन लढला
रक्ताचा समशेरबहाद्दर कसा कुठें पडला ?
पहिल्या जोमासवेंचि गेला धुरांत तोफांच्या
अंबारींतुन “ धन्य दमाजी ! ” उठली ही वाचा
कडाडुनी रिपुसेनेवरतीं गायकवाडाचा–
शर्थ करोनी गर्द जहाला वीर विक्रमाचा

* * *

स्वातंत्र्याची चौंबाजूला एक मुखी आग
लागोन झटतील सर्वही आर्य महाभाग
त्यांतून होइल शिवसंभव जैं अवतारी भक्त
गर्जाया लावील तुला, अजि उपासना युक्त
ज्वलत्पर्वतीं आग धुमसते उठेल डोंबाळा
“ दीर्घतपाचें पुण्य उजळितें भविष्यकाळाला ”

# वडगांवावरचा वीर

## ( महादजी शिंदे )

पेशवाई मिळविण्याकरितां शेवटीं राघोबादादासारख्या भारतीय महावीरानें मुम्बईकर इंग्रजांचा आश्रय केला ! राघोबास बरोबर घेऊन 'जनरल स्टुअर्ट' व कर्नल के, हे दोन रणझुंजार आणि हिय्येबाज इंग्रज सेनापति पुण्याच्या रोखानें निघाले. दोहोंत स्टुअर्ट फाकडा हा फारच पटाईत होता· त्यानें तीनच दिवसांत खंडाळयाच्या टेकडीवर आपलें निशाण लाविलें. कर्नल के हा पनवेलीच्या मार्गानें तोफखाना घेऊन मोठाल्या मजला मारून स्टुअर्ट यास येऊन मिळाला.

पुणे दरबारास ही वेळ मोठ्या आणिबाणीची होती. इंग्रजांचा पक्ष विजयी झाल्यास पेशवाई त्यांच्या पंजांत सांपडणारी होती. अशा वेळीं पुणें दरबारचे सेनापति देखील किती दक्ष व रणोत्सुक असले पाहिजेत, हे कांहीं सांगायला नको. हरिपंत फडके, बर्वे, होळकर वगैरे नामांकित सरदारांनीं तळेगांवापासून बोरघाटापर्यंत माऱ्याच्या सर्व जागा राखून ठेवल्या होत्या· पानशांचा विजयी तोफखाना बीनीवर होता आणि सर्व सैन्याचें आधिपत्य ज्या वीरभूषणाकडे देण्यांत आलें होतें त्या महादजी शिंद्यांनीं तर प्रतिपक्षास पराजित करण्याची प्रतिज्ञाच केली होती.

युद्धास तोंड लागून पानशांच्या तोफखान्याचा वर्षाव, फडक्यांनीं इंग्रजी पलटणीस मारलेली धडकी आणि बर्व्यांच्या पराक्रमाची शर्थ यांनीं इंग्रजांची दाणादाण उडत असतां स्टुअर्ट यासही इतका रणावेश चढला कीं, त्यानें जिवाची तमा न धरितां गर्दीत घुसून बेलाशक हैदोसच केला ! त्याच्या शौर्यानें आनंदित झालेल्या मराठ्यांनीं 'फाकडा' या पदवीनें त्याचा गौरव केला ! शिंदे तर लालीलाल होऊन बेफाम लढत होते. या लढाईंत स्टूअर्ट व कर्नल के हे दोन्ही सेनापती गारद झाले. मराठ्यांच्या चतुर सेनापतीनें वळसे घालून घालून शह लावून लावून इंग्रजी फौज वडगांवावर कोंडली आणि तिला शरण यावयास भाग पाडिलें !

‘ राघोबा ’ अंतीं झाला . केवळ हो ! कलहज्वाला
मुंबईहुन घेउन त्याला स्टूअर्ट फाकडा आला
बोरघाट घालुनि मागें खंडाळ्यावर तो चढला
‘ कां आमुच्या गृहकलहांत
हा शत्रू घालतो हात ?
चावून खालचा ओठ
ये महादजी रणधीर वडगांवावरचा वीर १

‘ खंडाळ्यावर खांडोळी शत्रूची उडवायाची !
शिंद्यांच्या कुलकीर्तीची अजि नौबत झडावयाची !
विजयलक्ष्मि बाहूवरती बसवोनी आणायाची ”
घेउनी प्रतिज्ञा शिंदा
युद्धीं लढवय्या खंदा
देशाचा चाकर बंदा
उपसून निघे समशेर वडगांवावरचा वीर २

तळ दिला तळेगांवाला रोखिलें बोरघाटाला
निवडोनी एकेकाला साबितजंग सरदाराला
माऱ्याच्या जागीं ठेवी कोंडाया रिपु-सिंहाला
बीनीच्या सरदारांचा
भिमराव पानसे यांचा
ताफा चमके तोफांचा
टाकला तिथें झुंजार वडगांवावरचा वीर ३

श्रीमंत पेशवे त्यांच्या गादीच्या पुण्याईची--
बुद्धीचे सागर नाना त्यांच्या समयज्ञपणाची
जे समरधुरंधर शिंदे त्यांच्या भुजसामर्थ्याची
ती खरी परीक्षा वेळ
शूरांचा जमला मेळ
झाला एकच कल्लोळ
बिजलीची चमके कोर वडगांवावरचा वीर ४

होत्या त्या सातच तोफा चतुर मात्र गोलंदाज
एकेका गोळ्यासरसी शत्रूचा जिरवी माज
संग्रामीं जयमरणाची रिपुनेंहि लाविली पैज
घोड्याची उडवित नाल
वाढवीत पुढची चाल
कापीत शत्रुचा नाळ
चौफेर घालतो घेर वडगांवावरचा वीर ५

निर्झरवारी—धर अचल मदधारा--धर कीं दंती
शोभावा किंवा जैसा उत्फुल्ल पलाश वसंतीं
कीं पयोद वर्षाकारी जास्वंद तरूंची पंक्ती
आरक्त असा झालेला
घेऊन करीं झेंड्याला
हैदोस कराया सजला
सोडीना जय-निर्धार वडगांवावरचा वीर ६

दंगल करण्याला आला संगीन् खोउनी वैरी
आगीचा होउन मारा फैरीवर झडल्या फैरी
रक्तानें ओलीं झालीं भाल्यांचीं टोकें सारीं
हुकुमासरसी वेगानें
वडगांवाच्या रोखानें
वळवी रिपु जैं निजसैन्यें
गैबीचा देई मार वडगांवावरचा वीर ७

कितिकांचे तुटले हात कितिकांचे तुटले पाय
किति शिरें तनूविण पडलीं किति शिरोविहीनहि काय
किति याचिति जल घायाळ जेथल्या तिथें निरुपाय
शूराला लागे चुरस
तोंडाला आली खरस
उत्तेजित करि सैन्यास
घेईना परि माघार वडगांवावरचा वीर ८

जयवंत ‘जयाप्पा’ शिंदे नागोरावरचा वीर
यमुनेच्या घाटावरचा ‘दत्ताजी’ शिंदे शूर
योद्धा कुरुभूमीवरचा ‘जनकोजी’ संगरधीर
त्या दिवशीं आकाशांत
देवांच्या समुदायांत
डोलत होते मोदांत
वंशज विजयी ठरणार वडगांवावरचा वीर ९

आकाशांतोनी पडती त्यावरी सुमांच्या माला
कडनिकडीच्या समयाला चपल हस्त गुंते त्याला
जणुं देई लतिकांजवळीं तो माला ठेवायाला
अमरलोक आकाशांत
शार्दूल गुहाद्वारांत
विस्मित होते पाहात
नरसिंहाचा अवतार वडगांवावरचा वीर १०

फडक्यांनीं धडकी सरसी फोडिली फळी शत्रूची
बरव्यांनीं बरवी धरली दोन्ही बाजूंनीं कैची
पानसे सारखा वर्षे बरसात तोफखान्याची
'स्टूअर्ट' जाहला ठार
'कर्नल के' निजला वीर
सेनेचा सुटला धीर
तैं करी गर्जना थोर वडगांवावरचा वीर ११

पांढरा बावटा बोले 'थांबवा कत्तलबाजीला!'
उचलोनी टोपी हातें करि सलाम टोपीवाला!
खङ्गानें घे नमनाला ग्वालेरी पगडीवाला!!
इतिहास स्वकरीं घेतां
वडगांवाला पाहातां
हा रिपुमित्रांच्या चित्ता
देतो स्मृति वारंवार वडगांवावरचा वीर १२

---

# बेलाग बदामी कोट !

टिपूनें वचनभंग करून पेशव्यांशीं झालेला तह मोडला व इतरही अनेक दुष्ट कृत्यें केलीं. त्यांची वार्ता कळतांच पुणें दरबार खवळून गेला. परशुराम भाऊ पटवर्धन, हरिपंत तात्या फडके, शिंदे, होळकर यांच्या फौजा टिपूवर रवाना झाल्या. त्यांनीं एकदम जाऊन टिपूच्या प्रख्यात बदामी किल्ल्यास वेढा घातला. या विस्तृत किल्ल्याच्या भोंवतीं मजबूत तट बांधिलेला आहे. पटवर्धन व फडके यांनीं प्रथम तोफांचा धडाका सुरू केला. शिंदे व होळकर हेही एक दिलाची फेर झाडूं लागले. २० दिवस सारखी झटापट चालली तरी बदामीचा तट दाद देईना. शेवटीं मराठ्यांनीं तटाला शिड्या लाविल्या ! तों किल्ल्यांतून ३५००० लोकांची मांड येऊन कोसळली व तिनें पेशव्यांच्या सैन्याची राळ मांडली ! त्या अप्रतिष्टेनें भाऊ व तात्या खदिरांगासारखे लाल झाले. त्यांनीं एकच गर्जना केली. सैनिकापुढें टिपूचीं पापें वर्णिलीं आणि चोहींकडून हूल करून किल्ल्यावरच्या माऱ्यास न जुमानतां तटावर पंत–प्रतिनिधींचा विजयध्वज फडकविला !

× × ×

मैत्रीचीं निश्चित वचनें तीं भ्रष्ट टिपूनें केलीं !
गर्जना पुण्याला झाली म्हैसुरास ऐकूं गेली !
पेशवे प्रभूची भ्रुकुटी सक्रोध टिपूवर चढली

पटवर्धन फडके यांचीं
शिंद्यांचीं होळकरांचीं
कवचें चढलीं युद्धाचीं

वीढलो जाउनी नीट बेलाग बदामी कोट १

फडक्यांच्या मोर्चांतूनी जों धडड्ड् वार उडाले !
भाऊंच्या मोर्चांतूनी तों कडकड नाद जहाले !
दोघांचे गोलंदाज तट चूर्ण कराया सजले
ती अखंड वृष्टी चाले
आकाश धूम्रमय झालें
तरि अभेद्य तट ना हाले !
चावती मराठे ओठ बेलाग बदामी कोट २

उडविले सुरंग अनेक एकही बुरुज ना हाले !
जागोजागीं फुटलेले तोफांचे दिसती गोळे !
त्या अभेद्यतेनें तेथें हतबुद्ध शक्तिला केलें
माळा संतत विजयाच्या
शोभाव्या कंठीं ज्यांच्या
चिंता चित्तांत तयांच्या
शिरके न कुठेंही बोट बेलाग बदामी कोट ३

तट जैसा होता अढळ तन्निश्चय तैसा अढळ
उचलती विडे पैजेचे ते स्वराज्य-सेना प्रबळ
दृढनिश्चय साहस एकी त्रिगुणांचा झाला मेळ
निर्वाणीच्या युद्धाला
प्रत्येक मराठा सजला
रणवाद्यांचा ध्वनि झाला
वीरांचे करुन अलोट बेलाग बदामी कोट ४

रणकुंजर जे जे होते मारिल्या तयांनीं थडका !
बुरुजावरच्या तोफांनीं आगीचा केला भडका !
शूरांच्या शीर्षीं उठल्या निष्फल यत्नांच्या तिडका !
लागल्या शिड्या कोटाला
गिल्ला किल्लयांत जहाला
तट धारकऱ्यांनीं फुलला
सुचवी दारूचा लोट बेलाग बदामी कोट ५

गडकरी नेक जातीचे तरवारी परजुन आले
मृत्युच्या मुखीं युद्धाचें क्रीडांगण त्यांनीं केलें
चढणारे हिंमतबाज बावळ्यासवें धडपडले
श्रीमंत प्रतिनिधी सेना
चालली तिची जी दैना
ती नेत्रांनीं बघवेना
हृदयाचा करितो स्फोट बेलाग बदामी कोट ६

शिंद्यासम खंदे वीर फडक्यासम धडकीवाले
पटवर्धनकुलमणि 'भाऊ' युद्धाचे बीनीवाले !
रण-धुरंदराच्या नेत्रीं शौर्याचे पाणी चढले !
पापें वर्णून टिपूचीं
मोडाया खोड रिपूची
हुल्लड केली हल्लयाची
खवळला मराठी गोट बेलाग बदामी कोट ७

शिंद्यांची होळकरांची चालली तटावर फैर !
पटवर्धन फडके यांनीं चढतीचा केला जोर !
लाविलें निशाण तटाला तेव्हां झाली घेमार !
तेथें ज्यांनीं धैर्याचें
दाविलें तेज शौर्याचें
निश्चयी शूरवीरांचे
गातो अजुनीही पाठ. बेलाग बदामी कोट ८

---

# शूराच्या ऊदरीं शूर !

म्हैसूरच्या दुसऱ्या युद्धांत हरिपंत फडके व लॉर्ड कॉर्नवॉलिस यांनीं टिपूच्या राजधानीस वेढा घालून तेथें त्यास कोंडिलें. परशरामभाऊ पटवर्धन व क. लिटल हे टिपूची पिछाडी सर करीत चालले. या युद्धांत भाऊबरोबर त्यांचे पुत्र आप्पासाहेब हेही होते. चित्रदुर्ग, बेदनूर काबीज करून ते तिघेही तुंगभद्रेपार झाले. व त्यांनीं शिमोगा किल्ल्यास वेढा घातला. इतक्यांत 'सय्यद रेझा' जवळच्या दाट झाडींत टपून बसला आहे, असें कळतांच भाऊंनीं आप्पास तिकडे पाठविलें व सोबत लिटल यांस मदतीस दिलें. त्या घनकुंजांत रेझाशी लढतां लढतां आप्पासाहेब कोंडले गेले. इतक्यांत शिमोग्यावर बावटा रोवून भाऊ परत आले. ते अशा संकटांत पडलेल्या पुत्राच्या साह्यार्थ धांवतील असें सर्वांना वाटलें. परंतु भाऊंनीं सांगितलें, 'आजचें युद्ध आप्पाचे! त्याजवर सोंपविलेली कामगिरी त्यानें पार पाडलीच पाहिजे ! तो शूराच्या उदरीं उत्पन्न झाला आहे !" ' असें म्हणून ते समोरच्या टेकडीवरून पुरुषार्थ अवलोकन करूं लागले ! बाप आपली परीक्षा घेत आहे, हें पाहतांच आप्पासाहेब फारच शौर्यानें लढले. त्यांनीं रेझास मागें हटवून 'शूराच्या उदरीं शूर' हे वाक्य सार्थ केलें !

* * *

बलवान टिपू सुलतान माजला जणों सैतान
इंग्रजी मराठी वीर जमले जयमंत्र जपून
परशुराम भाऊसंगें चमकवी 'लिटल' संगीन
भाऊंचा वीर कुमार
बांधून नवी तरवार
चालला बाल सरदार
लोकोद्धाराचा पूर 'शूराच्या उदरीं शूर !' १

ते विचित्र बलधैर्याचे चित्रदुर्ग भेदून गेले
बेदनूरचे गढ कोट बदनूर तयांनीं केले
'होळिनोरच्या किल्ल्याचे' बनले मग होळिवाले
तुंगेंत धुवोनी अंग
शिमुग्यांत उडविती रंग
वृद्धास तरुण करि दंग
पसरे नव-वार्ता दूर 'शूराच्या उदरीं शूर!' २

'सय्यद रेझा' सरदार जो टिपुचा विजयाधार
त्रिकुटाची भव्य शिकार साधाया टपला फार
पारधी लपे घन विपिनीं जीवावर सिंह उदार
'हूं' म्हणतां छावा धावे
'लिटल' ही त्यासवें धावे
नव शौर्याचे देखावे
पाहून वदति रणधीर 'शूराच्या उदरीं शूर!' ३

नंग्या समशेरी संगें संगिनिची फक जहाली!
बाणांच्या वृष्टीसंगें बंदुकिची फैर उडाली!
रक्तानें लाल जहाल्या कुंजाकुंजांतिल वेली
कळकाच्या निबिडवनांत
तो पटवर्धन-कुलवंत
अडके जरी तरि यशवंत
उडवी रिपुमनिं काहूर 'शूराच्या उदरीं शूर!' ४

चुरसीची भाला–फेंक        चुरसीची संगिन–फेंक
सरसीचा दिसतां झोंक        धडसी चाले बिनधोक
पडतील घेइ न एक        लढती लढवय्ये लोक !
‘ धुतुतू ’ गर्जे रणशिंग
हुतुतूला चढला रंग
तो कुमार त्यांतच दंग
‘ लिटल ’ ही शिपाई शूर        ‘ शूराच्या उदरीं शूर ! ’        ५

झाडींत झटापट चाले        तरवार खटाखट बोले !
किति वीर पटापट मेले        किति हटातटाला भिडले !
शिमुग्यावर रोवुन झेंडा        परशुराम भाऊ आले !
सरसाउन विजयीं बाहू
धावेल जनक हा ‘ भाऊ ’
कल्पना लागल्या धावूं
तो अचल वदे गंभीर        ‘ शूराच्या उदरीं शूर ! ’        ६

‘ जर असेल शूर कुमार        दावील शौर्य शत्रूला
जो पटवर्धन वंशाचा        तो याची न साहयाला
आजचें युद्ध आप्पाचें        तो जागो कर्तव्याला ’
प्रत्यक्ष पोटचा गोळा
एकला कोंडला गेला
परि पिता न तो डळमळला
विश्वास किती हा थोर        ‘ शूराच्या उदरीं शूर ! ’        ७

पाहतो परीक्षा तात हें कळलें जैं पुत्राला
त्वेषाचा उत्साहाचा संचार अधिकची झाला
सळसळणाऱ्या रक्ताला उसळीसरसी कढ आला
शत्रूवर करुनी मात
फिरला नौबत ठोकीत
वीरांच्या विजय-सुरांत
जयवाद्यांचेही सूर ' शूरांच्या उदरीं शूर ' ८

कर्तव्यपाठ युद्धांत जनक देत होते येथें
स्वावलंबनाचे पाठ शिकविती कठिण समयातें
रणशाळेचे विद्यार्थी चढविती देश भाग्यातें
तल्लीन सद्गुणीं व्हावें
रोमांचित होउनि गावें
पूर्व स्थितिला चिंतावें
हें वाक्य स्फुरवी ऊर ' शूराच्या उदरीं शूर ! ' ९

# हें शील नव्हें मर्दाचें !

इ. स. १७७० सालीं हैदरावर माधवराव पेशव्यांची जी स्वारी झाली तींत परशुराम भाऊ पटवर्धनांनीं हैदरास अगदी जर्जर करून सोडिलें. प्रत्येक युद्धांत भाऊंच्या तरवारीला भिऊनच तह करावे आणि मोडावे असे चाललें होतें. यावेळीं पटवर्धनाचा चांगलाच सुड घ्यावा म्हणून हैदरानें १२ हृ. गारदी ४ हृ. स्वार व २५ तोफा अशा तयारीनें कडलुराहून बुद्धिविहाळांची मजल मारिली व रात्रीं अकस्मात् भाऊवर छापा घातला. हैदरानें एकदम तोफा डागल्या व बाणांची वृष्टी सुरू केली. भाऊच्या लष्करांत भयसूचक नौबत वाजूं लागली. ती ऐकतांच तो नरवीर एकदम जागा झाला व नौबतीजवळ आला. आपल्या लोकांस धीर देऊन भाऊनें तो अग्निप्रळय धैर्यानें सहन केला. नौबतीच्या आवाजाचा रोख वरूनच हैदरानें भडिमार चालविला होता. भाऊच्या मांडीखालील २ घोडे गोळे लागून मेले. स्वतः त्यासही गोळा लागून अंग भाजलें. त्याच्या बंधूस गोळा लागून ते होरपळले. शेकडों नव्हे हजारों सैनिकांचीं प्रेतें पडलीं. हत्ती, घोडे, तंबू, डेरे जळून खाक झाले. तथापि त्या धीरोदात्त पुरुषाची हिंमत हरली नाहीं व तो नौबतीजवळून बालाग्र डगमगला नाहीं. तो सकाळपर्यंत त्या तोफांच्या आणि बाणांच्या भडिमारांत सिंहनाद करीत राहिला. सकाळीं भाऊनें काळाच्या जबड्यांत उडी टाकावी तसा प्रकार केला ! हैदराच्या आघाडीवर जोराचा हल्ला चढवून तिसरे प्रहरपर्यंत पाण्याच्या घोटाऐवजीं या नरसिंहानें शत्रूच्या रक्ताचेच घोट घेतले !! शेवटी हैदरअल्ली जिवानिशीं पळून गेला !

\+ + +

जातीचा खुनशी सर्प म्हैसुरचा हैदरअल्ली
भाऊवर छापा घाली तो मध्यरात्रिच्या काळीं
प्राणदान दिधलें त्याची दुष्कृती फळाला आली

रजनी ती घोरत होती
कल्पना तियेला नव्हती
काळोख्या ऐशा रात्रीं
झोपेंत वार करण्याचें हें शील नव्हें मर्दाचें १

जागृतिचे होते मित्र लष्करी गस्तवाले ते
निजकंठीं घोषत होते अलबेलीच्या शद्बातें
घोड्यांच्या टापांचेही मधुनी ध्वनि उमटत होते
मर्दुमकी निजली होती
कल्पना तियेला नव्हती
क्रूरता करी सरबत्ती
तिमिरांत घात करण्याचें हें शील नव्हें मर्दाचें २

धडकल्या भयंकर तोफा भडकली आग गोटांत
भयसूचक नौबत वाजे लष्करच्या बाजारांत
'गनिमाचा छापा आला' धांदल ती मग सर्वत्र
पोषाख घालतो कोणी
शस्त्रास शोधितो कोणी
उठतांना पडतो कोणी
आकस्मिक नख देण्याचें हें शील नव्हें मर्दाचें ३

तंबूंतुन जेव्हां भाऊ उफळोनी बाहिर आला
मुरहंतक जो श्रीविष्णु अवतार तयाचा गमला
सेनेचा नौबतवाला नौबतीपुढें तो ठेला

सांग्रामिक वीरमण्यांचा
धैर्यध्वज धीरधरांचा
जमवि तो गोट फौजेचा
असहाय त्यांशिं लढण्याचें हें शील नव्हें मर्दाचें ४

नौबतिच्या आक्रोशाचा साधला रिपूनें नेम
नामांकित शौर्यकुलाचा एकेक जळाला कोंब
भाऊस सोडुनी मागें पाहती किती स्वधाम
दुःखाचे आंतुन गोळे
तोफांचे वरुनी गोळे
धैर्यसिंह तरिही बोलें—
"संकटीं पळून जायाचें हें शील नव्हें मर्दाचें" ५

प्रारंभीं कवि साहतसे भडिमार मुर्ख वक्तयाचा
पंचाक्षरि किंवा साहे उत्पातहि वेतालाचा
तैसा तो मारा साहे रणधीर वीरवृत्तीचा
बंधूस लागला गोळा
निजदेह भाजला गेला
शत्रूच्या निर्घृणतेला
श्वासाच्या वदला वाचे हें शील नव्हें मर्दाचें ६

गोळ्यांच्या वृष्टीसंगें बाणांची वृष्टी झाली
मर्मच्छेदी तनु पडल्या विच्छिन्न तनूंच्या खालीं

रजनी ती घोरत होती
कल्पना तियेला नव्हती
काळोख्या ऐशा रात्रीं
झोंपेंत वार करण्याचें हें शील नव्हें मर्दाचें १

जागृतिचे होते मित्र लष्करी गस्तवाले ते
निजकंठीं घोषत होते अलबेलीच्या शद्वातें
घोड्यांच्या टापांचेही मधुनी ध्वनि उमटत होते
मर्दुमकी निजली होती
कल्पना तियेला नव्हती
क्रूरता करी सरबत्ती
तिमिरांत घात करण्याचें हें शील नव्हें मर्दाचें २

धडकल्या भयंकर तोफा भडकली आग गोटांत
भयसूचक नौबत वाजे लष्करच्या बाजारांत
'गनिमाचा छापा आला' धांदल ती मग सर्वत्र
पोषाख घालतो कोणी
शस्त्रास शोधितो कोणी
उठतांना पडतो कोणी
आकस्मिक नख देण्याचें हें शील नव्हें मर्दाचें ३

तंबूंतुन जेव्हां भाऊ उफळोनी बाहिर आला
मुरहंतक जो श्रीविष्णु अवतार तयाचा गमला
सेनेचा नौबतवाला नौबतीपुढें तो ठेला

सांग्रामिक वीरमण्यांचा
धैर्यध्वज धीरधरांचा
जमवि तो गोट फौजेचा
असहाय त्यांशिं लढण्याचें हें शील नव्हें मर्दाचें ४

नौबतिच्या आक्रोशाचा साधला रिपूनें नेम
नामांकित शौर्यकुलाचा एकेक जळाला कोंब
भाऊस सोडुनी मागें पाहती किती स्वर्धाम
दुःखाचे आंतुन गोळे
तोफांचे वरुनी गोळे
धैर्यसिंह तरिही बोलें–
"संकटीं पळुन जायाचें हें शील नव्हें मर्दाचें" ५

प्रारंभीं कवि साहतसे भडिमार मुर्ख वक्तयाचा
पंचाक्षरि किंवा साहे उत्पातहि वेतालाचा
तैसा तो मारा साहे रणधीर वीरवृत्तीचा
बंधूस लागला गोळा
निजदेह भाजला गेला
शत्रूच्या निर्घृणतेला
श्वासाच्या वदला वाचे हें शील नव्हें मर्दाचें ६

गोळयांच्या वृष्टीसंगें बाणांची वृष्टी झाली
मर्मच्छेदी तनु पडल्या विच्छिन्न तनूंच्या खालीं

व्याकुलता विव्हलतेच्या कंठांत पडोनी रडली
बाहेर पेटली होळी
देहांत पेटली होळी
वदला रण - विक्रमशाली
मरणास अतां भ्यायाचें हें शील नव्हें मर्दाचे ७

भ्यालेली रजनी सरली हैदरच्या त्या पापानें
काळाच्या जबड्यामाजी टाकिली उडी भाऊनें
दैवाची चिरली मान विजयी निज खड्गाग्रानें
'घे घे' बोलोनी सरला
छबिन्यावर जाउन पडला
कापला रिसाला पहिला
निष्प्रभ रणिं परतायाचें हें शील नव्हें मर्दाचें ८

रवि चढे अंबरीं जैसा रणिं चढे वीर तो तैसा
रवि तप्त भासला जैसा हा तप्त भासला तैसा
रवि ढळला माथ्याहूनी रणिं वीर न ढळला सहसा
मृत्यूचा सोडुन कांठ
रिपुनेंच फिरविली पाठ
भाऊही वळवी गोट
विन्मुखासवें पळण्याचें हें शील नव्हें मर्दाचें ९

"येथेंच झोंपला होता घेऊन उशाला ढाल
येऊन धावला भाऊ शौर्याचे बोलत बोल"
अजुनीही जन वदताती रणवार्ता हृदय--विलोल
स्मृतिगीत युद्धभूमीचें
तंतत जें पवनीं नाचे
हैदरच्या दुष्कीर्तीचे
ध्वनि त्यांत उमटती साचे 'हें शील नव्हें मर्दाचें'! १०

# पटवर्धन कुलमणि भाऊ !

परशुराम भाऊ पटवर्धन धीर देत असतांही नाना फडणीस हे शिंद्यांचे दिवाण बाळोबा तात्या कुंजर यांच्या भीतीनें पुणें सोडून गेले ! तेव्हां भाऊनीं कुंजरास आपलासा करून नानांच्या संकेताप्रमाणें चिमाजी माधवाचें दत्तविधान करवून त्यांस पेशवा केलें. पण इकडे नानांनीं पुन्हां निराळेंच कारस्थान रचून बाजीरावास पेशवा करण्याचें ठरविलें आणि मश्रुउल्मुल्काची ५० हजार फौज नारोपंत चक्रदेवाच्या हाताखालीं देऊन भाऊ व चिमाजीमाधव यांस कैद करण्याकरितां त्यांना पुण्यास पाठवून दिलें.

कांहींच आगापिच्छा नसतां सकाळच्या वेळीं पुणें शहरांत 'दीन दीन शब्दांचा भयानक ध्वनि उमटला व शनिवारवाड्यास मोगल सैन्याचा गराडा पडला ! अशा भयानक प्रसंगीं या मर्द ब्राम्हणवीरानें तांतडीनें लष्करी पोशाख घातला, दोन्ही हातांत पट्टे चढविले आणि एका खंद्या घोड्यावर त्या बालस्वामीस आपल्यापुढें घेऊन पट्ट्यांची गरं गरं फेक करीत तो एकदम वाड्याबाहेर उसळला आणि शत्रूच्या छातीवर पाय देऊन त्यांच्या डोळ्या-देखत भरधाव घोडा फेकीत निघून गेला !

बुधवारांतून शुक्रवारांतून पर्वतीच्या मार्गानें शिवनेरीकडे हा स्वामि-निष्ट सरदार वेगानें जात होता व मागून नारोपंत चक्रदेव, अप्पा बळवंत दांत ओठ खाऊन २५ हजार फौजेनिशीं पाठलाग करीत होते. शेवटीं भाऊनें शिवनेरीचा किल्ला गांठला व त्यांत आपल्या स्वामीस सुरक्षित ठेऊन तो किल्ल्याच्या दरवाजाशीं जीवावर उदार होऊन शत्रुशीं पट्ट्याचे हात खेळा-वयास उभा राहिला !

* * *

काढुन चिमाजी राजा बसवावा बाजीराव
परशुराम भाऊ वरतीं नानांचा चढला डाव

लेखणी आणि तरवार दोघींत वैर दुर्भाव
सेनानी नारोपंत
उल्मुल्काच्या समवेत—
आले, ही कळतां मात
उठला तो धीर लढाऊ पटवर्धन कुलमणि भाऊ १

पूर्वेच्या कंठामाजी चमकलें रत्न तेजाचें
वृक्षांच्या घरट्यांमधुनी ध्वनि उठले जों काव्यांचे
तों पुण्यपुरीच्या कानीं ध्वनि 'दीन दीन' हा नाचे !
पेशवे प्रभूचा वाडा
त्या भंवती पडला वेढा
नाचला नबाबी घोडा
सरसाउन आला बाहू पटवर्धन कुलमणि भाऊ २

आनंद विलसला, तेथें चिंतेचे पडदे सुटले
उल्हास नांदला तेथें काहूर भयाचें उठलें !
शौर्य धैर्य या दोघांच्या तोंडाचें पाणी गेलें !
श्रीमंत चिमाजी बाळ
फिरतां त्या वरतीं काळ
देहाची करूनी ढाल
रक्तानें सजला न्हाऊं पटवर्धन कुलमणि भाऊ ३

चिलखत तें शरिरीं चढलें मंदील फडकला शिर्षी
कमरेस शोभला शेला लटकली ढाल पाठीशीं

वीराचे फुरफुरणारे लगटले हात पट्ट्याशीं
त्या बालनृपाला पुढतीं
घेवोनी अश्वावरतीं
शौर्य धैर्य यांची मूर्ती
काळावर धजला धावूं पटवर्धन कुलमणि भाऊ ४

टांचेसह उधळे घोडा चमकली वीज पट्ट्याची
भेदिली फळी शत्रूची चालली दौड वेगाची!
स्तिमिताच्या काळीं सिद्धी वीरांच्या चपल कलेची!
तो अरुण बालभानूचा
हनुमान रामरायाचा
कीं गरुड कृष्णमूर्तींचा
भेदीत चालला वायू पटवर्धन कुलमणि भाऊ ५

सत्कविची प्रतिभा जैशी उड्डाण अंबरीं घेई
किंवा दारूचा बाण आकाश—मंडळीं जाई
तैसा तो निधड़ा वीर महि सोडुन वर वर जाई!
चंचलतेच्या तीरास
अचलता करी तैं त्रास
शस्त्रें बघतीं वीरास
गेला तो मांड—भिडाऊ पटवर्धन कुलमणि भाऊ ६

गर गर पट्ट्याचे हात फिरवीत चालला वीर
शूराला अडवायाला एकास न झाला धीर!

अर्धलाख शिरगणतींचे ते मोंगल बनले पीर !
दोन्ही बाजूला कडपे
त्यांतून सिंधुनद तळपे
वळसे घेवोनी लोपे
कुणि शकला पूर्ण न पाहूं पटवर्धन कुलमणि भाऊ ७

जमलेल्या दुस्मानांच्या छातीवर देऊन पाय
राक्षसी महत्वाकांक्षा तद्‌धृदयीं लावुन 'हाय !'
झोत तो स्वामिनिष्ठेचा नेत्रांत दिपउन जाय !
क्षणिं दिसला बुधवारांत
क्षणिं दिसे शुक्रवारांत
धावे हुलकावणि देत
संकट काळाचा भाऊ पटवर्धन कुलमणि भाऊ ८

शिवनेरीच्या मार्गानें चालला सिंह उफळून
लागले शिकारी मागें करकरा दांत खाऊन
स्वारांची शर्यत चाले धूळीच्या पटलांतून
शिवनेरी दुर्गामाजी
ठेवून धन्याला गाजी
दुर्गाच्या द्वारामाजीं
ठाकला उभारुन बाहू पटवर्धन कुलमणि भाऊ ९

.......

# फिरविशी कसा जरिपटका ?

खर्ड्यांच्या युद्धांत हरिपंततात्या फडके यांचे चिरंजीव बाबुराव फडके हे जरिपटका घेऊन आघाडीवर होते. बाबुराव संग्रामांत नवखे असल्यामुळें ऐन गर्दीत त्यांचा दम सुटून ते जरिपटक्यासुद्धां पळूं लागले! तेव्हां शिंद्याचे सेनाध्यक्ष जिवबादादा बक्षी हे घोडा पिटाळीत त्यांच्याजवळ आले, आणि त्यांचा धिक्कार करून म्हणाले— " अरे भ्यांडा ! फडक्यांच्या कुळाला आज काय काळोखी आणतोस ही ? ...असा भागुबाईपणा दाखवून पेशव्यांच्या सर्व फौजेला निर्वीर्य, निःशक्त आणि नाउमेद करणार काय? ...शत्रूच्यापुढें उभें रहावत नसेल तर न पळतां शिंद्यांच्या लष्करामागें स्वस्थपणें निर्भय रहा" हें बोलणें ऐकतांच बाबुरावांना वडिलांच्या शौर्याचें स्मरण होऊन ते पुढें सरले व त्यांनीं निजामाचा धुव्वा उडविला. आघाडीहून फडक्यांचा सांडणीस्वार श्रीमंताकडे डाक घेऊन आला. त्यांत खुद्द बाबुरावांनीं लिहिलें होतें.– 'नबाब कोसभर मागें हटला, आम्हीं अंगावर मारीत चाललों आहों !'

* * *

खर्ड्याच्या मैदानांत दंगल रंगाला आली !
शिंद्यांची वीस हजार जोरांत कडाबिन फुटली !
भोसले सुभे जे त्यांनीं बाणांची झिम्मड केली !
आगही नबाबी धडके
जरिपटका घेऊन फडके
फिरले, तों जिवबा भडके
"कीर्तीस लाविशी चटका फिरविशी कसा जरिपटका ? १
अस्तन्या सारुनी ज्यानें गोर्‍यांस सारिले मागें !
राघोबा 'तोबा ! तोबा !' करुनी ज्यापुढती भागे !

बेलाग बदामी कोट सर करी शिड्यांच्या योगें !
त्या ताल्यांचाच कुमार
बीनीवरचा सरदार
खड्यावर खाउन मार
लौकिक ठरविशी लटका फिरविशी कसा जरिपटका ? २

हैदराबाद--दरबारीं मस्करी पुण्याची झाली !
काळ्यांनीं कानावरची लेखणी ठेविली खालीं !
'काढीन पिंड वजिराची' तेथेंच प्रतिज्ञा केली
तो बोल किती बिनमोल
राष्ट्राचा केवळ तोल
पळपुट्या ! गमे तुज फोल
ही निर्धाराची घटिका फिरविशी कसा जरिफटका ? ३

'फडके' या नांवामागें किति पराक्रमाचें तेज !
'फडके' या नांवामागें किति निर्धाराचें ओज !
त्या नामोच्चारें कांपे चळचळ रिपुचें काळीज
निर्वीर्य आणि निस्तेज
करितोस नांव तें आज
वाटते आम्हांसहि लाज
तूं गळ्यांतला मणि फुटका फिरविशी कसा जरिपटका ? ४

किती झाला मृत्युप्रळय त्या पानिपताच्या समरीं !
किती झुंजारांच्या पडल्या जरिपटक्याखालीं हारी !

निग्रही भाउही याला    घेऊन नाचला निकरीं
हें वस्त्र नव्हें व्यक्तीचें
राष्ट्राच्या स्वातंत्र्याचें–
हें निशाण बहुमानाचें
हा बहुमानाला झटका    फिरविशी कसा जरिपटका ? ५

हरिणाचें काळिज तुझिया    काळजांत शिरलें काय ?
शिंद्यांच्या गोटामार्गे    संरक्षीं अपुला काय ?
आकाश तोलितों आम्ही    येथें रोवोनी पाय
जरिपटका फिरला फिरला
फडक्यांचा पुत्र पळाला
आपणांसवें सकलांला
पाजिशी विषाचा घुटका    फिरविशी कसा जरिपटका ! ६

बघ, हौदा खालीं झाला    'लालखान' खासा पडला !
मुर्द्यावर दुसरा मुर्दा    'वजिरखान' याचा पडला !
'असगूलखान' बेदील    हिंमत हारोनी हटला
भाऊंच्या बाहुबळाला
बघ बहार कैसा आला
सोडून अतां बाजूला
उधळिशीं तूंच जयपट कां ? फिरविशी कसा जरिपटका ! ७

\+ + +

कुणी वदो 'मोहरा वळला' वळवाचा पाऊस वळला!
कुणि म्हणो 'बहाद्दर' फिरला वायूचा भंवरा फिरला!
आकाशपथावर गेला, परसैन्याचा पाचोळा!
रणविन्मुख होय निझाम
तह करी, करून सलाम
गाजलें शूरकुल—नाम
फडक्यांच्या गुरुचा फटका फिरविशी कसा जरिपटका? ८

अनुक्रम ........
विभाग ........
नों. दि.

# रणकीर्ती यशवंताची

इ. स. १८०४ सालीं यशवंतराव होळकरानें इंग्रजाबरोबर ज्या लढाया मारिल्या त्यांत त्याचे प्रगट झालेलें शौर्य, धैर्य आणि कर्तृत्वशक्ति ह्यांनीं त्याची रणकीर्ती अजरामर झाली आहे. प्रथम इंग्रज सेनापती कर्नल मान्सन ह्यास त्यानें आपल्या हद्दींत बिनधोक शिरूं दिलें. तोंवर हा इंदुरचा सिंह जाळींत दबा धरून बसला होता. आणि शत्रूच्या हालचालीवर सारखी नजर ठेवीत होता. कर्नल मान्सन हा आपल्या आटोक्यांत आला आहे असें पाहून त्यानें त्याच्यावर एकदम झेंप घातली ! या झेपेनें कर्नल मान्सन घाबरून जाऊन पळूं लागला ! कर्नल मान्सन हा पुढें, आणि होळकर मागें अशी ही हुतुतूची लढाई सारखी पावणे दोन महिने चालली होती. कर्नल मान्सन हा जों एकदा पळूं लागला तो होळकराशीं तोंडाला तोंड देऊन लढण्याकरितां फारच थोडा उभा राहिला. पाठीवर होळकर आला कीं मान्सन साहेब पुढें निघालाच !

फोडिली मराठी जूट भेदानें गृह-कलहानें
एकेक बुरुज ढांसळला या देशांतील फितुरीनें
देखिलें भयानक दृश्य इंदुरच्या यशवंतानें
आठवून मल्हारीला
प्रतिपक्ष्याच्या झुजीला
एकटाच सादर झाला
किती गावी ती तेव्हांची रणकीर्ती यशवंताची १

कर्नल मान्सनसम योद्धा झुंझारांतील झुंझार
घुसला माळव देशांत उठले तोफांचे बार

विजयेच्छू इंग्रज-सेना जाहली चमेली पार
कोट्यावर छबिना पडला
हिंगलगड तो गडबडला
धुंदींत शत्रु संचरला
प्रगटे माळव-भूपाची रणकीर्ती यशवंताची २

पंचानन घेई झेप कंदरामधोनी जैसा
वीजेचा उसळे गोळ अंबरा मधोनी जैसा
उसळला रिसालेदार इंदुर नगरीचा तैसा
कर्नलचा पदवीवाला
घाबरला टोपीवाला
सेने आधींच पळाला
चढली डंक्यावर साची रणकीर्ती यशवंताची ३

लेफ्टनंट ल्यूकन राहे शूराला अडवायाला
वृक्षानें अवरोधावें सांगा केवीं पवनाला ?
पहिल्या हल्ल्यांतचि धरिलें त्या जखमी सेनानीला
तरवारीच्या घाटाला
एकही शिपाई नुरला
भैरवी रणोत्सव घडला
जननी झाली स्फूर्तीची रणकीर्ती यशवंताची ४

त्वेषानें मारुनि दौड गांठिलें पुन्हां मान्सनला
मोकंरदच्या खिंडींत रोंखिला उरावर भाला

संदेश दिला शूरानें    निःशस्त्र शरण येण्याला
दुर्दैवाच्या अतिथीला
संदेश न जेव्हां रुचला
घाव तों निशाणीं चढला
रसरसली वीरश्रीची    रणकीर्ती यशवंताची    ५

' घे घे ' या अवसानानें    लागला शिकारी मागें
अनिवार जिवाचा मोह    सावज धावे आवेगें
साह्याला कोणि न येई    प्रीतीचे तुटले धागे
श्रावणमासाचे मेघ,
त्यांनाही चढला वेग
' फूं फूं '-करि चमला—ओघ
श्रवणीं तिचिया पडतांची    रणकीर्ती यशवंताची    ६

पलटणी अडकल्या तीरीं    चमला दुथडी भरलेली
गाळांत अडकल्या तोफा    दारूही ती भिजलेली
परि होळकराची दौड    पाठीवरती भिडलेली
सूं सूं सुटताती गोळ्या
टोळ्यावर पडती टोळ्या
उठल्या जखमी आरोळ्या
विस्मृति—गत ना व्हायाची    रणकीर्ती यशवंताची    ७

सरितेंत उड्या टाकोनी    किति मेले गणती नाहीं
छाप्यांत कटोनी पडले    त्यांचीही गणती नाहीं

आसरा मिळेना कोठें    अष्टही दिशांना द्वाही
जयपूर भरतपुरवाले
शिंदे ग्वालेरीवाले
इंग्रजास सोडुन गेले
फुरफुरली अश्वावरची    रणकीर्ती यशवंताची ८

जो चढला होता कैफ    असईच्या संग्रामाचा
जो गर्व वाढला होता    आरगांवच्या युद्धाचा
जिरला तो जिथल्या तेथें    हा विक्रम होळकरांचा
देशास लागले डाग
ते धुतले जागोजाग
शमली न तरीही आग
स्मृति देते संताजीची    रणकीर्ती यशवंताची ९

जेजूरीचा मल्हारी    संचरला होता देहीं
तैसा पूर्वज मल्हारी    संचरला होता देहीं
एकटा बहादुर लढला    कोणीहि न झाला स्नेही
अश्वांस विसावा नाहीं
देहास विसावा नाहीं
हल्ल्याची प्रतिदिनि घाई
स्फुरवी मति शाहीराची    रणकीर्ती यशवंताची १०

---

# हळदी घाटाचें युद्ध !

अंभेरचा राजा मानसिंग हा अकबराचा मामा होता. मानसिंग एका प्रसंगीं महाराणा प्रतापसिंह याच्या राज्यांतून जात असतां राण्यानें त्याचें आदरातिथ्य करून त्यास मेजवानी दिली. पण तो स्वत: त्याजबरोबर जेवला नाहीं. मानसिंगास राग येऊन तो जातांना म्हणाला, 'मी नांवाचा मान असेन, तर तुझी मान लववीन.' पुढें तो अफाट मोंगल फौज घेऊन अकबराचा मुलगा सेलीम यासह राणा प्रतापावर चालून आला. दोन्ही सन्यांची गांठ हळदी-घाटावर पडून तेथें घनघोर युद्ध झाले. राण्याच्या चैतकानें मानसिंहाच्या हत्तीच्या गंडस्थळावर टापा रोविल्या! तितक्यांत चपळाई करून राण्यानें मानसिंहावर भाला फेकला. पण तो अंबारीच्या लोखंडी कठड्यास लागून मोडला. त्यामुळें चिडलेल्या मोंगल सरदारांनीं राण्याच्या डोक्यावर असलेल्या सुवर्ण छत्राची खूण लक्षांत घेऊन त्याजवर तीन वेळां भयंकर गर्दी केली! या गर्दीत राण्याकरितां प्रथम 'तुवर'वंशानें मान दिली. नंतर 'झाला' वंशाच्या राज-निष्ठेची पराकाष्टा झाली. राण्याकरितां त्या वंशाचे १२५ वीरपुरुष एका-मागून एक कटून मेले!! चोंडावत व सुक्तावत शाखेचे असंख्य बळी पडले. शेवटीं चैतकास टांच मारून चैतकाचा धनी उडून गेला.

* * *

'मी नांवाचा जरि मान लववीन तुझी तरि मान!'
मानसिंह अपमानानें बुछवूं पाहे अपमान !

दिल्लीशाचें धनु सज्ज हा सर्प होय तद्बाण !

तो ‘ प्रताप ’ धर्मभ्राता
शौर्यांत पार्थ जणुं होता
‘ जय एकलिंगजी ! ’ वदतां
माजे भारत-प्रसिद्ध हळदी घाटाचें युद्ध १

चैत्राचे वायू-लोट आकाश-मंडपा फिरती
कीं आषाढाचे मेघ शिखरा शिखरावर वळती
तैसे मोंगल-रजपूत हळदी घाटावर जमती

गंभीर निनाद जहाल
दिग्मंडळ भेदुन गेलें
चापावरतीं शर चढले
हसवी वीर प्रारब्ध हळदी घाटाचें युद्ध २

वर कृष्णशिलांचे कडपे बाजूस भयानक खोरें
घन हरित लतांतुन गेलें वृक्षांचे उंच मनोरे
निर्झर-प्रपातें उडती सलिलाचे रम्य फवारे

ऐशा त्या विषमस्थानीं
हळदी घाटाच्या रानीं

मेवाडचे अभिमानी
जाहले कराया सिद्ध हळदी घाटाचें युद्ध ३

ते भजक स्वातंत्र्याचे संहारक परदास्याचे
संभाविक नृपभक्तीचे संमर्दक परशक्तीचे
देशार्थ मानिलें त्यांनीं तृणतुल्य मोल जीवांचें
राठोड राव रजपूत
एकेक जणो यमदूत
करि कार्य एक घावांत
स्वर्गास करीं संस्तब्ध हळदी घाटाचें युद्ध ४

मेवाड-राजलक्ष्मीचा सौभाग्यकंठमणि दिव्य !
स्वातंत्र्याचा आदित्य त्याचा उदयाचल भव्य !
ध्वज सिसेदिया वंशाचा क्षत्रीय वीरवर सेव्य !
राजस्थानाचा राणा
स्वातंत्र्य जयाचा बाणा
तो भीमकर्म करतांना
यज्ञकुंड गमलें शुद्ध हळदी घाटाचें युद्ध ५

शरशिला- वृष्टि भिल्लांची शत्रूस करी संचूर्ण
उत्साहोन्मुख तद्वृंद मेघासम होय विकीर्ण
कीं नक्रसंघ जमलेला तळभागीं होय विशीर्ण
आरक्त जाहला घाट
प्रेतांनीं अडली वाट

भिववी रणरूप विराट

सरलें न तरी संक्रुद्ध हळदी घाटाचें युद्ध ६
पर्वतावरी सिंधूचा सलिलौघ आदळे जैसा
शैलाच्या शृंगीं नाचे बालार्क किरण कीं जैसा
गजशिरीं मानसिंहाच्या राण्याचा 'चैतक' तैसा

नवसाला पावला अल्ला
राण्याचा चुकला भाला
हत्तीसह हौदा फिरला

काळास करी संक्षुब्ध हळदी घाटाचें युद्ध ७
तो धर्मभूमिचा भर्ता राजनिष्ठ लोकभ्राता
निःशस्त्र जनांचा त्राता निःशक्त जनांचा पाता
समराश्चर्याचा कर्ता कलहोन्मुख खलजनहर्ता

सद्गुणीं धनुर्विद्येचा
अग्रणी खड्गशास्त्रांचा
चूडामणि राजमण्यांचा

तत्प्रताप-गुण-संवेद्य हळदी घाटाचें युद्ध ८
काव्याचा सुंदर ओघ त्या भंवती उपमा जैशा !
सिंधूचा दीपस्तंभ त्या भंवतीं ज्योती जैशा !
तेजस्वी राण्यामागें तेजस्वी सेना तैशा !

मानोचित छत्र नृपाचें
सोन्याचें रवि-चिन्हाचें
त्या भंवतीं संकट नाचें

तेव्हां झाले बेहद्द हळदी घाटाचें युद्ध ९

तुर्की अफगाणी घोडे छत्रावर धांवत आले !
पाणबुडे मोत्यासाठीं बुडले नक्रांनीं गिळिले !
अहि-शीर्षमण्याच्या लोभें घातकी जिवाला मुकले !
भाला बरची तरवार
निर्दय शस्त्रांचे वार
भूमीस शिरांचा भार
पेटलें असें अनिरुध्द हळदी घाटाचें युध्द १०

जों पडे प्रतापीं घाव 'तुवर' वंश देई मान !
'झाला-कुल' झेली घाव त्याचीही तुटली मान !
गर्दीवर गर्दी झाली सोडी न तरी मैदान !
'मानसिंह दावा मातें ?
सेलीम दाखवा मातें ?'
ते तर दडलेले होते !
चिरकाल स्मृतिसंबद्ध हळदी घाटाचें युध्द ११

'चोंडावत चंडतनूचें 'सूक्तावत' शक्तिधरांचें
विख्यात देशभक्तांचें सांडले रक्त मोलाचें
जे कडे कपारीं पडले दर्शनही दुर्लभ त्यांचें
चैतकास झाली खूण
पापणीही लवली जों न
तों प्रताप गेला उडुन
शत्रूस करी हतबुध्द हळदी घाटाचें यध्द १२

......

# रक्तास मिळालें रक्त !

हळदी घाटाच्या युद्धांत राणा प्रतापसिंह यानें शौर्याची पराकाष्टा केली. १४००० मेवाडी रजपूत धारातीर्थी कटून मेले. निदानीला चैतकावर स्वार झालेला प्रतापसिंह मोंगलांचा घेर फोडून निघाला. 'मुलतानी' व 'खोरासानी' या दोन धिप्पाड पठाणांनीं त्याचा पिच्छा पुरविला. सर्व दिवस पळतां पळतां तो व त्याचा घोडा दोघेहि थकून गेले; इतक्यांत पठाणांनीं लगट केली ! घामाघूम झालेल्या चैतकाच्या तोंडांतून फेस गळत होता, त्याच्यानें पाऊलही उचलवेना अशा स्थितींत "भिऊं नकोस, भिऊं नकोस" असें कोणी ओरडून बोलल्याचें प्रतापानें ऐकले. तो त्याचा 'सुक्त' नांवाचा भाऊ होता. पूर्वी प्रतापाशीं भांडण होऊन तो मोंगलास मिळाला होता. ते दोघे एकाच रक्ताचे असल्यामुळें कांहीं झालें तरी बंधूचे अनिवार्य मृत्यु संकट पाहतांच रक्त रक्ताकडे धांवलें. त्यानें त्या दोघां पठाणांस ठार मारून बंधूस निर्भय केलें. दोघे भाऊ कडकडून भेटले. धन्याला संकटमुक्त पाहून चैतकानें प्राण सोडला. त्याजवरील अलोट प्रेमानें राणाजीस फार दुःख झालें; त्यांनीं जेथें त्यास पुरलें तेथें त्याजवर एक चबुतरा बांधिला, तो "चित्तकका चबुतरा" म्हणून राजस्थानांत प्रसिद्ध आहे.

*　　　*　　　*

हळदी घाटाची भूमी　　कुरुभूमीसम करुनीया
शत्रूचे—छे ! दैवाचे　　आघात हृदयिं साहूनिया
चैतकचा स्वार उडाला　　रिपुमंडळ उल्लंघुनिया
　　'मुलतानी' 'खोरासानी'
　　पुरविली पाठ दोघांनीं
　　पूर्वीचा वैरि असोनी
धांवला सहोदर 'सुक्त'　　रक्तास मिळालें रक्त !　　१

गजशिरीं मानसिंहाच्या ज्यानें नाचविल्या टापा
अरबी तुर्की स्वारांना करण्यास लावि अनुतापा
दिल्लीच्या नृपलक्ष्मीला टाकाया लावी धापा
रणचतुर तुरंगम ऐसा
स्वामीच्या प्राणासरसा
धांवे गिरिकाननिं सहसा
तों साह्य मिळालें युक्त रक्तास मिळालें रक्त! २

युद्धीं रक्ताचें स्नान आतां धर्माचें स्नान
तेव्हां वृत्ती बेभान आतां तनुवृत्ति क्षीण
स्वार आणि घोडा दोघे दोघांस दिसे निज-मरण
विखुरले मुखावर केस
तोंडांतुन गळतो फेंस
नावरतो श्वासोच्छ्वास
संकट होतां संप्राप्त रक्तास मिळालें रक्त ३

चौकींत चालला केव्हां भरधांव धांवला केव्हां
झाडींतुन गेला केव्हां अंबरीं उडाला केव्हां
ओढा गति अडवि जेव्हां घोडा तो उधळे तेव्हां
जाहली लगट अश्वांची
हालली ज्योत जीवाची
ऐकली वाणि धैर्याची
'भिऊं नको' शद्ब हे स्पष्ट रक्तास मिळालें रक्त ! ४

'कोण तो ?' म्हणोनी बघतां   दुर्द्वेषी बंधू दिसला !
सदनांतील हा तर सर्प   यवनांस सहायक झाला !
क्षण एक संशयें जीव   जाहला उन्हांतिल पाला

तों रक्ताचा अभिमानी
मुलतानी खोरासानी
त्यांच्या संमुख ठाकोनी

मुक्त होय समरासक्त   रक्तास मिळालें रक्त !   ५

शंका निस्सीम पळाली   आश्चर्य हांसलें थोर
प्रीतीला भरती आली   आनंद डोलला फार
त्या सिसोदिया वंशाच्या   खांड्याचा जबरा मार

ढालेचे ढलपे तुटती
चिळकांड्या भंवतीं उडती
हुंकार मुखांतुन निघती

वनदेवि वदति अव्यक्त   'रक्तास मिळालें रक्त !'   ६

चंचल कवितेचा नूर   उतरी जैसा शाहीर
इष्काची वेडी तार   तोडी मर्दानी सूर
अफगाणी डोळ्यांवरचा   उतरी तो तैसा धूर

तो क्षणांत भासे अरुण
तो क्षणांत भासे वरुण
परि जन वदती कीं अर्जुन—

' तो जातीचा रजपूत   रक्तास मिळालें रक्त !'   ७

'विजयोस्तु' म्हणा सूक्ताचा शिर तुटलें खोरासानी!
'विजयोस्तु' बंधुधर्माचा शव पडलें तें मुलतानी!
दोघे मेवाडी भाऊ भेटले अहा! कडकडुनी
हृदयाचीं कमलें फुललीं
शरिरें रोमांचित झालीं
बाष्पांची गंगा स्रवली
तींत दोष झाले लुप्त रक्तास मिळालें रक्त! ८

धनि संकटमुक्त जहाला चैतकास धुगधुग थोडी
तो पंचप्राण धन्याचा पंचप्राणाला सोडी!
दिव्य शौर्य दिव्यहि वेग त्यांची तुटली ही जोडी!
त्या अश्व समाधीवरतीं
स्वामिभक्ति बंधुप्रीती
दोघींही गीतें गातीं
त्यांतील एक हें गीत 'रक्तास मिळालें रक्त!' ९

••••••

# एक काळ ऐसा होता.

(१) जुना भारतकाळ. (२) श्री छत्रपतीच्या वेळचा मराठी काळ. (३) पेशवाईचा काळ. (४) पेशवाई बुडाल्यापासून तों श्री. विष्णुशास्त्र्यांपर्यंतचा काळ. असे हे काळाचे निरनिराळे ४ भाग आहेत.

× × ×

## भाग पहिला

जग निद्रित होतें जेव्हां वेदांत घोष करणारे
जग अज्ञानावस्थेंत शास्त्रें तेव्हां रचणारे
जग उघडें होतें जेव्हां उन्नतिला तैं भिडणारे
ज्ञानवंत जन मतिमंत
धन–विद्येनें श्रीमंत
होतें येथेंच अनंत
रोमांच येति आठवतां एक काळ ऐसा होता १

एक वेळ गेले शब्द काय ते पुन्हां फिरवावे
प्राणांतिक येवो काळ सत्य तें करुन दावावे
भीतीचें नांव कशाला स्वत्वातें प्रगट करावें
सत्याचा उज्वल द्वीप
सत्वाचें निर्मळ रूप
आर्यांची कीर्ति अमूप
ज्याकाळीं येई बघतां एक काळ ऐसा होता २

पाहिज शूर कां तुम्हां ? वाचा अर्जुन चरिताला !
कां हवा तापसी सांगा ! पाहा विश्वामित्राला !
निग्रही पाहिजे कां हो ? अवलोका जा भीष्माला !
एकेक अलौकिक मूर्ति
करि कर्तव्यांची पूर्ति
मिळवी जी शाश्वत कीर्ति
त्या नर-रत्नांचा दाता एक काळ ऐसा होता ३

पाठीस घातला ज्याला रक्षक होतील तयाचे
कुणि आश्रित होउन आला तर तरुवर हे छायेचे
कुणि चातक होउन आला तर पयोद हे मायेचे
चंदन घासून तनूचें
परक्यांना सुखवायाचें
श्रेष्ठत्व भारतीयांचें
जन वर्णिति येतां जातां एक काळ ऐसा होता ४

परधर्मांचे ना द्वेष्टे निजधर्माचे अभिमानी
ना गुलाम करितिल कोणां, राखतील अपुलें पाणी
अपहार न ठावा ज्यांना व्यवहार नीतिचे ज्ञानी
सच्छील श्रध्दायुक्त
स्वातंत्र्याचेही भक्त
ऐहिक विभवास विरक्त
प्रसवी जा आर्यश्रेष्ठां एक काळ ऐसा होता ५

“ सोन्याचा कोठें धूर ? तर भारत--खंडामध्यें !
रत्नांच्या कोठें खाणी ? तर हिंदुस्थानमध्यें !
अमृताची वृष्टी कोठें ? तर आर्यावर्तामध्यें
हें यश परक्यांनीं गावें
मन अगदीं मोहुन जावें
तारूवर भटकत यावें
पाहाया ती सुंदरता एक काळ ऐसा होता ६

.........

# एक काळ ऐसा होता!

## भाग दुसरा

विनतारीचे संदेश सोडावे रायगडानें
त्यावरुनी इतर गडांनीं झुंजावें अति जोमानें
गोळ्यांच्या पर्जन्यानें भिजवावीं रणमैदानें
शौर्याचा पाहुनी थाट
तोंडांत घालुनी बोट
फिरवावी रिपुनें पाठ
व्हावी भुई थोडी पळतां एक काळ ऐसा होता १
गिरी-कुहरांतुनी उफळोनी वनराज केसरी यावा
कीं ज्वालामुखि भडकोनी आगीचा लोळ उठावा
कडकडुनी जलधरमाला वीजेचा गोल तुटावा
'शिवबाची स्वारा ठली
भ्रुकुटी कोणावर चढली?
कोणाची घटिका भरली?'
ऐकाया ये जन-वार्ता एक काळ ऐसा होता २
भूपाल महाराष्ट्राचा दरबारीं जेव्हां यावा
'श्री छत्रपति शिवराज!' जयघोष असा उसळावा
सरदार शिलेदारांचा संघात उभा ठाकावा
गोऱ्याचा टोपीवाला
दिल्लीचा दाढीवाला

मान्य तो तयांसही झाला
लववितात अपुल्या माथां एक काळ ऐसा होता ३

औरंगपुराचें रूप बेरंग करोनी फिरती
दाभोळावर वेगानें टोळासम जाउन पडती
सुरतेच्या सुरतीवरतीं जे फिरउनी येती
गो-विप्रांचे ते वाली
विजयाचा तिलक कपाळीं
लावोनी ज्या त्या वेळीं
झटले जैं देशाकरितां एक काळ ऐसा होता ४

वेढिला पुरंदर किल्ला दिल्लीच्या दिल्लिरखानें
कोंडाणा कोंडुन धरिला 'जयसिंह' समर-धीरानें
किल्ल्याचे तट लढताती शौर्यानें उत्साहानें
जरि शिरें तुटोनी पडतीं
तरि रायाची आज्ञा ती
रणिं कबंध पाळित असती
स्पृहणीय राजभक्तीचा एक काळ ऐसा होता ५
जन्मभूमिसाठीं सांगा जातील मृत्युच्या द्वारीं !
कुलकीर्तीसाठीं सांगा काळाचे होतिल वैरी !
देशबंधुसाठीं सांगा शेषावर करिती स्वारी !
समशेरी नाचविणारे
भाल्याला खेळविणारे

चापाला भूषविणारे
या शूरांचा जो दाता एक काळ ऐसा होता ६

जमवून मांड घोड्याला भरधांव कसा फेंकावा
जातांना निजखड्गानें रिपु-कंठ कसा छेदावा
नाचवीत भाला हातीं शत्रूस कसा वेधावा
हें शिक्षण नव तरुणांचें
'देशभक्त' या पदवीचें
ना बी. ए. एल्‌एल्. बीचें
उपयोग काय पण आतां एक काळ ऐसा होता ७

शिवरायासाठीं अपुलें सौभाग्यही मळवायाला
एकुलता एकच पुत्र तोही पण गमवायाला
तत्पर ज्या होति सुखानें धन्य! धन्य! साध्वी विदुला
अपुलें फुटलें जरि भाळ
सुखि राहो शिवभूपाल
सुखि असो देश चिरकाल
ध्यास हाच युवति-चित्ता एक काळ ऐसा होता ८

जैं महाराष्ट्र भूमीची भाग्याची होती सृष्टी
कोणाची जननी व्याली टाकील वांकडी दृष्टी
कोणाची छाती होती बोलेल वांकड्या गोष्टी
रावा पासोनी रंका
कोणाला नव्हती शंका

शिवबाचा एकच डंका
चहुं दिशेस वाजत होता    एक काळ ऐसा होता    ९

घेवोनी उत्कंठेनें    वाचावा गत इतिहास
भिजवावीं त्याचीं पानें    सोडावा दीर्घोच्छ्वास
जीर्ण दुर्ग ते पाहोनी    व्हावें हो चित्ति उदास
आठवून त्या त्या गोष्टी
लक्षून आजची सृष्टी
अंतरांत व्हावें कष्टी
येती वच सहजीं वदतां    एक काळ ऐसा होता.    १०

# एक काळ ऐसा होता.

## भाग तिसरा

राघोबा कोठें आहे ? अहमदाबाद वेशीला
म्हणतात कुणी-'छे! भिडला अजमीराच्या कोटाला!'
इतुक्यांत बातमी आली थडके तो मुलतानाला!
जो अधिपति लाहोराचा –
पोषाख चढवि युद्धांचा
सेनापति पुण्यपुरीचा
थडके लाहोरा पुढती! एक काळ ऐसा होता १

कृष्णा–कांठाचे घोडे अटकेला पाणी प्याले
सह्याद्रीचे रणशूर हिमगिरीस जाउन भिडले
हस्तिनापुराची लक्ष्मी ढालेवर घेऊन आले
त्यांना तैं अडवायाची
छाती न होय एकाची
घटिका ती ऐश्वर्याची
येतात अश्रु आठवितां एक काळ ऐसा होता २

म्हैसुरचा वाघ निघाला सावनूर काबिज केलें!
धारवाड-मैदानांत पंजाचे डावचि खेळे!

खेळ खेळ बेटा! खेळ पाहा पण उघडुनि डोळे!
युद्धाचे तालिमवाले
पटवर्धन चालुन आले
पाहतांच सावज लोळे
स्फुरते तनु ज्यातें स्मरतां एक काळ ऐसा होता ३

हैद्राबादचे वीर राखाया पाणी झटती
भाऊच्या समशेरीचें चाखोनी पाणी पळती!
राहील कोठचें पाणी पाण्यानें तोंडें सुकती!
हत्तीच्या सोंडेवरतीं
घोड्यांच्या तोंडावरतीं
जय--चिन्हें शोभा देती
शौर्य--श्री--वर्धनकर्ता एक काळ ऐसा होता ४

एका निजराष्ट्रासाठीं विप्र क्षत्रिय ते वैश्य
जातिभेद विसरुन अपुला व्हावे रणिं एक अवश्य
एकीचें कळलें होतें सकलांस खरें स्वारस्य
उन्नतिच्या मंगल कालीं
स्वातंत्र्य--निशाणाखालीं
देशभक्त वेळोवेळीं
यावेत सोडुनी स्वार्था एक काळ ऐसा होता ५
गारदी फौज खानाची संगीन खोंवुनी चाले
ग्वालेरी पगडीवाले सरदार तोलती भाले

माळवी रिसाले भव्य हेषा-रव करिते झाले
पांढऱ्या गजावर बसुनी
पेशवे निघाले सजुनी
इंद्राची स्वारी म्हणुनी
भास हाच व्हावा चित्ता एक काळ ऐसा होता ६

गड दुर्ग न ऐसा उरला बोंचला न ज्याला भाला
ऐसा न कोणता प्रांत जो पुण्यपुरीस न भजला
भूपती न ऐसा कोणी श्रीमंतांस न जो लवला
ज्या दिशेस मुख फिरवावें
तेजाचे किरण पडावे
डोळे हे दिपुनी जावे
वैभव-रवि होता चढता एक काळ ऐसा होता ७

गारांचा पाउस बरवा बरवी न वृष्टी शिंद्यांची
स्वारी जी होळकराची त्याहून बरी व्याघ्राची
धडगति ना यद्देवाची त्यांनाच गांठ फडक्यांची
शत्रूंना ज्यांची भीति
अत्यंत वाटली चित्तीं
त्या गेल्या गेल्या मूर्ति
तोंडानें बोला आतां एक काळ ऐसा होता ८

जो 'हर! हर! गर्जुन गेला ध्वनी दोन्हीही टोंकाशीं
हर देई त्याची साक्ष रामेश्वर--काशीवासी
एकाया येइल काय? रवि रोज येइ उदयासी
गिरिशिखरें आरोहून
रणतीर्थें तीं पाहून
परवश स्थिती जाणून
चंडांशु स्मरतो बुडतां एक काळ ऐसा होता ' ९

••••••

# एक काळ ऐसा होता

## भाग चवथा

कोरेगांवाच्या पगड्या खुंटीवर झळकत होत्या
अष्टयाच्या संग्रामाच्या तरवारी झळकत होत्या
बंदुकीमुळें फुटलेल्या गेहिं गेहिं ढाला होत्या
गाजविलेल्या शौर्याचा
ओढवलेल्या दैवाचा
इतिहास मुखें शेवटचा
सांगती शूर हळहळतां एक काळ ऐसा होता १

पारतंत्र्य शय्येवरती भारत निजलेला होता
आंखडून साऱ्या नाड्या दम छातीमध्यें होता
आकळ्या दिल्या जोरानें शेवटीं अचेतन होतां
मिरतेला उठला बार
कानपुरीं झडली फैर
दिलीस माजलें वैर
दीप होय मोठा विझतां एक काळ ऐसा होता २

झाले नानासाहेब साहेबां तैं काळ
केले तात्या टोप्यांनीं टोपीवाल्यांचे हाल
झांशीची लक्ष्मी अबला प्रबलांशीं करि कल्लोळ

हातार्शी आला स्वर्ग
मिरवी जो तो निजगर्व
भूपाल म्हणविती सर्व
कोणी न कुणाचा शास्ता एक काळ ऐसा होता ३

मर्दांच्या मर्दुमकीचे पोवाडे रचिले जातां
लढवय्यांच्या नांवाची ती थाप डफावर पडतां
स्वातंत्र्याच्या काळाला हौसेनें शाहिर गातां
तों सुधारणा नव आली
गेलेल्या वैभव--कालीं
भुरळ ती मनाला घाली
तिजलाही भुलली जनता एक काळ ऐसा होता ४

देवधर्म मानुन झूट घालावा भलता वाद
संध्यास्नानें राहोत जावे नित हाटेलांत
भक्षावें तेथ अभक्ष्य तें अपेय--पान करीत
डबक्यातिल मंडुक जैसे
भक्षोनी पंकिल घोषें-
डरडरती कटु आवेशें
बोलाव्या तैशा बाता एक काळ ऐसा होता ५

परक्यांनीं संस्कृति गावी निंदावें वंद्य ऋषींना
आचार उचलुनी त्यांचे हिणवावें साधुजनांना

देव्हारे मांडुन त्यांचें हांसावें देव्हाऱ्यांना
आर्यांच्या सद्वेदांचा
आचार्यांच्या ग्रंथांचा
अभिमानहि नुरला साचा
पोशाखींही परवशता एक काळ ऐसा होता ६

इंग्रजी शिकोनी थोडें पुस्तकी ज्ञान मिळवावें
एखादी पदवी मिळतां विद्वान म्हणुन मिरवावें
वाणीचें तांडव करितां परशब्द मधें घालावे
देशाच्या पोकळ गोष्टी
करितांना केवळ ओष्ठीं
एकाला दुसरा पुष्टी
देई, श्रम कांहिं न करितां एक काळ ऐसा होता ७

विल्यम्साचें म्हणणें कीं ' कालिदास सत्कवि कसचा !'
मानिएर बोले त्याला[1] ' कर्ता कृत्रिम कवितेचा !'
आम्हाला मान्य असाव्या मत्सर-ग्रस्त तद्वाचा !
अमुच्या विद्वद्रत्नांना —
परके निंदित असतांना
तुकवाव्या आम्हीं माना
ग्रंथही न केवळ बघतां एक काळ ऐसा होता ८

---

१ कालिदासाला

'शिवभूप लुटारू होता' ढोलकें अम्हीं बडवावें!
'अगदींच निरक्षर होता' तुणतुणें अम्ही ताणावें!
'विश्वासघातकी होता' सुरांत सूर मिळवावे!
राज्याला मुकलों जैसें
बुद्धीला मुकलों तैसें
सांगितलें कोणीं जैसें
मानावें तैसें चित्ता एक काळ ऐसा होता ९

जोंवरी विष्णुशास्त्र्यांनीं लेखणी उचलली नव्हती
लेखणी कशाची छे·हो! स्वाभिमान दीपज्योती
जोंवरी लोकमान्यांची निश्चयांत मूर्ती होती
निजपूर्वज–वंचक तोंची
आपुली खांच उदरांची
भरण्यासाठीं स्वत्वाची
दिसले जैं विक्री करितां एक काळ ऐसा होता १०

# केवळ देशाकरितां

"स्वदेशाकरितां लढतां लढतां समरांगणावर पतन पावलेल्या आपल्या पुत्रानें आणखी काय सांगितलें?" असें बापानें गहिंवरून विचारलें. तेव्हां अंतसमयी जवळ असलेला त्याचा मित्र बापास त्या मृतवीराचें शेवटचें भाषण सांगत आहे.

× × ×

प्रिय-पुत्र दिवंगत झाला स्वातंत्र्य-रणीं लढतांना
तन्मित्रें शोकद-वार्ता कथिली मातापितरांना
मातेची शुद्धी गेली करि विलाप भगिनी नाना
'बाळ काय वदला अंतीं ?'
पुसतसे तात शोकांतीं
कथि तदंत्य-वाणी तो ती –
'जन्मुनी धन्य मी झालों देशाच्या कामीं आलों' १

'शूरांच्या वंशीं शूर वीरांच्या सुकुलीं वीर
मर्दाच्या पोटीं मर्द धीरांच्या उदरीं धीर
मज जागृति या वचनांची देत होति ही **समशेर**
कुलदेवी हीच भवानी
कुळ-पुरुषांनीं वंदोनीं
कुल भूषविलें सकलांनीं
तें यश रक्षाया झटलों देशाच्या कामीं आलों २

उलटला रंग युद्धाचा 'घे मार' सुरू जैं झाली
स्मृति झाली तैं स्वजनांची क्षण वृत्ती होय निराळी
तों "**केवळ देशाकरितां**" ही ध्वजाक्षरें वाचियलीं
तेव्हांपासुन खड्गानें
प्राशिलें रक्त किति नेणें
तें तेंच एकलें जाणें
कर्तव्यीं मी रमलेलों देशाच्या कामीं आलों ३

ना प्रभाव या हातांचा सर्व तो जननि-दुग्धाचा
ना विक्रम मद्देहाचा आर्यांच्या कुलकीर्तीचा
नाचविला भगवा झेंडा ज्यांनीं शिवछत्रपतींचा
मातापितरांची प्रीती
तच्चरणीं माझी भक्ति
उभयतांची तुटली ग्रंथी
सेवेला त्यांच्या मुकलों देशाच्या कामीं आलों ४

एकुलता होतों एक पितरांनों ! वंशज तुमचा
हृदयाची कोमल भगिनी बंधू एक मी प्रेमाचा
ऐकतांच मन्निधनाला लोटले पूर बाष्पाचा
पृथ्विराज पडला जेथें
तानाजी निजला जेथें
दाखवून निज शौर्यातें
स्वातंत्र-रणीं त्या निजलों देशाच्या कामीं आलों ५

मंदारपुष्पनवमाला घेवोनी निर्जरबाला
विलसवीत निजहास्याला दाखवीत अभिनय-लीला
वाद्यांच्या घेउन ताला वाजवीत घुंगरमाळा
आला हा त्यांचा मेळा
दिसतसे स्पष्ट नयनांला
मित्रा ! जननीजनकाला--
जा सांग; 'स्वर्गी गेलों देशाच्या कामीं आलों' ६

* * *

हृदयावर ठेवुनि हात शोकानें विव्हल तात
आकाशीं वर पाहात गद्गद वदला दुःखांत
राखोनी 'बाळा!' नांव मज केलें धन्य जगांत
देशाची आज्ञा होतां
केवळ जे प्राणाकरितां
कचरतील लढतां लढतां
तत्क्षणीं वाणी खेळो 'देशाच्या कामीं आलों' ७

# परीक्षा पास झाली; पण पुढें काय ?
# दास्य हेंच ना त्वद्ध्येय ?

जाहली परीक्षा पास ऐकिली मीहि वार्ता
नवसास पावला देव झाली ना श्रमसार्थकता ?
'कृतकृत्य जाहलो' ऐसें गमतें ना तुझिया चित्ता ?
रात्रीचा करुनी दिवस
गणितां न नेत्रविकृतीस
जपतां न तसें प्रकृतीस
मिळविलें यश परी हाय ! दास्य हेंच ना त्वद्ध्येय ? १

कारागृहिं पडली आई पाहते दीनवदनानें
भाळास लावुनी हात न्हाते ती अश्रुजलानें
तोडून कडाकड बेड्या फेंकाव्या निजहस्तानें
ऐशा निकराच्या वेळीं
दुःखाची पेटे होळी
जन्मभू तिची आरोळी
तुज अरण्यरोदन होय दास्य हेंच ना त्वद्ध्येय ! २

देशानें आशा केली 'फिरवील दिवस हा माझे'
जन्मभूमि वांछित होती 'उचलील संकटीं ओझें'
राष्ट्रेच्छा कीं, 'उघडील स्वातंत्र्याचे दरवाजे'

जन्मलास ज्या देशांत
वाढलास ज्या भूमींत
त्यांचा अभिमान तुझ्यांत
सांग ? सांग ? तरुणा ! काय दास्य हेंच ना त्वद्धयेय ? ३

वीनीवरचे सरदार लढतांना पडले युद्धीं
उरलेले बघती मागें बोलविती तरुणां आधीं
ती कर्तव्याची हाक स्वार्थांध तुझी पण बुध्दी
ये आशिक्षितांसही वारें
मर्दाचा देह थरारे
घोकुनी बुकांचे भारे
स्वत्स्वत्व लयाला जाय दास्य हेंच ना त्वध्द्येय ? ४

देशभक्त-चरितें ज्यांत घोकलास ना इतिहास ?
पृथ्विराज शिवरायांनीं मोहिलें न काय मनास ?
कर्तृत्त्व तयांचें तुझिया हालवी न कां हृदयास ?
पोटाचा जो अभ्यास
बुद्धीचा त्यांत विकास
व्हायाचा नाहीं खास
तव उदाहरण या योग्य दास्य हेंच ना त्वद्धयेय ? ५

तो प्रतापराणा तरुणा ! 'बी. ए' झालेला नव्हता
शिवभूप परीक्षा द्याया 'एम्. ए.' ला बसला नव्हता
परि देशाकरितां होता धगधगत तयांचा आत्मा

अनुक्रम ७.६०३६०.५
दिनांक
क्रमांक
नों.

देशभक्त एकहि पुरतो
देशमुक्त करण्याला तो
इतिहास तयांचा तुज तो
श्रूत असतां निःसंदेह        दास्य हेंच ना त्वद्धयेय ?

तानाजी बाजी गाजी        एसाजी तो नेताजी
संताजी आणि धनाजी        बा ! राणोजी दत्ताजी
राखोनी अपुली बाजी        देशाच्या खपले काजीं
तो उज्वलतेचा काळ
ही परवशतेची वेळ
दोहोंत घालुनी मेळ
ठरविलें तुवां अनिवार्य        दास्य हेंच ना त्वद्धयेय ?   ७

ब्रम्हचर्य देशासाठीं        गार्हस्थ्यहि देशासाठीं
विद्यार्जन देशासाठीं        द्रव्यार्जन देशासाठीं
संसारचि देशासाठीं        कांहींच न अपुल्यासाठीं
हें ध्येय असें आर्यांचें
तत्पुत्र म्हणविणारांचें
यत्कीर्ती चपला नाचे
तत्कुलीं जन्मुनी देह        दास्य हेंच ना त्वद्धयेय ?   ८

'आचार्य' 'भट्ट' पदवीचे        विद्वान इथें बा ! होते
ज्यांच्याशीं तव विद्वत्ता        लागेल न पासंगातें

अनुक्रम ..............
विभाग
क्रमांक
नों. दि.
ग्रंथालय

तें गुलाम होण्याकरितां      विद्वान जाहले नव्हते
ज्योतिःशास्त्राला शिकशी
गणितांत हुषारहि ठरशी
उपयोग काय देशाशी ?
म्हणवि तूं ' भास्कराचार्य '   दास्य हेंच ना त्वद्ध्येय ?   ९

लागली चहुंकडे आग      डोंबाळा उठला भंवती
आरक्त कराल–ज्वाला      देहाला चाटुन जाती
काढा हो ! कोणी काढा    असहाय बंधु ओरडती
रुधिराचें होउनी पाणी
जावें हृदयीं खळबळुनी
जावें जेथें धावोनी
तेथें न वाहतां पाय      दास्य हेंच ना त्वद्ध्येय ?   १०

' घरभेद्या ' होउन जेव्हां   करिशिल तूं बंधुद्रोह
' चुगलखोर ' होउन जेव्हां लाविशील स्वजनीं दाह
फसविशी अविश्वासी जैं    तूं राष्ट्रीयांचे देह
जैं विकशिल अपुलें शील
तैं मान्यतेस येशील
पदव्याही तुज मिळतील
करि पुरुषार्थास अपाय    दास्य हेंच ना त्वद्ध्येय ?   ११

# दा. ना. मोघे - प्रकाशन, कोल्हापूर.

आणि

## इतर कांहीं पुस्तकें

स्कूल व कॉलेज बुकस्टॉल, कोल्हापूर.

# दा. ना. मोघे-प्रकाशन व इतर कांहीं पुस्तकें

| कादंबऱ्या | रु. | आ. |
|---|---|---|
| दौलत | ५ | |
| काश्मिरी गुलाब | ३ | ८ |
| अटकेपार | ५ | |
| उन्माद | ५ | |
| दौलत (संक्षिप्त) | २ | |
| सुखाचा शोध | ३ | ८ |
| रिकामा देव्हारा | २ | ८ |
| दिव्यचक्षु | ३ | ८ |
| आंधळा न्याय | २ | ८ |
| जळतें रहस्य | २ | |
| मावळता चंद्र | २ | |
| बेसूर संगीत | २ | |
| तांबडी माती | २ | |
| प्रतिबिंब | २ | ८ |
| चौघांच्या चार तऱ्हा | २ | |
| विभावरी | ३ | |
| शिवशाहीचा शुभ शकून | ३ | |
| शिवशाहीची पहांट | ३ | |
| माझें बालपण | ५ | |
| झोंपी गेलेला देश | ३ | ८ |
| मुचकुंददरी | २ | |
| माळरानांत | २ | |
| समरांगण | २ | |
| ती | ३ | |

| कादंबऱ्या | रु. | आ. |
|---|---|---|
| गौरीहर | २ | ८ |
| पिशाच्च प्रेम | २ | |
| महात्मा कीं मोहात्मा | २ | ८ |
| चित्रकार रंगा | ३ | |
| **कथासंग्रह** | | |
| विद्युत्प्रकाश | १ | ८ |
| पाकळ्या | १ | ८ |
| त्रिवेणी | १ | ४ |
| अर्धवर्तुळें | २ | ८ |
| कोंवळी किरणें | १ | ४ |
| परिस आणि लोखंड | १ | ८ |
| फरारी | २ | |
| विश्रांति | १ | १२ |
| नवी वसाहत | २ | |
| पूर्वा | २ | |
| तरंग | १ | ४ |
| दिव्यावरती अंधेर | १ | १२ |
| पांढरा बाजार | २ | १२ |
| प्रो. फडके-गोष्टी भा. १ | २ | |
| **नाटकें व नाटिका** | | |
| उसना नवरा | १ | ४ |
| विदुषी | २ | १२ |
| मंगळागौर | | |
| संजीवन | १ | |

स्कूल व कॉलेज बुक स्टॉल, कोल्हापूर.

## दा. ना. मोघे-प्रकाशन व इतर कांहीं पुस्तकें

### नाटकें व नाटिका

| | रु. | आ. |
|---|---|---|
| जडावाची देवी | | ६ |
| क्षमेसाठीं अपराध | | ६ |
| आगलावी | | ६ |
| गीताविजय | | ६ |
| नोट कुणाची ? | | ६ |
| तेजस्वी तारा | | १२ |

### काव्यसंग्रह

| | रु. | आ. |
|---|---|---|
| विशाखा | २ | ४ |
| जीवनप्रभा | १ | |
| गुंजन | १ | ८ |
| शिवचरित्रप्रदीप | | ६ |
| कागदी पुंग्या | १ | १२ |
| नवधारा | १ | ४ |
| मराठ्यांचीं संग्रामगीतें | २ | |
| प्राची | १ | ८ |

### टीका व साहित्यचर्चा

| | रु. | आ. |
|---|---|---|
| साहित्य आणि संसार | १ | १२ |
| वाङ्मय विहार | १ | ८ |
| कोंदणें | ३ | |
| साहित्य आणि संस्कृति | ३ | |
| रसग्रहण | ३ | ८ |
| कला-नीति-वाद | २ | |
| गोकर्णीचीं फुलें | २ | ८ |
| आस्वाद | २ | ८ |
| तुषार | २ | १२ |

### टीका व साहित्यचर्चा

| | रु. | आ. |
|---|---|---|
| प्राचीन मराठी कविपंचक | | |
| तीन तपस्वी | | |
| वाङ्मयविलास | | |
| खांडेकर चरित्र आणि वाङ्मय | ३ | ८ |
| साहित्याचे मूलधन | १ | ४ |

### संकीर्ण

| | रु. | आ. |
|---|---|---|
| हिरवळ | १ | ४ |
| मानस मंदिर | २ | ८ |
| शिंपले आणि मोती | १ | ८ |
| मुक्तेश्वर वनपर्व | ४ | ८ |
| गलोल | २ | |
| अर्वाचीन पंचकन्या | २ | |
| रा. ब. काने व साने | २ | ८ |
| कागदी होड्या | | १२ |
| स्वल्पविराम | १ | |
| अभिनय कला | | १२ |
| लघुरत्नपरीक्षा | ४ | |
| बुद्धिबल क्रीडारत्नें | ३ | ४ |
| सावरकर सूत्रें | | ८ |
| डॉ. बाळकृष्ण चरित्र व आठवणी | ३ | ८ |
| श्री बसवेश्वर चरित्र | १ | ८ |
| झांशीची राणी | २ | |
| व्यायामाचा अभ्यास | २ | |
| सकस आहार | १ | |
| महाराष्ट्राची इभ्रत | १ | |

**स्कूल व कॉलेज बुक स्टॉल, कोल्हापूर.**

## दा. ना. मोघे-प्रकाशन व इतर कांहीं पुस्तकें

| कादंबऱ्या | रु. | आ. |
| --- | --- | --- |
| दौलत | ५ | |
| काश्मिरी गुलाब | ३ | ८ |
| अटकेपार | ५ | |
| उन्माद | ५ | |
| दौलत (संक्षिप्त) | २ | |
| सुखाचा शोध | ३ | ८ |
| रिकामा देव्हारा | २ | ८ |
| दिव्यचक्षु | ३ | ८ |
| आंधळा न्याय | २ | ८ |
| जळतें रहस्य | २ | |
| मावळता चंद्र | २ | |
| बेसूर संगीत | २ | |
| तांबडी माती | २ | |
| प्रतिबिंब | २ | ८ |
| चौघांच्या चार तऱ्हा | २ | |
| विभावरी | ३ | |
| शिवशाहीचा शुभ शकून | ३ | |
| शिवशाहीची पहांट | ३ | |
| माझें बालपण | ५ | |
| झोंपी गेलेला देश | ३ | ८ |
| मुचकुंददरी | २ | |
| माळरानांत | २ | |
| समरांगण | २ | |
| सती | ३ | |

| कादंबऱ्या | रु. | आ. |
| --- | --- | --- |
| गौरीहर | २ | ८ |
| पिशाच्च प्रेम | २ | |
| महात्मा कीं मोहात्मा | २ | ८ |
| चित्रकार रंगा | ३ | |
| **कथासंग्रह** | | |
| विद्युत्प्रकाश | १ | ८ |
| पाकळ्या | १ | ८ |
| त्रिवेणी | १ | ४ |
| अर्धवर्तुळें | २ | ८ |
| कोंवळी किरणें | १ | ४ |
| परिस आणि लोखंड | १ | ८ |
| फरारी | २ | |
| विश्रांति | १ | १२ |
| नवी वसाहत | २ | |
| पूर्वा | २ | |
| तरंग | १ | ४ |
| दिव्यावरती अंधेर | १ | १२ |
| पांढरा बाजार | १ | १२ |
| प्रो. फडके-गोष्टी भा. १ | २ | |
| **नाटकें व नाटिका** | | |
| उसना नवरा | १ | ४ |
| विदुषी | १ | |
| मंगळागौर | | १२ |
| संजीवन | १ | |

स्कूल व कॉलेज बुकस्टॉल, कोल्हापूर.

## दा. ना. मोघे-प्रकाशन व इतर कांहीं पुस्तकें

| नाटकें व नाटिका | रु. | आ. |
|---|---|---|
| जडावाची देवी | | ६ |
| क्षमेसाठीं अपराध | | ६ |
| आगलावी | | ६ |
| गीताविजय | | ६ |
| नोट कुणाची ? | | ६ |
| तेजस्वी तारा | | १२ |
| **काव्यसंग्रह** | | |
| विशाखा | २ | ४ |
| जीवनप्रभा | १ | |
| गुंजन | १ | ८ |
| शिवचरित्रप्रदीप | | ६ |
| कागदी पुंग्या | १ | १२ |
| नवधारा | १ | ४ |
| मराठ्यांचीं संग्रामगीतें | २ | |
| प्राची | १ | ८ |
| **टीका व साहित्यचर्चा** | | |
| साहित्य आणि संसार | १ | १२ |
| वाङ्मय विहार | १ | ८ |
| कोंदणें | ३ | |
| साहित्य आणि संस्कृति | ३ | |
| रसग्रहण | ३ | ८ |
| कला-नीति-वाद | २ | |
| गोकर्णीचीं फुलें | २ | ८ |
| आस्वाद | २ | ८ |
| तुषार | २ | १२ |

| टीका व साहित्यचर्चा | रु. | आ. |
|---|---|---|
| प्राचीन मराठी कविपंचक | [illegible] | [illegible] |
| तीन तपस्वी | [illegible] | [illegible] |
| वाङ्मयविलास | [illegible] | [illegible] |
| खांडेकर चरित्र आणि वाङ्मय | ३ | ८ |
| साहित्याचे मूलधन | १ | ४ |
| **संकीर्ण** | | |
| हिरवळ | १ | ४ |
| मानस मंदिर | २ | ८ |
| शिंपले आणि मोती | १ | ८ |
| मुक्तेश्वर वनपर्व | ४ | ८ |
| गलोल | २ | |
| अर्वाचीन पंचकन्या | २ | |
| रा. ब. काने व साने | २ | ८ |
| कागदी होड्या | | १२ |
| स्वल्पविराम | १ | |
| अभिनय कला | | १२ |
| लघुरत्नपरीक्षा | ४ | |
| बुद्धिबल क्रीडारत्नें | ३ | ४ |
| सावरकर सुत्रें | | ८ |
| डॉ. बाळकृष्ण चरित्र व आठवणी | ३ | ८ |
| श्री बसवेश्वर चरित्र | १ | ८ |
| झांशीची राणी | २ | |
| व्यायामाचा अभ्यास | २ | |
| सकस आहार | १ | |
| महाराष्ट्राची इभ्रत | १ | |

**स्कूल व कॉलेज बुकस्टॉल, कोल्हापूर.**

## दा. ना. मोघे-प्रकाशन व इतर कांहीं पुस्तकें

### संकीर्ण

| संकीर्ण | रु. | आ. |
|---|---|---|
| आरोग्यसाधन | १ | |
| आरोग्यमंजरी | २ | ८ |
| विवाहितांचे नक्षत्रदर्शन | ३ | |
| प्रौढांचें प्रबोधन | ४ | |
| मनाचे संकल्प | २ | ८ |
| रुखरुख | २ | |
| अविवाहितांचे प्रश्न | १ | ४ |
| सैन्यांतील आठवणी | २ | |
| रतिशास्त्रमीमांसा | ३ | |
| साम्राज्य कीं स्वराज्य | १ | |
| हवन | | १२ |
| बाभळवनांत | २ | |
| ज्ञानेश्वरी अध्याय १ ला | ३ | |
| ,, ,, १५ वा | ४ | ८ |
| सीतास्वयंवर | ४ | |
| नव्या जगासाठीं शिक्षण | २ | |
| हिंदुस्थानची सामाजिक उत्क्रांति | २ | |

### संस्कृत

| संस्कृत | रु. | आ. |
|---|---|---|
| द्विविभूतिचरितम् | १ | |
| पुष्पोद्यानम् भा. १ | | १० |
| ,, भा. २ | | ८ |
| बलिदानम् | २ | |
| श्रीशाहुचरितम् | १ | ८ |
| सुभाषितरत्नमाला भा. १ | १ | ४ |
| ,, भा. २ | १ | ८ |

### बालवाङ्मय

जादूची कुपी
सोशिक सुशीला
चांदणी
ताजीं फुलें
माणिक–मोती
मिठाई
लाडका भक्त
फुलवेडी किरण
भेळ
सुमनें
छानछान गाणीं
पैशांचा पाऊस
आवडत्या लोककथा भा. १
कस्तुरबा
पाढ्यांचे खेळ
मोऱ्यांची शिकार
ॲल्युमिनम्
गॅलीलिओ
कालमापन
बच्चोंके गीत
यूरोपचे आधारस्तंभ
जगांतील मुलांच्या मौजा
सुस्वभावी शंभू

**स्कूल व कॉलेज बुक स्टॉल, कोल्हापूर.**

REFBK-0008352

REFBK-0008352

# शास्त्रीय-ग्रंथ

**बुद्धिबलक्रीडारत्नें :** कि. ३। रु. ट. ख. ८ आणे.

संपादक : **ग. रं. कुलकर्णी, हळदीकर,**
बी. ए., एल्‌एल्. बी.

या पुस्तकांत बुद्धिबल खेळासंबंधीं सर्व प्रकारची माहिती दिली असून सोडविण्यास उत्तरोत्तर अवघड असे शंभर डाव उत्तरांसहित दिले आहेत. हिंदी व इंग्रजी खेळांची पद्धत, नियम वगैरे उपयुक्त माहिती दिली असल्यानें पुस्तक अत्यंत उपयुक्त झालें आहे. **साहित्य सम्राट** श्री. तात्यासाहेब केळकर यांचा उत्तम अभिप्राय.

**लघुरत्नपरीक्षा :** किं. ४ रु. ट. ख. ८ आणे.

लेखक : **म. ल. खांबेटे**–वकील व व्यापारी.

या पुस्तकांत सुमारे ६० रत्नांची शास्त्रीय माहिती दिली असून रत्नांची परीक्षा कशी करावयाची याचीही अनुभवसिद्ध माहिती दिली आहे. तसेंच मोत्यांची घटना, जाती, रंग, तेज, उपयोग, गुणदोष, कृत्रिम व कल्चर मोती यासंबंधीं संपूर्ण व्यवहारोपयोगी माहिती दिली आहे. मोत्यांची किंमत वजनावरून कशी काढावी याबद्दलचें सविस्तर कोष्टकही शेवटीं दिलें आहे. **सोन्याचांदीचे व्यापारी, सराफ व जवाहिरे** यांना अत्यंत उपयुक्त.

## स्कूल व कॉलेज बुक-स्टॉल, कोल्हापूर.

दा. ना. मोघे-प्रकाशन, कोल्हापूर.

# पुरवणी वाचनासाठीं मंजूर पुस्तकें

## दहावीसाठीं

**पाकळ्या :** No. S. 66–B. S. 1953/L 1040

सुधारून वाढविलेली पांचवी आवृत्ति. या आवृत्तींत तीन नव्या गोष्टी घातल्या असून खांडेकरांनीं नवीन विस्तृत प्रस्तावना जोडली आहे. अभ्यासही वाढविले आहेत. तिरंगी सचित्र कव्हर. किं. १॥ रु.

**हिरवळ :** No. S. 66–B. S. 1953/L 1012

या पुस्तकांत खांडेकरांच्या चवदा निवडक लघुनिबंधांचा संग्रह केला असून प्रत्येक निबंधाच्या आरंभीं त्याचा परिचय दिला असून शेवटीं अभ्यासही दिला आहे. आवृत्ति दुसरी. किं. १। रु.

**दौलत :** No. S. 66–B. S. 1953/L 1010

प्रो. फडके यांच्या दौलत या नामांकित कादंबरीची विद्यार्थ्यांसाठीं मुद्दाम तयार केलेली शालेय संक्षिप्त आवृत्ति. किं. २ रु.

**तरंग :** No. S. 66–B. S. 1952/L 911

या संग्रहांत श्री. य. गो. जोशी यांचीं सर्व वैशिष्ट्यें विपुलतेनें दाखविणाऱ्या अकरा लघुकथा आहेत. प्रत्येक गोष्टीच्या आरंभीं तिचा परिचय दिला असून शेवटीं अभ्यास दिला आहे. सचित्र कव्हर. किं. १। रु.

## आठवीसाठीं

**त्रिवेणी :** No. S. 66–B. S. 1953/L 1011

'यज्ञ', 'शबरी' व 'त्यागांतील वैभव' या साने गुरुजींच्या तीन कथांचा संग्रह. सचित्र कव्हर, आवृत्ति दुसरी. किं. १। रु.

स्कूल व कॉलेज बुकस्टॉल, कोल्हापूर.